
साप्ताहिक माणूस
११ फेब्रुवारी ८४ / दोन रुपये

# मध्यावधी निवडणूका झाल्याच तर...











साप्ताहिक

# माणूस

◻

वर्ष : तेविसावे

अंक : सदतिसावा

◻

११ फेब्रुवारी १९८४

किंमत : दोन रुपये

◻

संपादक

श्री. ग. माजगावकर

◻

साहाय्यक

दिलीप माजगावकर

सौ. निर्मला पुरंदरे

मेधा राजहंस

◻

वार्षिक वर्गणी

पन्नास रुपये

◻

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.

◻

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

◻

: पत्ता :

साप्ताहिक माणूस

१०२५ सदाशिव, पुणे ३०

दूरध्वनी : ४४३४५९

◻

मुखपृष्ठ

संजय पवार

## सप्रेम नमस्कार, माणूस

### ◻ स्त्रीला कायद्यानेच पुरुषाच्या अर्थार्जनातील वाटा मिळावा

सहजीवन ह्या विषयात वरवर पाहता असे वाटेल की, विचार करण्यासारखे काय आहे? लग्न झाल्यानंतर दोघांनी एकत्र रहायचे, दोघांपैकी एकाने पड खायची, म्हणजे संसार सुखाचा झाला नाही तरी होतो, म्हणजे मुलेबाळे होतात, नातवंडे होतात व कोणी तरी एकजण मरेपर्यंत सहजीवन जगले जाते. गेल्या दोन दशकांपूर्वीपर्यंत आपल्याकडे तरी हीच परिस्थिती होती. एक गोष्ट आणखी होती ती म्हणजे पुरुषाला जर स्त्रीपासून सुख लागत नाही असे वाटले, तर तिचा त्याग करणे. त्यामुळे समाजात परित्यक्ता स्त्रिया बऱ्याच दिसत; पण द्विभार्याप्रतिबंधक कायदा आल्यानंतर त्याचे प्रमाण कमी होते. स्त्रीला पुरुष आवडो किंवा न आवडो, त्याचा त्याग करण्याची मुभा नव्हती पुरुषप्रधान संस्कृती असल्यामुळे ह्या गोष्टी अपरिहार्य होत्या. स्त्रीला मतस्वातंत्र्य किंवा शिक्षण नसल्यामुळे ती मुकाट्याने किंवा थोड्याशा कुरबुरीने ह्या गोष्टी सहन करत आली.

हळूहळू स्त्री जागृत होऊ लागली तरी देखील तिच्यावर अन्याय होतो आहे ह्याबद्दल आवाज उठवणाऱ्या व त्याविरुद्ध बंड करणा-या स्त्रियांचा वर्ग मर्यादित होता; परंतु दुसऱ्या महायुद्धानंतर स्त्री नोकरीच्या निमित्ताने घराबाहेर पडल्यानंतर तिला हा अन्याय प्रकर्षाने जाणवायला लागला व गेल्या दोन दशकांत तर त्याचा परिणाम सहजीवनावर प्रकर्षाने जाणवू लागला. कारण अर्थार्जनात पुरुषाच्या बरोबरीने वाटा उचलणे तिला भाग पडू लागले. तरीदेखील पुरुषाच्या मनावरचा आपल्या प्रतिष्ठेचा पगडा कमी न झाल्यामुळे त्याने गृहिणीपदाचा वाटा उचलणे नाकबूल केले. त्यामुळे सहजीवनाला तडा जायला सुरुवात झाली.

ही परिस्थिती सर्व जगभरच निर्माण झाली. त्यामानाने भारतात अजून त्याचे स्वरूप तितके गंभीर झाले नाही. ह्याकरता मनात असा विचार येतो की, prevention is better than cure ह्या उक्तीप्रमाणे, वेळीच ह्याचे स्वरूप गंभीर होण्याआधी काही करता येईल का? कुटुंबव्यवस्था मोडकळीला न येता तिच्यात काही सुधारणा —बदल होऊ शकतील का?

शेकडो वर्षांच्या उत्क्रांतीनंतर आजची कुटुंबव्यवस्था निर्माण झाली. त्यात पुरुष व स्त्रियांच्या कामाची समान विभागणी म्हणजे स्त्रीने मुलांचे संगोपन व कुटुंबाची व्यवस्था म्हणजे पालन व पुरुषाने पोषण म्हणजे अर्थार्जन ही व्यवस्था खरे पाहिले तर अतिशय सोईची होती; पण पुढे स्त्रीच्या वाट्याला दुय्यम भूमिका तिच्या हातात अर्थार्जनाचे साधनच न राहिल्यामुळे आली व दिवसेंदिवस सर्व व्यवहार पैशावर अवलंबून रहायला लागल्यामुळे लाचारी व अपमानास्पद वागणूक तिच्या वाट्याला आली. त्याचा परिणाम म्हणजे आर्थिक स्वातंत्र्याची नितांत गरज निर्माण झाली. आर्थिक मिळकतीकरता घराबाहेर किमान ७–८ तास राहणे आले. त्याचे परिणाम कुटुंबव्यवस्थेवर होऊ लागले. विशेषत: मुलांवर त्याचा परिणाम फार वाईट होऊन, मुलांमध्ये वैफल्याची भावना निर्माण होऊन त्यातून हिप्पी जमात निर्माण होऊ लागली. आपल्याकडे त्या प्रमाणात अजून इतके दुष्परिणाम दिसत नाहीत. कारण आपल्याकडे अजून एकत्र कुटुंबपद्धती काही प्रमाणात अस्तित्वात असल्यामुळे मुलांना आजी-आजोबांचं संरक्षण मिळते.

आपल्या समाजाचा पाया आतापर्यंत भौतिकतेवर नसून आधिभौतिकतेवर उभार-

लेला होता. मध्यमवर्गीय स्त्रीचे तीन वर्ग पडतात. एक वर्ग नवऱ्याचे उत्पन्न अगदीच बेताचे असल्यामुळे नोकरी करावी लागणारी. दुसरी स्त्री नवऱ्याचे उत्पन्न बऱ्यापैकी असले तरी स्वतःच्या गरजा भरमसाट वाढवल्यामुळे नोकरी करणारी व तिसरी म्हणजे स्वतःचे काही तरी करिअर असावे अशी उत्कट इच्छा असणारी बुद्धिमान स्त्री. तिसऱ्या वर्गातील स्त्रीबद्दल प्रश्न येत नाही, कारण ती कसाही मार्ग काढते व तिला जर त्याकरिता काही किंमत द्यावी लागली व मुलाकडे व कुटुंबाकडे थोडेसे दुर्लक्ष करावे लागले तरी ती दुसऱ्या प्रकारांनी त्याची भरपाई करते व तिच्याकडून समाजाला काही तरी निश्चित रूपात फायदा होतो. पहिल्या व दुसऱ्या वर्गातील स्त्रीबद्दल असे म्हणायचे की, कुटुंबव्यवस्था मोडकळीला आणून किंवा खिळखिळी करून तिला घराबाहेर इतका वेळ काढणे आवश्यक आहे का? तिने स्वतःच्या व कुटुंबाच्या गरजा थोड्या कमी करून समाधान व आनंद कुटुंबाला शिकवला तर हितावह नाही का? पुष्कळ वस्तू पुष्कळ प्रमाणात मिळाल्यानेच समाधान, शांती व सुख लाभते का? चाळीस–पंचेचाळीस वर्षांपूर्वीच्या काळात मला आठवते, लहान लहान गोष्टीत आम्हा मुलांना जो आनंद मिळत होता, तो आनंद अलीकडील मुलांना किती तरी जास्त प्रमाणात वस्तू मिळूनदेखील मिळत नाही.

वरील सर्व गोष्टीवरून सहजीवन ह्या विषयापासून लांब गेल्यासारखे वाटेल; पण कामाची वाटणी जर समजसपणे केली तर सहजीवनाचा आनंद जास्त प्रमाणात घेता येईल. स्त्रीला कायद्यानेच पुरुषाच्या अर्थार्जनाच्या वाट्यातील वाटा मिळाला तर तिला मुलांना सोडून बाहेर जाण्याची आवश्यकता वाटणार नाही व पुरुषांना सवय होईल की, स्त्री जे घराकरता काम करते त्याचे मूल्य आहे ती तिला मिळालेला पैसा कुटुंबाकरताच खर्च करेल; पण त्यात तिची अस्मिता दुखावली न जाता कुटुंबात तिला मानाचे स्थान मिळेल. तसेच अगदी कमी उत्पन्न असलेल्याकरता part time कामे मिळावीत व एकदा कायद्याचे संरक्षण मिळाल्यानंतर पुरुषाला स्त्रीचा मान ठेवण्याची सवय होईल व तो सहजीवनातील आनंद घेऊ शकेल. त्याच्या मनातील स्त्रीविषयीची तुच्छतेची भावना जसजशी कमी होईल तसतसा तो सहजीवनाचा आनंद घेण्यास समर्थ होईल. त्याचप्रमाणे स्त्रीने नैसर्गिकरीत्या तिच्यात असलेले सहनशीलता, चिकाटी व नम्रता हे गुण संवर्धन करायचा प्रयत्न केला पाहिजे पाश्चात्त्यांचे अनुकरण करून नवीन तेच हितकर व चांगले असा दृष्टिकोन न ठेवता आपला मान ठेवून घेऊन, अस्मिता जागृत ठेवूनसुद्धा तिच्या कुशल बुद्धीने सहजीवन जास्तीत जास्त सुखकर करण्याचा प्रयत्न करावा.

२ फेब्रुवारी ८४ — सौ. मालती भाले, औंध, पुणे

---

## दिवाळीनंतरचे सरस अंक

□ दिवाळी अंकानंतरचे आपले सर्व अंक एकापेक्षा एक सरस निघाले आहेत. 'क्रिकेट विशेषांका' बद्दल हे मी म्हणत नाही. कारण क्रिकेटची विशेष गोडी नाही, त्यामुळे तो अंक फक्त वरवर चाळला. आपल्या समाजातील क्रिकेट या एकाच खेळाचे अवास्तव लाड करण्याच्या प्रवृत्तीला आपणही हातभार लावता हे मात्र त्यामुळे मला कळले. आपण 'क्रीडा विशेषांक' काढला तर त्याचे स्वागतच होईल. 'पर्यावरण विशेषांक' माहितीपूर्ण आहेतच शिवाय समस्येचे गांभीर्य पटल्यामुळे मनात चिंता निर्माण करायला लावणारे आहेत. आपण हा विषय सातत्याने अप्रत्यक्षरीत्या यापूर्वीही घेतला आहेच. उदा. चिपको आंदोलन. यापुढेही या विषयावरील लेख देत राहिलात तर बरे, कारण या विषयाबद्दल म्हणावी तेवढी चिंता व्यवहारात तरी दिसत नाही. मुंबईबद्दल तर कोणी याचा विचार अजून तरी करतोय की नाही कळत नाही. मुंबईत दर चौरस कि. मी मागे १९००० लोक राहतात व त्यातील हजारो लोक उघड्यावर मलमूत्रविसर्जन करतात. ही एकच गोष्टसुद्धा भयावह आहे. सर्वत्र वस्ती असल्यामुळे हे मलमूत्रविसर्जन रस्त्याच्या कडा, सार्वजनिक जागांचे कोपरे (शाळा, बागा, मैदाने) किंवा आडोशाच्या जागा, रेल्वेमार्गांच्या कडा (ज्यावरून हजारो लोक मिनिटामिनिटाला ये–जा करीत असतात) या सार्वजनिक वावराच्या ठिकाणीच होते. हे वर्षानुवर्षे बिनबोभाट चाललेले आहे; नव्हे यात प्रचंड प्रमाणात वाढ होत आहे. आपल्या १४ जानेवारीच्या अंकातील अभय गोखले याचा मुंबईतील मराठी माणसाच्या खच्चीकरणासंबंधी लेख आला आहे. शिवसेनेने सुमारे २० वर्षांपूर्वी हा विचार प्रभावीपणे व सातत्याने मांडला होता. ती वेळ योग्य होती आता वेळ गेली असेच म्हणावे लागेल. तरीही संकटाच्या तावडीत सापडलो असताही ओरडू नये असे नाही. तेव्हा आपण हा लेख दिला ते चांगलेच झाले. मिरजेतील अरबांची समस्या ही आपल्याच समाजातील परिस्थितीमुळे निर्माण झालेली आहे. आपल्या समाजात राष्ट्रद्रोह्यानासुद्धा वकील मिळतात, चोर, गुंड, स्मगलर, खून करणारे यानाही वकील मिळतात तेथे अरबांना नाना सुविधा पुरविणाऱ्या पोटभरू एजंटांचे काय सांगावे?

जॉर्ज ऑरवेलच्या १९८४ या कादंबरीचे स्मरण योग्य वेळी आपण दिले आहे. त्याने कल्पिलेले भावनाशून्य, यंत्रवत, स्वार्थी मानवी व्यवहाराचे, जागतिक व्याप्तीचे, वेगवान जीवन हे एक टोक असे आहे की, जेथपर्यंत मनुष्य जाणे अशक्य नाही; पण जाईलच असेही नाही. मानवी जीवन व्यापार या टोकापर्यंत जाणार नाही असेच वाटते याचे सुचिन्ह म्हणजे या कादंबरीचेच लेखन. १९४८ मध्ये लिहिलेल्या या कादंबरीवर आज सर्व जगात विचार होतोय. त्याच्या काही प्रतिक्रिया होत आहेत. यावरून काही बोध मानव घेईलच की! आजच्या मानवाला सर्वांत जास्त काळजी त्याच्या भवितव्याची आहे. १९४२ साली दुसरे महायुद्ध झाल्यानंतर जगातील अनेक राष्ट्रांची शक्ती किती तरी प्रकारे व पटीनी वाढलेली असताही तिसरे महायुद्ध काही अजून झालेले नाही; शीतयुद्धे चालू आहेत; पण महायुद्ध झालेले नाही हे कसले लक्षण आहे? मनुष्य निश्चितपणे आपल्या मानवजातीच्या विनाशाकडे जाण्याचा आततायीपणा करणार नाही हेच यावरून दिसते आज जगातील शक्तीचे ध्रुवीकरण हुकूमशाही व लोकशाही राष्ट्रांच्या भोवताली झालेले आहे याऐवजी दोन हुकूमशहांमध्ये जर शक्ती विभागल्या गेल्या तर मात्र जागतिक युद्धाचा धोका

दुपटीने वाढतो. कारण आततायीपणा हे हुकूमशाहीचे वैशिष्टय आहे.

१९४८ मध्ये ऑरवेलला जीवनाच्या यान्त्रिकीकरणाची जी प्रचंड गती साक्षात दिसत होती. त्यावरून तीच गति कायम कल्पून १९८४ चे त्याने चित्र रेखाटले. यात त्याची कल्पकता चागली दिसली. परंतु विश्वाचे सर्व जीवन व्यापार हे घडयाळाच्या लंबकाप्रमाणे कल्पिले तर हा लंबक आता दुसऱ्या दिशेलाही जाऊ शकेल. मानवाला आधुनिक, यान्त्रिक, भावनाशून्य जीवनाचे वैयर्थ कळून चुकेल की, विश्वव्यवहाराच्या वर्तुळाकृति परिभ्रमणामध्ये जेथून निघावे तेथे परत येऊन पोहोचणे हे स्वाभाविक आहे. तेव्हा ऑरवेलच्या कल्पनेतील स्वार्थी, भावनाशून्य, यंत्रवत मानव जरी निर्माण झाला तरी तो फार काळ तसा राहणार नाही. कारण त्यांची अंगीभूत गति.

पत्र लिहिता लिहिता केवढे लांबले हे! आपले 'माणूस' चे अंक मी जेथे लवकर मिळतील तेथे घेऊन वाचत असतो यासाठीच इतक्या वर्षांत कधी वार्षिक वर्गणीदार होत नाही, कारण मग पोस्टखात्याकडे डोळे लावून बसावे लागेल व अंक लवकर मिळणार नाही.

१७ जानेवारी ८४ श्री. रमेश परांजपे, मालाड.

□

परिसंवाद

# सहजीवन–कोणासाठी ? कशासाठी ?

नुकताच २९ जानेवारीच्या रविवारी 'माणूस' तर्फे 'सहजीवन आणि नवी कुटुंबसंस्था' या विषयावर एक परिसंवाद आयोजित केला होता. परिसंवादात भाग घेतला शोभा भागवत, डॉ. विद्याधर पुंडलीक, शांताबाई किर्लोस्कर, वि. ग. कानिटकर, विद्या बाळ, प्रा. सुरेन्द्र तन्ना आणि प्रा. श. शं. कुलकर्णी यानी.

सहजीवनासारख्या विषयावर परिसंवाद आयोजित करण्याबद्दल साशंकच होतो कारण विषय आपल्या सगळ्यांच्या फार जवळचा. त्यामुळे बोलायला, चर्चा करायला अवघडच.

सहजीवनावर अधिक चर्चा करायचं मनात घोळत होतं दिवाळीपासून–शोभा भागवतांचा 'लग्न आणि सहजीवन' हा लेख 'माणूस'च्या दिवाळी अंकात प्रसिद्ध झाल्यापासून. लेख प्रसिद्ध झाल्यावर अपेक्षित पत्ररूप प्रतिसाद मिळालाच; पण 'सहजीवनातील नात्याबद्दल आम्हालासुद्धा या विषयावर बोलायला आवडेल. तुम्ही या विषयावर एक चर्चा आयोजित कराल का?' यासारख्या अंतर्मुख करणाऱ्या प्रतिक्रियाची सख्याही कमी नव्हती. लेख ज्याच्यासाठी लिहिला होता, त्याच्यापर्यंत पोचलाच होता आणि सवादातल्या या दुसऱ्या टोकाकडून एक पाऊल पुढे टाकायला प्रोत्साहन लाभत होतं.

पण पुढचं पाऊल टाकायच कसं? या विषयावर, नात्यातील गुतागुंतीबद्दल आणि त्यामुळे निर्माण होणाऱ्या, आवश्यक ठरणाऱ्या नव्या कुटुंबरचनेबद्दल लोकाना बोलतं कसं करायच? विषयाला निश्चित रोख आणि नेमकेपणा द्यायचा कसा? प्रश्न खूप होते. खरं तर हा विषय छोटया गटांमध्ये मांडण्यासारखा; पण आजूबाजूला सहज पसरत जाण्यासारखा. मग असं वाटलं हे तर जवळच्या समवयीन मित्र–मैत्रिणीच्या गटात आपण अप्रत्यक्षपणे करतोच की. परिसवादात या विषयाच्या वेगवेगळया बाजू तरी समोर येतील. तेव्हा गटचर्चा बाजूला करून परिसंवादाचं स्वरूप निश्चित केलं. परिसंवादात व्यक्त झालेल्या विचारांवर श्रोत्यांमधून चर्चा व्हावी म्हणून परिसंवादाला जोडून प्रश्नोत्तराचा कार्यक्रम ठेवला.

सहजीवन म्हणजे काय? पति–पत्नीचं मैत्रीपूर्ण मोकळं नातं. हे नातं समानतेच्या–स्वातंत्र्याच्या पायावर उभं रहातं. या नव्या नात्याची गरज आहे पति-पत्नी नात्यामधला ताजेपणा कायम ठेवण्यासाठी, लग्नानतरसुद्धा एकमेकाच्या निर्मितिक्षमतेला वाव देण्यासाठी. याच्या पुढचा थोडा व्यापक विचार सहाजिकच कुटुबाबद्दल, समाजाबद्दल येतो. स्त्री–पुरुष समानतेच्या पायावर उभ्या असलेल्या नव्या पिढीतील मुलींना आणि सुनांना, घरातील जुन्या पिढीच्या सासू–सासऱ्याना कोणते ताण सोसावे लागत आहेत? कशामुळे? कधी नात्याच्या उतरडीप्रमाणे पारंपारिक मान–अपमानाच्या कल्पना गुंडाळल्यामुळे, कधी घराच्या साचेबंद घरगुती कार्यक्रमांना फाटा दिल्यामुळे. ताण दोन्ही पिढयांमध्ये असतो. दोष मात्र एकमेकाना दिला जातो. या ताणतणावाना सतत सामोरे जाणाऱ्या कुटुबातील व्यक्ती आणि त्याचा समाज यांचं चित्र कोणतं असेल? या चित्रातले रग पाश्चात्य विघटनवादी संस्कृतीचे असतील की वेगळे असतील? आणि हे टाळण्यासाठी अधिक मोकळया पायावरची नवी कुटुंबरचना कशी असेल? कोणती नवी मूल्ये कुटुबात रुजवावी लागतील? त्याचे समाजशास्त्रीय, सांस्कृतिक दृष्टिकोनातून फायदे–तोटे काय सांगता येतील, असा परिसंवादाचा व्यापक विषय.

परिसंवाद झाला टिळक स्मारक मंदिराच्या सभागृहात. वेळ रविवार संध्याकाळची; पण विषयाच्या ओढीनं दूरदर्शनचं खास आकर्षण टाळून सुमारे ५००–६०० श्रोते उत्साहाने हजर राहिले आणि प्रश्नोत्तरांच्या कार्यक्रमातही त्यानी भाग घेतला.

सुरुवातीला या विषयाच महत्त्व सांगितलं शोभा भागवतांनी. त्या म्हणाल्या, कुटुबजीवनातील नात्याबद्दल, त्यातल्या गुदमरण्याबद्दल बोलायला हवं आहे पण बोलण्याची पद्धत नाही. आधीच्या पिढीला हा न बोलण्याचा विषय वाटतो. आपला प्रवास डोळसपणे पहावा असं त्यांना का वाटत नाही? आपण बायकांना गृहीत धरल होतं का? कामं, नाती ठरवून टाकली होती का? त्यात काही बदलतं, वाढतं, फुलतं याची जाणीवच त्याना नव्हती का? यासारखे प्रश्न आजच्या पिढीला पडत आहेत. म्हणून कुटुंबपद्धतीमधल्या आणि नवरा बायकोच्या नात्यामधल्या सगळयाच गृहित धरलेल्या गोष्टीं-

बद्दल चर्चा व्हायला हव्यात. एकीकडे वृद्धांना काळजी वाटते आहे, की तुम्ही आमच काय करणार आहात? तर दुसरीकडे लहान मुलां-बद्दल अनास्था वाटते आहे. माणस अधिका-धिक स्वयंकेंद्रित होत आहेत की काय अशी शंका येऊ लागली आहे.

आपलही कुटुंब या सामाजिक प्रश्नापासून दूर नाही. नव्या कुटुंबात समानतेच्या पाया-वर निरोगीपणानं माणस जवळ आली नाहीत तर सगळेच ताण असह्य होत जातील म्हणून मला या विषयाचं महत्त्व वाटतं आहे.

नंतर प्रा. सुरेंद्र तन्ना बोलले. लग्नानंतरचे सहजीवनातले प्रश्न लॉजिकल नसतात तर सायकॉलॉजिकल असतात. कारण भिन्न प्रकृ-तीची, भिन्न आवडीची माणसं एकत्र येतात. म्हणून तडजोडीची गरज आणि तशी मनो-वृत्ती सहजीवनात अपेक्षित आहे असं ते म्हणाले दुसरी महत्त्वाची गोष्ट त्यांनी सागितली, मोठं ध्येय डोळ्यासमोर ठेवलं म्हणजे बारीकसारीक गोष्टीचा बाऊ केला जात नाही.

नंतर बोलताना शांताबाई किर्लोस्कर म्हणाल्या सहजीवन हा धर्म आहे. या धर्मात आपल्यापेक्षा दुसऱ्याची गरज मोठी मानण्याला महत्व दिलं आहे. सहजीवनात अडथळे येतात कारण माणसाला माणसाशी वागण्याची पद्धत माहीत नसते. शांताबाई पुढे म्हणाल्या, माणसं दिवसेंदिवस अधिकाधिक खुजी होत चालली आहेत. त्याच्या जीवनाकडून अपेक्षा, ध्येये अगदी छोटी आहेत. सहजीवनाची सुरुवात कुटुंबातील संस्कारापासून होते असं सागून त्या म्हणाल्या—त्यासाठी आधी पालक—शिक्ष-णाची गरज आहे आणि पालकांनी हे कुटुंब-जीवनाचं शिक्षण मुलांना द्यायला पाहिजे. हे शिक्षण कोणत्याही अभ्यासक्रमातून होणार नाही. सहजीवन म्हणजे ज्यानं त्यानं आपल्या धर्माप्रमाणे—स्वधर्माप्रमाणे वागायला पाहिजे. त्यासाठी आधी स्वधर्म समजून घ्यायला हवा.

नव्या विचारावर आधारीत कोणतीही नवी समाजरचना, कुटुंबरचना येऊ द्यात, त्याला घाबरायचं कारण नाही. कारण जे जे कालबाह्य आहे ते बाजूलाच पडणार आहे; पण कुटुंबाचे काही विधीनिषेध आपण पाळायला हवेत असे त्या म्हणाल्या.

नंतर वि. ग. कानिटकर बोलले. मुली सांगून आल्या म्हणून आमची लग्नं झाली नाही तर आम्ही तसेच राहिलो असतो. असे ते गमतीने म्हणाले. आम्ही लग्नाचा विचार आधी फारसा केलाच नव्हता. सगळं काही आपोआप होत गेलं.

स्त्रियांकडे बघण्याचा जुना विचार सांग-ताना ते म्हणाले जशा गोठ्यात गाई, म्हशी तशी घरात बाई होती. यात सहजीवनाला वाव कुठे आहे? १९२० साली गांधींनी स्त्रियाना प्रथम राजकारणात आणलं आणि युद्धकाळात स्त्रिया नोकरी करायला लागल्या, तेव्हा स्त्रियांचा व्यक्तीविकास या कल्पना आजच्या आहेत.

## स्व–तंत्र कोणते ?

'स्त्री' मासिकाच्या संपादक विद्या बाळ म्हणाल्या जेव्हा सहजीवनासारख्या विषया-वरील चर्चा ऐकायला इतक्या संख्येने लोक हजर रहातात तेव्हा परिवर्तनाला सुरुवात झाली आहे असंच म्हणावं लागेल. सहजीव-नात माणसं वाढत रहातात ही कल्पना मान्य करणं आहे, सगळी माणसं एकाच पातळी-वर येण आहे. नात्याची उतरंड खरी नाही, म्हणजे सासू—सून वाद असेल तर सासू बरो-बर, आई—मुलगी त आई बरोबर आणि नणद—भावजयीमध्ये नेहमी नणद बरोबर अशा आपल्या कल्पना असतात. सहजीवन म्हणजे चांगला नवरा—चागली बायको, जे माझ्या स्वातंत्र्याइतकंच तुझं स्वातंत्र्य मह-त्वाच असं समजतात सपादक म्हणून बाय-काच्या कुटुंबातील गुदमरण्याचे अनुभव सांगताना त्या म्हणाल्या, साठाव्या वर्षीसुद्धा बाईला स्वतंत्र रहावसं वाटत कारण ज्या संवेदनशीलतेनं तिला जगायच आहे त्याची नवऱ्याला पर्वाच नाही. कधी हे बोलून दाख-वलं जात, कधी नाही. सहजीवन पचवायला अवघड आहे. कारण आमचं सहजीवन आहे अस म्हणता म्हणता एक दादागिरी करणारा असतो.

सहजीवनाचो समाजशास्त्रीय बाजू माड-ताना डॉ. विद्याधर पुंडलिक म्हणाले, सह-जीवन ही कल्पना खऱ्या अर्थानं नवी आहे, तो इतिहासात नव्हती. आपल्या समाजानं स्थिरतेला (stability) जास्त महत्त्व दिल आणि त्यामळं मातृसत्ताक, पितृसत्ताक कुटुंब-कल्पना कायम राहिल्या. सहजीवनातील प्रमुख मूल्य स्त्री—स्वातंत्र्य आहे आणि जशी कोणत्याही स्वातंत्र्याची किंमत द्यावी लागते तशी ती याबाबतीतही समाजाला द्यायला पाहिजे. स्वातंत्र्याची शेवटची पायरी म्हणजे पाश्चिमात्य देशात पोस्टकार्ड डायव्होर्सची सध्या मधल्या काळात वाढली होती. आणि तात्पुरती (टेंपररी) समाजव्यवस्था अस त्या समाजाचं वर्णन काही वेळा केलं जातं. हा धोका आपल्या समाजात नाही. कारण आपल्या स्त्रिया खूप सोशिक आहेत !

परिसवादाच्या शेवटी प्रा. श. शं. कुलकर्णी बोलले कागदी फलकाच्या आधा-रानं त्यानी सहजीवनाच्या चार पातळींचं वर्णन केलं— १) अन्नमय किंवा प्राणमय २) मनोमय ३) विज्ञानमय आणि ४) आनंदमय पातळी. आज सहजीवनाची अवस्था शारीरपातळीवर आहे ते मानवी-वरच्या पातळीवर जाण्याची गरज आहे.


जसजशी काम आणि अर्थाबाबत स्त्री—पुरुषावर अवलंबून रहाणार नाही तशी पुरुषसत्ताक पद्धती टिकणार नाही. सहजीव-नाचं मूल्य म्हणजे स्वातंत्र्य—स्व-तंत्र. स्वतःचं तंत्र निर्माण करण. स्वतःचा विकास करता-करता भोवतालच्या इतरांचा विकास घड-वता यायला पाहिजे.

परिसंवादानतर प्रश्नोत्तराचा कार्यक्रम झाला. प्रश्नाची संख्या खूप होती; पण निश्चित रोख कमी आढळला. काही निवडक प्रश्नाना उत्तरे देऊन कार्यक्रमाचा समारोप झाला.

प्रश्नोत्तराच्या कार्यक्रमात एक गोष्ट लक्षात आली की, लेखी प्रश्नाच स्वरूप मनो-गताचं होतं. प्रत्येकाला आपली मतं ऐकव-ण्याची उत्सुकता होती परिसवादानंतर काही लोकानी उत्स्फूर्तपणे समोर येऊन आपली मतं बोलून दाखवली. वेळ असता तर प्रत्येकजण पुढे येऊन बोललाच असता. तेव्हा या विषयावर चर्चा न करण्याचे सकेत मोडून पडतील आणि अधिक मोकळ्या वातावरणात कुटुंबातून या विषयावर बोलल जाईल असं वातावरण तयार होईल असा विश्वास परिसंवादानंतर वाटला.

परिसंवादासाठी जमलेल्या श्रोत्यांचा वयोगट मध्यमवयीन होता. तरुण मुला—मुलीची संख्या त्या प्रमाणात कमीच वाटली. लग्नापूर्वीच लग्नानतरच्या सहजीवनाचा विचार करण्याची गरज आपल्या मित्र—मैत्रिणीना खरच केव्हा वाटेल ?

—मेधा राजहंस



# मुंबापुरी

मंगळवारच्या 'बंद'च्या दिवशी मुंबईच्या काही भागात बरूखळ धंदा झाला म्हणतात. विरोधी पक्षांनीही बऱ्यापैकी गल्ला जमवला. 'बंद' सहीसलामत बिनबोभाट पार पडला वगैरे नेहमीची वटवट सोडा. 'बंद'च्या निमित्तानं समस्त विरोधी पुढारी एकत्र आले अन् चोवीस तास सांधा धरून धडपणे उभे राहिले हीच आमच्यालेखी मोप कमाई आहे! हा गल्ला पुढे उपयोगी पडेल, राव!

भाजप जनता-शिवसेना डॉ. सामत वगैरेंची आवळ्या-भोपळ्याची मोट एक दिवस तरी टिकते की नाही याची आम्हाला कोण चिंता लागून राहिली होती! नाही म्हणायला शेवटच्या मोक्याला थोडासा वांधा झालाच. 'बंद'चं सूप कधी वाजवावं यावरून गाजणार होतं. काहीना खेळ पाच वाजता खलास करायचा होता, तर बाकी सगळे बारा वाजेस्तवर बावटा फडकवत ठेवण्याच्या मूडमध्ये होते.

आम पब्लिकने मात्र जेमतेम पाच-साडेपाचपर्यंत दम धरला. नंतर सगळे व्यवहार भराभर सुरू झाले! बिडी-काडीच्या गाद्यापासून ते चौपाटीच्या चंपी-मालिशवाल्यांपासून सगळ्यांनी दिवस सुरू केला. तिकडे विरोधी पक्षनेते दत्ता मेधे यांच्या घरी पब्लिकची आभार मानणारी पत्रकं टाइप होऊ लागली. मुंबईच्या कावळ्यांनी टी. व्ही., च्या अँटिनावर दोन मिनिटं स्तब्ध राहून 'मुंबई बंद'ला तिलांजली दिली!

'बंद' मध्ये शिवसेना–डॉ. सामंत सामील झाल्याने वातावरण चैतन्यशाली (म्हणजे मारामाऱ्या वगैरे) होईल असा काहींचा कयास होता; पण तसं काही घडलं नाही. शिवसेनाप्रमुखांनी कार्यकर्त्यांच्या सभेत दणकेबाज भाषण ठोकून जेमतेम आठवडा लोटला नसेल अन् हा 'बंद' उजाडला! ठाकऱ्यांनी आपल्या भाषणात महात्मा गांधींना नको नको ते म्हटलं; पण शिवसैनिक मात्र 'बंद'च्या दिवशी राष्ट्रपित्याचाच अहिंसापाठ पढत होते. हल्ली शिवसैनिक शांत, संयमी, विनयशील झाले आहेत. ठाकऱ्यांना कदाचित हे ठाऊक नसावं!

मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुकीत समस्त विरोधी पक्ष (आय) काँग्रेसच्या विरोधात उभे ठाकणार आहेत अन् त्यांची रंगीत तालीम म्हणजे हा 'मुंबई–बंद' असं बोलल जातंय. काहीही असो, शेवटी ही सगळी नाटकंच! आज डॉ. सामंत आणि शिवसेना 'बंद' पुरते एकत्र आले; पण हा मधुचंद्र किती काळ टिकेल? थोर राष्ट्रीय नेते शरद पवार सगळ्यांना एकत्र बांधून ठेवायची काही तरी युक्ती काढतील. गेल्या दसऱ्याला त्यांनी सेना आणि दुसरे थोर राष्ट्रीय नेते जॉर्ज फर्नांडिस यांना 'पवित्र मीलन की पावन कडीमे' बांधून टाकलं होतं. फर्नांडिसजींच्या गळ्यातलं अद्याप हे लोढणं गेलं नाहिये

आता या महाशिवरात्रीच्या मुहूर्तावर पवार सेना आणि सामंत यांचा मिलाफ घडवून आणतील तर नवल नाही. म्हणजे थोडक्यात काय – जय भं भं भं भ भोला!

◻

'मुंबई बंद' म्हणजे चहाच्या पेल्यातलं वादळ होतं असं काँग्रेसवाले म्हणतायेत. चहाच्या पेल्यातलं वादळ म्हटलं की, आम्हाला बाबासाहेब भोसले आठवतात. त्यांच्या घरी चहापाटर्यांची अशी धूम व्हायची अन् मग वादळं काय, चक्रीवादळं काय, काही विचारू नका! हल्ली मात्र भोसल्यांचा कुठे मागमूस नाही. त्यांचा वाग्विलासही कुठे वाचायला मिळत नाही.

सध्या अंतुले तेजीत आहेत. मुलीच्या दणकेबाज लग्न सोहळ्यानंतर अंतुले आता पुन्हा राजकीय आखाड्यात मुंडावळ्या बांधून अवतरले आहेत. मायभूमी कोकणाला जाऊन आले. नंतर उरणची वारी झाली. गेल्या आठवड्याला ठाणे काबीज करून आले. सगळीकडे त्यांची भाषणं छापून येतायेत. गरिबांच्या नावाचा गजर सुरू झालाय!

वसंतदादांना या सगळ्यात कसलं तरी कारस्थान दिसतंय. काळा चष्मा सतत वापरल्याचा हा परिणाम.

या कटकारस्थानात म्हणे अंतुलेंबरोबर भोसले, शंकरराव चव्हाण अन् एस. एन. देसाई आहेत.

आता हे जरा जादाच झालं हं दादा. अहो, अंतुले गोर-गरिबांच्या अन् तळागाळातल्या लोकांच्या भल्यासाठी झटतायेत, त्यांना आहे कुठे सवड?

भोसले आपलं वजन कमी करण्याच्या (राजकीय नव्हे) उद्योगात गर्क आहेत. एस. एन. देसायांना कसलं कपाळाचं कारस्थान पेलणार? त्यांना साधी अंतुले–जयवंत दळवी भेट नीट पेलता आली नाही.

आता राहिला प्रश्न शंकररावांचा. तर त्यासाठी सत्य साईबाबांना जाऊन एकदा दादांनी भेटावं, त्यांची साग्रसंगीत पाद्यपूजा करावी सत्यसाईबाबा दक्षिणेत राहत असल्यामुळं या कामी दादांनी शालिनीताईंची मदत घ्यावी. ताईंचा दक्षिणेत खूप दबदबा आहे!

दादांच्या कारकीर्दीला या आठवड्यात एक वर्ष पूर्ण झालं या निमित्तानं आपल्या शासनानं घेतलेल्या १०० क्रांतिकारी निर्णयांची द्वाही दादांनी फिरवली. आता आपल्या शासनाची शंभरी भरावी असं जर दादांना वाटत नसेल तर त्यांनी त्वरित काही पाउलं उचलावीत. उदाहरणार्थ अँगाथा ख्रिस्तीच्या चातुर्यकथा वाचाव्यात. कट-कारस्थानं उलथवून टाकण्याच्या कामी मदत होईल!

◻

## कुणाची पाठ, कुणाचे ओझे

एकतीस तारखेचा बंद उरण–परिसरात शांतपणे पार पडला. कोठे लाठीमार नाही, गोळीबार नाही की, लोकांची दगडफेक नाही.

पृष्ठ ३० वर

जळगाव साहित्य संमेलन

# सुसूत्र संचालन, अमाप उत्साह

संजय पवार

मेचा तिसरा-चौथा आठवडा असतो. वातावरण कुंद बनत जात, आकाश गढूळ. नतर सोसाट्याचा वारा, जमिनीवरचा धुरळा आकाशावर उडतो. सोबतीला कागदाचे कपटे, छोट्या-मोठ्या वस्तू इ. इ. ढगावर ढग आपटतात, आवाज येतो. आता पाऊस पडेल, आता पाऊस पडेल असं वाटतं... घरावर डांबर टाकण्याची, छत्रीची काडी नीट करण्याच ठरत...पण पाऊस पडतच नाही. पुन्हा सारं- तिथंच आणि लख्ख सूर्यप्रकाश !

¤

अठ्ठावन्नावं अ. भा. मराठी साहित्य-संमेलन २८।२९।३० जाने. ८४ रोजी जळगाव मुक्कामी वाजत-गाजत पार पडले. हे समेलन वाजण्याआधी 'गाजल' आणि त्यामुळे काही लोकाना वाटत होतं ह्या समेलनाचे बारा 'वाजणार' किंवा हे संमेलन 'पडणार !' प्रत्यक्षात मात्र गाजलंही, वाजलंही आणि धुमधडाक्यात पार पडलंही !

बेरजेच्या राजकारणाची परंपरा सागणाऱ्या कॉंग्रेसचे बाळासाहेब तथा मधुकरराव चौधरी यांच्या खास सुसूत्र सयोजनानं गुफलेलं हे संमेलन ऐरणीवर असलेल्या मंडल-आयोग व नामातर प्रश्नानाही विस्कटता आलं नाही !

बाकी गेली काही वर्षं 'समेलना चला, जत्रेला' चला अशी जी आवई उठलीय तीही होतीच. जळगावकरांच्या दृष्टीने ती जत्राच; पण ज्या पद्धतीनं 'जत्रा' म्हटल जातं त्या पद्धतीन मात्र त्यांना 'जत्रा' माहीत नाही ! एवढा भव्य मंडप, प्रचड व्यासपीठ मोठमोठे लेखक, या सगळ्याचं दर्शन त्याच्यासाठी सुरस आणि विलोभनीय होतं. रस्त्याची डागडुजी आणि शहराची स्वच्छता इ. इ. मुळंही त्यांच्या आश्चर्यात भर पडलीय. त्यामुळंच 'बोरकर की खरात' या वादाच पुसटसं सावटही चेहऱ्यावर न ठेवता जळगावकर प्रचंड सख्येनं शोभायात्रेत सामील झाले.

प्रचड शोभायात्रेनं सुरू झालेलं समेलन १०-१५ हजाराचा जिवंत माडव घेऊन पुढ सतत तीन दिवस चालू होतं. कविसमेलनाला टाळ्या होत्या. कथाकथनाला टाळ्या होत्या आणि पोपटपंची परिसंवादानाही टाळ्या होत्या. कधी आवडल्याच्या टाळ्या होत्या तर कधी 'आवरतं घ्या 'च्या टाळ्या होत्या.

संमेलनाच्या उद्घाटिका महादेवी वर्मांनी तापत्या सभोवतालाविषयी चिंता व्यक्त केली आणि आमच्यासारखे लोक टिळक, रामदास, शिवाजी याच्या महाराष्ट्राकडे आशेने पहातोय अशी अपेक्षा व्यक्त केली आणि ही अपेक्षा एक बहीण आपल्या भावाकडे करतेय असं म्हणून 'राखी 'चं आवाहन समजा अशी भावनिक गळ घालून उपस्थिताना हलवलं.

स्वागताध्यक्षानी-मधुकरराव चौधरीनी-आपल्या भाषणात मराठीच्या प्रसारावर जोर दिला व इ. स. ९८३ मध्ये पहिला मराठी शिलालेख आहे याची आठवण देऊन हे वर्ष 'मराठी भाषेची सहस्र वर्षे' म्हणून साजरे केले जावे अशी जोरदार मागणी केली.

प्रचंड मिरवणूक व भव्य स्वागत इ. नी दिपून गेलेले समेलनाध्यक्ष शंकरराव खरात जळगावकरांच्या स्वागतानं भारावून गेले. बहिष्कृत जातीं-जमातीत जन्मलेले शंकरराव डॉ. आबेडकरांप्रमाणेच 'मला या देशात भूमी कुठेय !' असंच म्हणणारे शंकरराव, तिथे कबूल झाले-

'माझा गाव मला सापडलाय !' आपला पूर्वेतिहास विसरून केवळ साहित्यिक म्हणून ज्या प्रकाराने त्याना जळगावकरानी स्वीकारलं ते पाहून ते कृतार्थ झाले. धन्य झाले. नयमाप्रमाणे भाषण वाचण्याचा पायडा मोडून त्यानी उत्स्फूर्त भाषण केले; पण पसरट वक्तृत्वामुळं ते लाबलं, प्रसगी अप्रस्तुत व कटाळवाण झालं. मात्र छापील भाषणातले मुद्दे नवीन व अपेक्षापूर्ती करणारे होते.

¤

२६ ता. ला मी जेव्हा जळगावात पोचलो तेव्हा जी. एस. ग्राउंडवर केवळ पत्रे उभे केलेले आणि डोक्यावर एक पातळ चादर घेतलेले बाबू एवढंच होतं.

आणि २८ ता. ला सकाळी १० हजाराचा माडव रंगीबेरंगी कपड्यांच्या झालरीनी सजला होता. व्यासपीठ सुशोभित झालेले. मोठमोठी गेट्स. अशा प्रकारे सजलेला हा मांडव 'बहिणाबाईनगरात' परावर्तित झाला होता आणि लोकानी फुलला होता. बाहेरच्या बाजूला ३०/३५ स्टॉल गर्दीनं भरलेले.

ह्या गर्दीला माहीत नव्हती! साहित्यिक मारामारी, जिनं पुण्या-मुंबईच्या वर्तमानपत्राचे रकाने, अग्रलेख भरले. ह्या गर्दीला माहीत नव्हतं विषयनियामक समितीच्या बैठकीतलं वादळ. ह्या गर्दीला माहीत नव्हता २० मताचा गोधळ आणि कोर्टाच्या पायऱ्याही. गर्दीला एवढंच माहीत होतं की, आपल्या गावात एक प्रचंड सोहळा आहे. लिखापढी करणारे पुण्या-मुंबईचे विद्वान येणार आहेत. भाषण देणारेत.

आजवर आपल्यालाच तिकडे जावं लागायच. तेच इकडे येतात. तर चला. चला नटून-थटून. बायको पोरासह. हे झालं सामान्यांच. धंदेवाल्यानी आपली चाल खेळली. लॉजिंग, बोर्डिंग रिक्षा सारेच दर वाढले. अशा प्रकारे उत्सव-महोत्सवाचे वातावरण. इतके उत्साहाचे वातावरण की माडवात, माडवाबाहेर कथा-दंतकथा जन्मल्या.

साहित्यसमेलन म्हणजे येणार तो साहित्यिकच ! हेडमास्तरानी पोराना आदेश दिला १५० सह्या गोळा करून आणा. पोरं वह्या घेऊन सुटली. भेटेल त्याला सही मागू लागली. प्रथम उपस्थित मान्यवराना अगदी



**व्यासपीठावर डावीकडून वामनराव चोरघडे, गं. बा. सरदार, ना. धों. महानोर, व्यंकटेश माडगूळकर, महादेवी वर्मा, शंकरराव खरात.**

¤

गहिवरून आलं... इतकं प्रेम... प्रसिद्धी ?

नंतर खरा प्रकार लक्षात येताच कलमबहादूर हात त्यांनी स्वतःच 'कलम' केले. मांडी ठोकून सह्या करतच बसले. त्यांच्या या सचोटीनं अनेकांना ताप आला. सह्यांचा घोषा चालूच राहिला आणि सहीग्रस्त पाहुण्यांनी सुटका म्हणून वि. स. खांडेकरांपासून ते भा. रा. तांबेपर्यंतच्या मराठी सारस्वताच्या दरबारातील सगळया मानकऱ्यांच्या नावे स्वाक्षऱ्या ठोकून, ते गर्दीत गुल् झाले !

गर्दी जशी वाढली तसा गर्दीलाही सूर आला. हा सूर उपहासाचा, थोडासा सत्याचा, परखडपणाचा होता. हा सूर 'प्रयोग' अकोला या संस्थेच्या पथनाटयाचा होता. झिंग च्याक झिंझि झिंग, झिंग च्याक झिंग, संमेलना चला, तुम्ही संमेलना चला. सखूबाई, साळुबाई, खंडूनाना, पांडूनाना संमेलना चला– असा उपहासाचा सूर धरत जाणारे पथनाटय गर्दीला भोक पाडतं आणि आपल्या भोवती कोंडाळं करतं. राजकारण्यांचं संमेलनावरचं वर्चस्व, साहित्यिकांची लाचारी, नेणिवा–जाणिवा क्लासिसिझम शूडोक्लासिसिझम इ. पोकळ मेंदू गंजवणाऱ्या चर्चा, परिसंवाद. साहित्यिकांचे गरम पाणी, बॅटेच्डरूमच्या नखरेल मागण्या, दारुबाज पार्टया आणि वर प्रतिमेचा ठेचा. हे सगळं उलगडत जाणारं, सेवाभावी आदरणीयांच्या पुतळयाद्वारे सामान्यांचं मन बोलणारं आणि रसिकांची बौद्धिक, प्रामाणिक, उपासमार दाखवणारं पथनाटय उत्तम सादरीकरण, अभिनय व मार्मिक संवादामुळे गर्दी खेचत राहिलं. इतकं की...

शेवटी समारोपाच्या भाषणात शंकरराव खरातांनी सरकारने विरोधी पक्षावर टीका करावी तशी टीका या नाटयावर केली. त्यांना वाईट तेवढंच दिसतं. एवढी ही गर्दी, रसिक यांना दिसतच नाहीत काय ?'

शंकररावांनी बहुधा ऐकीव माहितीवर टीका केलेली वाटली.अध्यक्ष नसते तर शंकररावांनीही त्या नाटयाच्या गर्दीत उभं राहून मान डोलावली असती ! असो. खुर्ची सत्तेची असो की अध्यक्षाची, बोटभर विरोधही खुपतो हे लक्षात आलं !

चर्चा-परिसंवादाचे विषय अगदीच शब्दबंबाळ नव्हते तरी फार आकर्षक होते असेही नाही. 'साहित्यऊर्मी' वगैरे होतीच; परंतु बहिणाबाईच्या गावात आणि नगरात 'प्रमाणभाषा–बोलीभाषा' किंवा स्त्री बोलू-लिहू लागली हे विषय मात्र फारच सयुक्तिक वाटले. या दोन्ही विषयांवरील चर्चा रंगली. प्रमाणभाषेला बोलीभाषेचं वावडं नसावं असाच सूर निघाला. बोलीभाषाच नवसाहित्य निर्माण करतेय आणि मराठी साहित्य अधिक जीवनानुभवाने समृद्ध ! एकूण काळाची पावलं ओळखून बदल करून घ्यावेत नाही तर मग ते काळच घडवून आणेल हा निष्कर्ष.

स्त्री लिहू–बोलू लागली हा परिसंवाद ह्या अधिकतमे 'स्त्रीमुक्ती' वाद्यांच्या ताब्यात होता. त्यामुळे स्त्री लिहू-बोलू लागलीच; पण चळवळीमुळे लढूही लागलीय आणि या लढयातून निर्माण होणारी भाषा आणि वाचा हे उद्याच्या स्त्रीचं चित्र असेल असं ठासून सांगितलं गेलं.

आनंदीबाई शिर्केसारख्या वयोवृद्ध लेखिकेच्या अध्यक्षीय उपस्थितीत चाललेल्या या परिसंवादात दुसरे अध्यक्ष आणि सूत्रसंचालक डॉ. अ. वा. वर्टी यांनी मात्र फालतू शेरेबाजी करून स्वतःची कुवत दाखविली. तेव्हा कुमुद पावडेंना त्यांना ७५ नंतरच्या जागृत स्त्रियांचा मोर्चा तुमच्यावर येईल असं भर सभेत भाषणाच्या सुरुवातीसच सांगावं लागलं !

याच परिसंवादात रावसाहेब कसब्यांनी स्त्री–पुरुष–विषमता नाकारताना पुरुषप्रधान संस्कृतीचाच दोष आहे असं न मानता हे सारं प्रकरण निसर्गापर्यंत नेलं आणि फर्डे भाषण करून स्त्री–पुरुष सगळयांच्याच टाळया घेतल्या, यालाच बहुधा समतोलपणा म्हणत असावेत !

कविसंमेलनाचं गुऱ्हाळ नेहमीप्रमाणेच त्यात पाडगावकर–बापट–विंदा या त्रयीने 'तेच ते आणि तेच ते' केलं. त्यामुळं त्यांना, जाणत्या रसिकांना, त्यांच्या कवितांना सलाम, काव्यगायनाला सलाम, अनेक वर्ष गायनाला सलाम आणि एक हात तोंडावर ठेवून सलाम करावा लागला !

कथा–कथनात नेहमीची माडगूळकर, मिरासदार, पाटील त्रयी नव्हती. त्यामुळं थोडया–फार बऱ्या कथा ऐकायला लागल्या आणि रमेश मंत्रीचे कथाकथनात 'चुटके' ऐकावे लागले. आजवर 'मंत्री' च मुद्दा सोडून बोलतात, अप्रस्तुत बोलतात हा शिरस्ता; पण साहित्यातले मंत्रीही कथाकथनात 'चुटके' सांगतात तेव्हा तेही कसलेले मंत्री आहेत, हे लक्षात आलं. जळगावच्या रसिकांनीही मंत्रींनी कथा न सांगता 'चुटके' सांगितले हे मंत्रींनाच जाणवून दिलं !

हे जे काही सारं चाललं होतं ते ५–१० हजारांच्या गर्दीतच. सतत तीन दिवस !

लोकांनी ऐकलं, पाहिलं आणि आवडीने सभोवताली जे मांडलं होतं, त्यातलं साहित्य 'विकत' घेतलं. पुस्तकांचा खप नाही म्हणून मोठ्या शहरात रडत बसणाऱ्या प्रकाशकांनाही कळून चुकलं की, आपणच लोकांत गेलं पाहिजे !

सोविएट पुस्तकांपासून ते रजनीशांपर्यंत आणि धार्मिक ग्रंथापासून ते थेट दिलीप चित्र्यांपर्यंतचा पुस्तकप्रवास ही गर्दी करत होती, खरेदी करीत होती इतक्यात समारोपाचा दिवस उजाडला...

...अलीकडे काही वर्षं या समारोपाच्या दिवसावर नामांतराचं सावट असायचं.

मेच्या अखेरीस अचानक उगवणाऱ्या वावटळीसारखं... मोर्चे, पत्रक, पोलीस... गोंधळ हा पाढा पाठ होत आलेला...

...जळगावलाही ३० तारखेच्या सकाळी वातावरण या सावटानं कुंद झालं...स्वागताध्यक्ष, स्वागतसमिती–सदस्य... अध्यक्ष... सारेच चिंतातूर... गर्दीच्या अगदी आतलं वर्तुळ सावध झालं... पत्रकारांनी कान टवकारले... काहींनी शोध सुरू केला. या वर्षी त्यात मंडल–आयोगाची भर... तीन तासांवर औरंगाबाद... नामांतराचा ताजा इतिहास... काय होणार ? काय होणार ?

...कमिशनर संमेलनाबाहेर १४४ लावतात... समारोपाचं सत्र सुरू होतं...आणि थोड्याच वेळात ते येतात. सहा–सहाच्या गठ्ठ्यानं, बऱ्यापैकी संख्येनं; पण... पण अगदी शांत... गोंधळ नाही. घोषणा नाही. स्वागताध्यक्ष–अध्यक्ष सामोरे जातात. भेटगाठ होते आणि मोर्चाचं नेतृत्व व्यासपीठावर मांडीला मांडी लावून बसतं. हारतुऱ्यांनी एकमेकांचं स्वागत होतं.. ठराव होत नाही. अध्यक्षांच्या समारोपाच्या भाषणात त्या प्रश्नांचा उल्लेखही होत नाही... तरी सारं सुरळीत पार पडतं !

गेली दोन–चार वर्षं अध्यक्षांना ज्या ठराव-मागण्यांनी नाकातोंडात फेस आणला; गं. बा. सरदारांसारख्या चळवळीतल्या विचारवंतालाही दखल घ्यायला 'लावली' गेली; तिथे दलितसाहित्यिक येताच उल्लेखही न येता सारं शांत राहतं ! तेव्हा मेचा महिनाच आठवला. फक्त गरजणं, बरसणं नाहीच !

...त्यामुळेच अध्यक्षपदाच्या निवडणुकीपासूनच कुंद वातावरण, धुळवड इ. इ. नं



हा सूर उपहासाचा...परखडपणाचा. ( पयनाटच–अकोला )

¤

ग्रस्त हे संमेलन, समारोपाच्या दिवशी नामांतर, मंडल–आयोगाचा ठराव गुंडाळूनही व्यवस्थित पार पडतं, तेव्हा सगळं वातावरण निवळलेलं असतं. यशस्वितेचं लख्ख ऊन पडलेलं असतं. या लख्ख उन्हातच शोधायची प्रश्नांची उत्तरं !

संमेलन यशस्वी झालं, कुणामुळं ? चौधरींच्या सुसूत्र संचालनामुळं, रसिकांमुळं की खरातांच्या निवडीनं ?

आणि शेवटच्या क्षणाच्या वादंगालाही सुरात बसविलं गेलं कुणामुळं ? समजंसपणामुळं की हितसंबंधामुळं ? जी काही उत्तरं मिळतील त्यातूनच स्वसापेक्ष संमेलनाची फलश्रुती ठरवायची, हेच समारोपाचं वाक्य असू नये काय ?

–संजय पवार

## फुलांनी सजलेले 'राजहंस' केंद्र

बहिणाबाई चौधरी नगरातच पुस्तक विक्रीची प्रदर्शने व विक्री केंद्रे (स्टॉल्स) सुरू होती. यंदा बॉम्बे बुक डेपो, मॅजेस्टिक, कॉन्टिनेन्टल वगैरे मोठ्या व नामवंत प्रकाशन संस्थांप्रमाणेच पुण्याच्या राजहंस प्रकाशनाने आपले केंद्र उघडले होते. सर्वच विक्री केंद्रांचा अनुभव समाधानकारक होता. विशेषतः धार्मिक व ऐतिहासिक पुस्तकांना मागणी चांगली होती. राजहंस प्रकाशनाच्या पुस्तकांपैकी सौ. वीणा गवाणकरलिखित एक होता कार्व्हर, डॉ. आयडा स्कडर, सुप्रसिद्ध दलित लेखक श्री. बाबुराव बागूललिखित आंबेडकर भारत या पुस्तकांना विशेष मागणी होती. वि. ग. कानिटकर यांचे अब्राहम लिंकन हे पुस्तक जूनमध्ये बाजारात येत आहे. या पुस्तकाची पूर्वनोंदणी बऱ्यापैकी झाली.

जळगाव येथील एक सुप्रसिद्ध नेत्रविशारद डॉ. बाकरे यांनी आपल्या जळगाव जवळच असलेल्या मोठ्या बागेतील गुलाबाची मोठीमोठी व वेगवेगळ्या जातीची फुले राजहंस प्रकाशनाच्या विक्री केंद्राला मांडणीप्रीत्यर्थ भेट म्हणून दिली असल्याने या केंद्राला विशेषच उठाव आला होता. आकर्षक मांडणीमुळे हजारो रसिकांचे लक्ष या विक्री केंद्राने वेधून घेतले. संमेलनाध्यक्ष श्री. शंकरराव खरात, श्री. मधुकरराव चौधरी, कवी महानोर वगैरे संमेलनाच्या प्रमुख मानकऱ्यांनी आवर्जून या विक्री केंद्राला भेट दिली व या उपक्रमाचे कौतुक केले. जळगावकरांनाही हा उपक्रम खूप आवडलेला दिसला.

राजहंस प्रकाशनतर्फे या सर्व विक्री केंद्राची जबाबदारी सौ. रेखा माजगावकर, श्री. अविनाश पाठक, श्री. शं. प. वाटवे, सौ. वंदना देशपांडे, स्मिता प्रयागी व विनायक पणशीकर या मंडळींनी सांभाळली. तरुण चित्रकार संजय पवार यांनीही आपल्या चित्रमालिका या ठिकाणी लावलेल्या होत्या. – प्रतिनिधी

# श्री. शंकरराव खरात यांच्या अध्यक्षीय भाषणाच्या निमित्ताने

वि. शं. पारगावकर

५८ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी सुप्रसिद्ध साहित्यिक आणि विचारवंत श्री. शंकरराव खरात याची निवड झाली ही या वर्षातील पहिली ऐतिहासिक घटना असून ती अत्यत स्वागतार्ह आहे. खरातांसारखा दलितलेखक साहित्याच्या बहुमानाच्या व्यासपीठावर अध्यक्ष म्हणून उभा राहावा आणि त्याने साहित्यविषयक प्रश्नांची चर्चा करून तद्विषयक विचारांना नवीन चालना द्यावी ही गोष्ट अत्यंत औचित्यपूर्ण आहे.

२८ जानेवारी १९८४ या दिवशी जळगाव येथे भरलेल्या या संमेलनाच्या अध्यक्षपदावरून श्री. खरात यांनी आपले साहित्यविषयक विचार मांडले याबद्दल त्यांचे अभिनंदन. हे विचार माडताना सुरुवातीला ते म्हणाले, 'आपल्या देशातील जातीय समाजव्यवस्थेमुळे दलित साहित्याची निर्मिती आणि वेगळेपण अपरिहार्य आहे.'

दलित साहित्यविषयक निरनिराळ्या प्रश्नांची साहित्याच्या व्यासपीठावरून चर्चा होणे आवश्यकच आहे आणि तशी ती पूर्वीपासूनच झालेली आहे. श्री. खरात यांच्या तोंडून या प्रश्नांची पुनर्वाच्यता एका अखिल भारतीय व्यासपीठावरून झाली आणि ती भारतातील मिश्र समाजापुढे, त्या प्रांतातील मोठमोठ्या विचारवंतासमोर, तशीच बहुसख्य मिश्र वाचकासमोर झाली या गोष्टीला विशेष महत्त्व आहे. त्याहीपेक्षा विशेष महत्त्वाची गोष्ट ही आहे की, या साऱ्या साहित्यविषयक प्रश्नांचा विचार आणि उच्चार श्री. खरात यांच्यासारख्या सौम्य आणि चिंतनशील व्यक्तीकडून झाला.

श्री. खरात यांचे चरित्र आणि चारित्र्य एका आदर्श भारतीयाचे आहे, ही सर्व समाजाच्या दृष्टीने एक अत्यंत आनंदाची आणि अभिमानाची गोष्ट आहे. एक दलित म्हणून खरातांच्या वाट्याला जे जीवन आले ते तर ते जगलेच आणि अजूनही जगत आहेत. त्यांनी जे भोगले ते सर्व दलितांचेच भोग भोगले; परंतु त्याच्या वाट्याला आलेल्या भोगाना त्यांनी मानवतेच्या चिरंतन विचारांची सुंदर किनार जोडलेली आहे. त्यांचे विचार चिंतनशील मानवाचे विचार जसे असायला हवेत तसेच आहेत. त्यांनी दलितांच्या प्रश्नांचा जन्मभर अभ्यास केला, अजूनही तोच अभ्यास ते करीत आहेत; परंतु हा असा अभ्यासदेखील ते एका विशिष्ट तत्त्वज्ञानाच्या भूमिकेतून करीत आहेत.

तत्त्वशीलता, वैचारिकता आणि समाजाचे चलनवलन या त्रयींना समपातळीवर आणण्याचा प्रयत्न मानव नेहमीच करीत आला आहे. त्यांनी समपातळीवर असणे ही मानवी समाजाची आदर्श स्थिती म्हणता येईल. समाजरचित मानवाचे व्यवहार हे विविध प्रकारचे असतात आणि विविध पातळ्यांवरून त्यावर सतत विचार चालू असतो. साहित्यसंमेलने ही साहित्यविषयक विचार करण्यासाठी भरत असतात आणि ती तशीच भरली पाहिजेत. त्यातला उत्सवाचा भाग वेगळा व त्यामधील इतर आनुषंगिक गोष्टीही वेगळ्या. मुख्य विचार साहित्यविषयक प्रश्नांचा आणि साहित्याच्या आविष्काराचा असायला हवा. जसे एखाद्या लग्नात अनेक गोष्टी घडत असतात; परंतु मुख्य विचार लग्नमंत्रांचाच असतो, तशीच ही गोष्ट आहे.

अध्यक्षपदावरून साहित्यिक अध्यक्ष जे विचार मांडीत असतात तोच साहित्यसंमेलनाचा गाभा असतो. त्या दृष्टीने श्री. खरात यांनी माडलेल्या विचारांकडे पाहिले पाहिजे. तसे पाहात असता त्यांचे काही विचार मुळातूनच तपासून पाहणे आवश्यक झालेले आहे. एकीकडे ते म्हणतात, समाजातील जातिव्यवस्थेनुसार दलितसाहित्याची निर्मिती आवश्यक आहे. नागरी साहित्य, ग्रामीण साहित्य आणि दलितसाहित्य असे ते साहित्याचे तीन वर्ग करतात आणि पुढे जाऊन ते असेही म्हणतात की, दलित नसणाऱ्या व्यक्तीने लिहिलेले दलितसाहित्य कृत्रिम असते. ते मनाला जाऊन भिडत नाही. ते वरवरचे असते आणि दुसरीकडे ते असेही म्हणतात की, आपल्या अनुभवाना प्रामाणिकपणे वाङ्मयरूप देणे ही गोष्ट महत्त्वाची आहे. येथे 'अनुभव' या संकल्पनेची खरातांच्या विचारपद्धतीत गल्लत होत आहे असे म्हणावे लागेल. अनुभव घेणे आणि अनुभव जगणे या दोन वेगवेगळ्या गोष्टी आहेत. त्यामुळे जो ज्या जातीत जन्म घेतो आणि त्या जातीतील जीवन जगतो तोच त्या जातीतील जीवन साहित्यबद्ध करण्यास पात्र ठरतो असा एक अर्थ या विधानाचा होतो आणि खरातांच्या दृष्टीने अशा प्रक्रियेतून निर्माण झालेले साहित्य हेच खरे साहित्य-अकृत्रिम साहित्य असते; परंतु साहित्याच्या निर्मिति–प्रक्रियेकडे पाहण्याची ही एक दृष्टी असू शकेल एवढेच म्हणावे लागेल.

## प्रतिभेचे देणे

कोणताही अनुभव जगणे आणि अनुभव घेणे या दोन स्वतंत्र प्रक्रिया आहेत आणि साहित्यनिर्मितीच्या प्रक्रियेचा जेव्हा आपण विचार करतो तेव्हा या दोन्ही प्रक्रिया आपल्याला महत्त्वाच्याच मानाव्या लागतात आणि या दोन्ही प्रक्रियांचा विचार करून देखील साहित्याचा (कलात्मक ललितसाहित्याचा) खरा प्रश्न सुटत नाहीच, हीही गोष्ट लक्षात घेतलीच पाहिजे. तो प्रश्न असा की, केवळ जीवन जगणे (भोगणे) आणि जीवन अनुभवणे ही दोन साधने साहित्यनिर्मितीस पुरी नसतात. त्या जीवनातील अनुभवांना कलात्मक रूप देऊन त्याना साहित्यकृतीचा आकार देणे ही गोष्ट अत्यत महत्त्वाची आहे. कलावंताचा किंवा लेखकाचा इथेच खरा जन्म होतो आणि तसे जर मानावयाचे नसेल तर या जगात कोट्यवधी माणसे जीवन जगत असतात व जीवनाचा अनुभव घेत असतात ते सारेच लेखक कलावंत झाले असते !

तेव्हा साहित्याच्या दृष्टिकोनातून जीवनाकडे पाहता त्यामध्ये धर्म, जाती, वर्ण, वर्ग याना काहीच अर्थ उरत नाही. अशी साहित्यनिर्मिती करीत असता लेखकाजवळ जीवनानुभव, कल्पनाशक्ती आणि प्रतिभेचे देणे असणे या गोष्टीच फक्त आवश्यक असतात. तसेच त्याचे मन विशाल मानवी जीवनाबद्दल सहानुभूती बाळगणारे असले पाहिजे! असे मन घेऊन जो लेखक बनलेला असतो त्याच्यावर सामाजिक आचार-विचाराचे, रूढीचे किंवा निरनिराळ्या जाती-जमातीच्या चौकटीचे बंधन असत नाही. असा लेखक अमुक एका जातीचा असावा लागतो किंवा अमुक एका धर्माचा असावा लागतो किंवा अमुक एक प्रकारच्या सामाजिक, राजकीय, नैतिक बांधिलकीने तो बद्ध असावा लागतो असे गृहीत धरण्याचे काहीच कारण नाही.

आपल्या साहित्याची पाळेमुळे याच मातीतून वर आली पाहिजेत. व्यंकटेश माडगूळकर यांचे साहित्य याच मातीमधून स्वाभाविकपणे वर आलेले आहे म्हणून ते अस्सल साहित्य आहे आणि म्हणूनच ते अंत:करणाला जाऊन भिडते व श्रेष्ठत्व पावते अशा अर्थाचे विचारही श्री. खरात यांनी व्यक्त केले आहेत. त्याचबरोबर साहित्याच्या समीक्षेविषयीही खरात यांनी असे उद्‌गार काढलेले आहेत– 'या दलितसाहित्यिकांना मध्यमवर्गीय पांढरपेशा समाजाची समीक्षा मान्य नाही, असे म्हटले जाते; पण मुळात मराठी समीक्षा तरी आहे काय? कारण पाश्चिमात्य मातीतून जन्माला आलेली समीक्षाच आपले टीकाकार फक्त आयात करतात.' म्हणजे आपल्या मातीतून साहित्य निर्माण होणे आणि आपल्या मातीतूनच समीक्षा निर्माण होणे आवश्यक आहे हे श्री. खरात यांना अभिप्रेत आहे.

या दोन विधानाचा फार खोल जाऊन आणि काळजीपूर्वक विचार केला पाहिजे. ही आपली माती साहित्याच्या विश्वात मोठीच दिशाभूल करणारी गोष्ट आहे! आपल्या मातीतून निर्माण झालेले साहित्य ते अस्सल आणि मनाला भिडणारे! आणि आपल्या मातीतून निर्माण झालेली समीक्षाच केवळ आपल्या साहित्याचे योग्य मूल्यमापन करणारी असे दोन अर्थ श्री. खरात यांच्या वरील विधानातून निघतात आणि 'मनाला भिडणे' हा निकषही याच दोन गोष्टी ठरवितात! म्हणजेच याचा अर्थ असा की, दलितांनी आपल्या मातीतून लिहिलेले साहित्य पांढरपेशाच्या मनाला भिडण्याचे कारण नाही किंवा ग्रामीण मातीतून निर्माण झालेले साहित्य दलितांच्या मनाला भिडण्याचे कारण नाही! म्हणजेच व्यंकटेश माडगूळकर यांच्या 'बनगरवाडी' या साहित्यकृतीची जी अनेक भाषांमधून भाषांतरे झालेली आहेत तिचे वाचन जगातील जे लोक करीत असतील त्यांच्या मनाला जाऊन ती भिडत नसणार! तसेच तिच्या श्रेष्ठत्वाचा निकषही जगातील निरनिराळ्या वाङ्‌मयप्रेमी वाचकाना येथील टीकाशास्त्रावरूनच ठरवावा लागेल. या देशाजवळ त्याचे स्वत:चे समीक्षाशास्त्र नाही हाही श्री. खरात याचा मोठाच गैरसमज आहे. शिवाय खरातांना नागरी साहित्य, ग्रामीण साहित्य आणि दलित साहित्य याचा समन्वय होणे जसे अभिप्रेत आहे तसेच पौर्वात्य आणि पाश्चात्य समीक्षेचा समन्वय होणे किंवा झालेला असणे का मान्य नसावे?

एखाद्या भारतीय शिल्पातील सौंदर्य फक्त भारतीय सौंदर्यशास्त्रामधील कसोट्या लावूनच पाहता यावे किंवा पाहावे, त्याच्याकडे विदेशी सौंदर्यशास्त्राच्या कसोट्या लावून पाहता येणार नाही असे म्हणण्यासारखे आहे. खरातांची ही वरील मते मान्य केली तर जगात आज मान्यता पावलेल्या मोठमोठ्या कलाकृतीकडे पाहताना मोठा गोंधळ उडण्याचा धोका निर्माण होईल याकडे खरात यानी लक्ष द्यावयास हवे होते.

शेवटी हेच मान्य करावे लागेल की; ललितकृती एक कलाकृती असते आणि कोणत्याही कलाकृतीकडे ती एक कलाकृती असते याच दृष्टिकोणातून पाहायला पाहिजे, पाहण्यास शिकले पाहिजे. दलितसाहित्यामध्ये अलीकडेच लिहिली गेलेली काही आत्मचरित्रे ही केवळ अस्सलच नव्हेत तर माणसाला अंतर्मुख करण्याचे मोठे सामर्थ्यही त्यांच्यात आहे. म्हणजेच याचा अर्थ असा होतो की, असे लेखन करताना कलेचे नियम पाळले गेलेले आहेत आणि त्याबरील समीक्षा देखील श्री. खरात म्हणतात तशी अभारतीय असली तरी ती आत्मचरित्रे त्या कसोटीवर पूर्णपणे उतरलेली आहेत. असेच दलित कवितेबद्दलही म्हणता येईल नारायण सुर्वे याची कविता मान्यताच पावलेली नाही तर तिने मराठी साहित्य समृद्ध केलेले आहे, असेच इतर साहित्याबद्दलही म्हणता यायला हवे आणि खरात म्हणतात त्याप्रमाणे सर्व साहित्य जेव्हा समन्वयाच्या पातळीवर येईल तेव्हा हे घडून येईल. त्यासाठी अजून वाट मात्र पाहावयास हवी.

शेवटी श्री. खरात याच्या अध्यक्षीय भाषणाच्या निमित्ताने जे विचारमथन झाले व होईल तीच त्याची फलश्रुती! ☐

---


"विकासकार्याचा खरा अर्थ लोकांचा विकास इतर कुणी, सरकारने किंवा खाजजी संस्थांनी, घडवून आणणे असा नसून लोकांना विकासासाठी सिद्ध करणे, त्यांच्यामध्ये विकासक्षमता निर्माण करणे असा आहे. असे झाले नाही तर विकासाचे प्रयत्न आणि परोपकार यात फरक उरणार नाही. म्हणजे कार्यकर्त्याला शेवटी झगडावे लागणार आहे ते समाजाच्याच काही विकासविन्मुख प्रेरणांशी. हा संदेश या पुस्तकात स्पष्ट आहे आणि तेच त्याचे मोल आहे."

**डॉ. स. ह. देशपांडे**
अध्यक्ष, मराठी अर्थशास्त्र परिषद

# श्रीग्रामायन

**लेखक : श्री. ग. माजगावकर । राजहंस प्रकाशन पुणे । मूल्य पंचवीस रुपये**

# आईवडिलांच्या सहवासात

श्रीमती व्हेरा शर्मा । मराठीं रुपांतर : सत्वशीला सामंत

माझ्या आयुष्यातल्या सर्वांत जुन्या आठवणी मी दोन वर्षांची झाल्यापासूनच्या आहेत. त्या वेळी आम्ही पुण्याला कँपातल्या एका बंगल्याच्या अर्ध्या भागात राहात होतो. त्याचं आवार खूप मोठं होतं. आमच्या घरात एक नोकराणी होती; पण तरीही माझी आई स्वत:च मला जेऊ-खाऊ घालीत असे. दिवसभरातलं माझं दुसरं जेवण अगदी संध्याकाळीच आटपत असे. एका छोटया टेबलावर माझं जेवण चाले. त्यावर चार कोपऱ्यांवर ससांच्या चित्राचं कशिदाकाम केलेली एक चादर पसरलेली असायची. इतर लहान मुलांप्रमाणेच मीही जेवताना टंगळमंगळ करीत असे. मग मला भरवताना आईचा माझ्याबरोबर एक खेळ सुरू व्हायचा. हा घास काऊचा, हा घास चिऊचा या चालीवर हा घास मुंबईचा हा घास पुण्याचा, एक घास मद्रासचा, एक घास दिल्लीचा करत करत जेवणाचा कार्यक्रम संपे. कधी कधी गावांच्या नावांऐवजी माझ्या छोटया मित्रमैत्रिणींच्या नावांची, तर कधी माझ्या बाहुल्यांच्या नावांची जंत्री व्हायची.

माझी आईच मला आंघोळ घाली. ती मला साबण लावून जेव्हा कोमट पाणी अंगावर घाली तेव्हा मायेने ओथंबलेल्या तिच्या हाताचा स्पर्श किती मृदु होता त्याचं खरोखरी नुसत्या शब्दांत वर्णन करणं कठीण आहे.

माझी आई आणि माझे वडील दोघंही माझं खूप कोडकौतुक करीत-आयाबरोबर फिरून येताना किंवा आवारात हुंदडताना सुद्धा ज्या काही चीजवस्तू माझ्या हाताला लागत त्या मी घरी आल्यावर त्यांना दाखवी -मग तो एखादा ओबडधोबड दगड असो वा एखादं सुंदर रानफूल असो वा पिवळंधम्मक फुलपाखरू असो-या माझ्या साऱ्या खजिन्याचं त्यांना फार कौतुक वाटे. 'शी:, ते घाण आहे, फेकून दे ते!' असं इतर आई-वडिलांसारखं ते मला कधी म्हणाले नाहीत. त्यामुळे माझा कधी हिरमोड झाला नाही आणि त्यांच्याप्रमाणेच माझ्याही मनात भोवतालच्या निसर्गातल्या प्रत्येक वस्तूविषयी कुतूहल जागृत झालं व निसर्गप्रेमही वाढीला लागलं.

याच सुमारास आम्ही मुंबईच्या कँडेल-रोडवरील एका छोटयाशा बंगलीत राहावयास आलो. मला तो एक नवीनच अनुभव होता. भोवताली ताड-माडाची गर्द राई व जवळच समुद्र. माडांच्या झावळांची सळसळ, त्यांच्या हलक्या सावल्या आणि दुरून ऐकू येणारी समुद्राची गाज-हे सगळं मला अजून आठवतं. आई मला समुद्रकिनाऱ्यावर फिरायला नेत असे. माझ्या निरागस डोळयाना ती वाळू नाना प्रकारच्या रत्नांनी चमचमतेय असं वाटे. आम्ही तऱ्हतऱ्हेचे शंखशिंपले गोळा करीत हिंडत असू. सुदर सुदर आकआकाराच्या व नाना रगांच्या चित्रविचित्र शिंपा हाती लागत. आपल्या पुस्तकांसाठी ऑर्डरी मिळवण्याकरता दिवसभर वणवण करून माझे वडील थकले-भागलेले असले तरी आमच्यासाठी ते थोडी तरी फुरसत काढीत व त्या दिवशी सापडलेला एखादा नवलाईचा शिंपला कौतुकाने न्याहाळीत. साधारणपणे सकाळचा स्वयंपाक आटपल्यानंतर प्रत्यक्षात जेवण व्हायला अवकाश असे. त्या मधल्या वेळात आम्ही समुद्रावर जात असू. मी लाटांशी बागडे आणि आई दूर बसून माझ्यावर नजर ठेवी व तेथेच वाळूचे मनोरे करीत बसे.

या काळात माझी समुद्राशी पहिली ओळख झाली म्हणून हा 'बाळपणीचा काळ सुखाचा' माझ्या आठवणीत राहिला; पण त्याचबरोबर धार्मिक कर्मठपणाशीही माझा पहिला सामना झडला म्हणून देखील या काळातील कटु आठवणींची चव माझ्या मनात कायमची रेंगाळत राहिली.

तो दिवस माझ्या स्मरणातून कधीच पुसला जाणार नाही. शेजारच्या घरी मला नेहमी बोलावीत. एकदा मी त्यांच्या घरी गेले होते. सहज स्वयंपाकघरात गेले तर तेथे एक तांबडया जास्वंदीचं फूल देव्हाऱ्याबाहेर पडलेलं मला दिसलं. माझ्या घरात मला नीटनेटकेपणाचं वळण होतं आणि कोणालाही मदत करावी अशी शिकवणही मिळाली होती. अभावितपणेच मी ते फूल उचललं- देव्हाऱ्यात देवाजवळ ठेवलं. ते बघता क्षणीच घरातल्या बायकांनी एकच गदारोळ केला. मी बावरले, घाबरले आणि रडतरडत घराकडे धूम ठोकली. मी घरात शिरले तेव्हा माझे वडील काही तरी लिहीत बसले होते. मला आणि माझ्या भावाला जरा थोडसं दुखलंखुपलं की, ते लगेच अस्वस्थ होत. घडलेला प्रकार आईला सागत असताना त्यांनी तो ऐकला. ते संतापाने लालबुंद झाले आणि तडक शेजारच्या घरी गेले आणि त्यांनी ठणकावून सुनावले, 'तुम्ही काय म्हणून त्या अजाण मुलीला रागे भरला?' आमची बाजू बरोबर असली की आमचे वडील नेहमी आमच्या बचावासाठी धावून येत. कितीही कामात असले तरी त्यांनी कधी वेळ नसल्याची सबब सांगितलीच नाही.

## कोरलेल्या आठवणी !

या काळात केव्हा तरी माझ्या वडिलाना तपासणीसाठी के. ई. एम. हॉस्पिटलमध्ये राहावे लागले. मला आठवतं की, मी रोज माझ्या आईबरोबर तेवढं सबंध अंतर पायी चालून वडिलाना भेटायला जात असे. आईचा हात धरून, न कंटाळता, हट्ट न करता, एवढया लहान वयात मी पायी पूल ओलांडून त्यांना भेटायला येते हे पाहिलं की त्यांना भडभडून येई.

मग आम्ही पुण्याला परतलो. एव्हाना आम्ही इतरापेक्षा काही तरी वेगळे आहोत याची मला त्या कोवळया वयातही जाणीव होऊ लागली होती. पोलोग्राउंडवर रोज संध्याकाळी फेरफटका करण्यासाठी मला नेण्यात येई. तेथे बरीच लहान मुलं, त्याना सांभाळण्यासाठी ठेवलेल्या आयांबरोबर मैदानात खेळायला येत. बहुतेक जण इंग्रजी सोजिरांची मुलं असत. आम्हा दोन-तीन वर्षांच्या मुलांना वर्णभेद काही कळत नसे. एकदा मात्र एका इंग्लिश मुलाची आई तेथे आली. तिने मला त्याच्याबरोबर खेळताना पाहिले. त्याबरोबर 'आपल्या मुलाला त्या

काळचा पोरीबरोबर [खेळायला सोडायचे नाही' असे तिने आयाला बजावले. माझे वय कोवळे असल्याने हा घाव जिव्हारी लागला. तेव्हापासून मी बहुतकरून स्वतःचा जीव स्वतःच खेळवू लागले व जास्तीत जास्त वेळ आपल्या कुटुंबियांच्या सहवासात घालवण्याची मला सवय लागली. त्या वेळी आम्ही सर्व अगदी एकदिलाने राहात होतो व एक कुटुंब म्हणूनच आम्ही बाहेरच्या जगाशी मुकाबला केला.

पाचव्या वर्षी मी जवळच्या 'मेथॉडिस्ट मिशन स्कूल' मधील बालवर्गात जाऊ लागले तेव्हा माझे रीतसर शिक्षण सुरू झाले. या शाळेतील बहुतेक मुले अँग्लो-इंडियन व इंडियन-ख्रिश्चन होती. मी हिंदु असून त्यांच्या समजुतीनुसार मूर्तिपूजक असल्याने मुले मला चिडवीत. माझी आई गोरी असून मी काळी कशी असा प्रश्न ती मुले मला विचारीत. माझे वडील फक्त पुस्तके लिहून कुटुंबाची गुजराण कसे करू शकतात हेही त्यांना एक कोडेच वाटे. कारण त्यांच्यापैकी कोणाचेही वडील अशा प्रकारचा व्यवसाय करीत नसत. माझ्या शाळासोबत्यांना खरे बोलण्याची सवय नव्हती. त्याकारणाने, 'माझे वडील मला मारत नाहीत' असे मी सांगितले तर ते त्यांना खरे वाटत नसे. प्रत्यक्षात माझ्या वडिलांनी माझ्या अंगावर कधी हातही उगारला नाही. क्वचित् प्रसंगी ते नाराज झालेच तर, त्यांनी नुसत्या रागाने एक कटाक्ष फेकला तरी मला पुरेसे होई. एकंदरीत माझ्याकडून ज्यांना विशेष काही ऐकायला मिळाले तर हवे होते अशा मुलांखेरीज इतर कोणी फारसे माझ्या वाटेला जात नसे. माझे शालेय जीवन फारसे सुखावह नव्हते. घरातच मला काय तो आनंद मिळे.

तीन वर्षे कशीबशी काढल्यावर दैवाने खैर केली आणि मी आजारी पडले. मला शाळेतून काढावे व भरपूर विश्रांति घेऊ द्यावी व मोकळ्या हवेवर न्यावे असा डॉक्टरांनी सल्ला दिला. याही वेळी इतर पालकांप्रमाणे माझ्या आईवडिलांनी डॉक्टरांचा सल्ला मानण्यास काकू केले नाही. त्यांनी ताबडतोब शाळेतून माझं नाव काढलं. आता माझ्या आयुष्यातील 'सर्व सुखाचा काळ' सुरू झाला. सकाळी लवकर उठण्याचा तगादा बंद झाला. मला रोज भरपूर, साधंच पण सत्त्वयुक्त अन्न मिळू लागलं. माझा अभ्यास घेण्याची जबाबदारी आईनं आपल्या अंगावर घेतली. आकाशनीमच्या ( नीमचमेली-आकाशनाम ) झाडाखाली बसून आई मला शिकवीत असे. आई एक लहानश्या बैठ्या खुर्चीत बसे आणि मी खाली सतरंजी टाकून तीवर बसत असे. हिवाळ्यात झाडावरून फुलं गळून पडली की त्या वासानं सगळं वातावरण सुगंधित होऊन जाई. आई मला इतिहास, भूगोल, इंग्लिश-गद्य, पद्य व व्याकरण यातले धडे वाचून दाखवी. तोंडी गणिताचे हिशेबही आम्ही तेथेच करत असू. लेखी गणित मात्र घरात बसून करी. त्याशिवाय आई मला बालवाङ्मयातील सुंदर सुंदर गोष्टी वाचून दाखवीत असे. अंकगणित व व्याकरण सोडून इतर विषय मला आईकडे बसून शिकताना खूप मजा वाटे.

एव्हाना दोन घरे बदलून आम्ही गोळीबारमैदानासमोर 'पर्वती व्हिला' या पत्त्यावर राहायला गेलो होतो. तेव्हा तेथे एक उजाड माळरान होते. लांबवर काही टेकड्या होत्या व मागे सिंहगड उभा होता. या भागात अधूनमधून घरांचे ठिपके दिसत. हाच भाग पुढे 'सॅलिसबरीपार्क' या नावाने ओळखला जाऊ लागला. या मोकळ्या मैदानात मी मनसोक्त भटकून, रंगीबेरंगी खडे, बेडक्या व सुरवंट गोळा करी. कधीकधी दवबिंदूंनी भिजलेली छोटीछोटी रानफुलेही सापडत. ( लहान मुलं सर्वार्थांनी धरणीमातेच्या अधिक निकट असल्याने त्यांना ही असली फुलं सहज सापडतात, मोठ्या माणसांना अशा फुलांसाठी मुद्दाम वाकावे लागते ! ) कुत्रे हे देखील माझे सोबती होते-अजूनही त्यांची-माझी गट्टी जमते.

आमची आर्थिक परिस्थिती ओढगस्तीची आहे याची मला जाणीव असली तरी वडिलांच्या कर्तबगारीबद्दल मला इतका विश्वास होता की, काय वाटेल ते झालं तरी परिस्थितीवर ते मात करतील अशी मला खात्री वाटे. त्यामुळे एकंदरीत आयुष्याचा हाही काळ आनंदाचाच गेला.

मी सात-आठ वर्षांची असताना एकदा खडकवासल्याला आम्ही आठवडाभर राहून खूप मौजमजा केल्याचे आठवते. तलावाची आणि विश्रामधामांतील बागेची शोभा तर काय वर्णावी ! इथेच प्रथम मला खंड्या पक्षी भेटला. एक दिवस माझे आईवडील



**श्रीमती व्हेरा शर्मा**

¤

चालू वर्ष हे ज्ञानकोषकार केतकरांचं जन्मशताब्दी वर्ष आहे. (जन्मदिन : २ फेब्रुवारी १८८४ ) त्यांची कन्या श्रीमती व्हेरा शर्मा यांनी लिहिलेल्या या काही लहानपणीच्या आठवणी.

श्रीमती व्हेरा शर्मा या लेखिका आहेत व त्यांचे आजवर इंग्रजीतून कथासंग्रह व कवितासंग्रह प्रसिद्धही झालेले आहेत.

¤

व्हरांड्यात आराम करीत बसले होते. किसलेलं सुकं खोबरं आणि साखर मिसळून रंग घालून मी त्या मिश्रणाला गुलाबी रंग आणला होता आणि मी पुडिंग करण्यात दंग होते. माझ्या पाणी प्यायच्या फुलपात्रात मी ते मिश्रण ठासून भरलं आणि मग एका बशीत ओतून पसरलं. किती छान केकसारखं दिसत होतं ते ! मग आईवडिलांना ते देण्यापूर्वी एकदा चव घेऊन पाहावी म्हणून ते चाखून पाहिलं. खोबरं खवट झालं होतं. मी ते थुंकून टाकलं. त्याच वेळी आईचं माझ्याकडे लक्ष गेलं आणि मी काय करतेय याची ती चौकशी करू लागली. मी ते पुडिंग घेऊन तिच्याजवळ गेले. दोघांनाही त्याचा आकार, रंग पाहून कौतुक वाटलं. तेव्हा 'तुम्ही खाऊन पाहाणार का ?' असं मी त्यांना भीत-भीत विचारलं. दोघे उत्साहाने कबूल झाले आणि ते खाऊन त्यांनी आणखीच कौतुक केलं. माझा विरस होऊ नये म्हणून त्यांनी ते खवट खोबरंसुद्धा आनंदानं गोड करून खाल्लं; पण मला मात्र त्याचं फारच नवल वाटत राहिलं.

### आई-वडिलांचं नातं

मी काहीही नवीन करायला शिकले की, माझे आईवडील मला मनापासून उत्तेजन देत. मातीची चित्रं करण्यात मला रस वाटू लागला तेव्हा वडिलानी मला गणपतीच्या कारखान्यात वापरतात ती शाडूची माती आणून दिली. माझी चित्र त्यानी आपल्या एका कलावंत मित्राला श्री. नी. म. केळकर यांना दाखवली. छापखान्यात पुस्तकबाधणी करताना कापून वाया जाणारे कागदाचे कपटेदेखील ते मला आणून देत. दारावर येणाऱ्या पुस्तकविक्रेत्याकडून गोष्टीची जुनी पुस्तके विकत घेऊन आई मला ती वाचायला देत असे. शक्यतो त्यांनी आमची कोणतीही हौस-मौज पुरवण्याचं बाकी ठेवलं नाही.

विशेषत: मला माझ्या वडिलांबरोबर फिरायला जाणे आवडे. त्याना जेव्हा विशेष काही चिंतनमनन करायचे नसे तेव्हा ते मला आपल्याबरोबर घेऊन जात. अशा वेळी ते माझ्याशी खूप गप्पा मारीत आणि गप्पाच्या ओघात फुले, पाने, किडे, जीवजंतू आणि झाडे यांची भरपूर माहिती देत. आमच्याबरोबर कुत्राही असे. माझ्या वडिलाना कुत्र्याचे वेड होते व त्यानाही वडिलाचा लळा होता. त्यांना माजराचीही भारी आवड होती. आमची माजरी तर रस्त्याच्या कोपऱ्यावर उभी राहून त्याची वाट पाही आणि ते आले की तेथून त्यांना घरापर्यंत सोबत करी.

मी दहा वर्षांची असताना त्यानी माझ्यासाठी तमाशातला एक नृत्यशिक्षक ठेवला. त्या काळात मुलीनी नृत्यकला शिकणे फारसे शिष्टसंमत मानले जात नसे. तथापि हे शिक्षक फार चांगले होते व त्यांनी मला काही नाच शिकविले. माझ्या आईनेदेखील मला पाश्चात्य पद्धतीची काही बालनृत्ये शिकवली होती.

त्या वर्षाच्या अखेरीस मी पुन्हा शाळेत जावं असं ठरल. माझ्या आईवडिलानी मला अनेक शाळांतून नेऊन हिंडवले व त्यांच्यापैकी मला कोणती पसत पडते ते पाहिले. शेवटी एकदाची मी पुन्हा शाळेत दाखल झाले. तेव्हा पंख छाटलेल्या पाखरागत माझी केविलवाणी स्थिती झाली. शिक्षकाची शिकवण्याची पद्धती मला कंटाळवाणी वाटे. मी कोणामध्ये फारशी मिसळत नसे, कारण एकंदरच माझा स्वभाव काहीसा संकोची होता; पण या वातावरणाशी जमवून घेतलंच पाहिजे असं माझ्या मनानं घेतलं आणि अखेरीस मी रुळले देखील.

अनेकदा पुस्तक-विक्रीसाठी वडील बाहेरगावी जात. ते गावाला गेले की, आम्हाला अजिबात करमत नसे. पोस्टकार्डे विकत घेण्यात वेळ जाऊ नये म्हणून आईने आधीच त्यांच्याकडे पत्ता लिहिलेली कार्डं दिलेली असत. त्या कार्डांवर मजकूर लिहून, बहुधा दर दिवशी एक या क्रमाने ते पत्रं धाडीत. ते परतून कधी येतात अशी आमच्या मनाला उत्सुकता लागून राहिलेली असे. ते कधी रिकाम्या हाताने परतले नाहीत. नेहमी ते आमच्यापैकी प्रत्येकासाठी काही ना काही तरी, छोटीशी का होईना एक भेट आणीत. मग ती साबणाची रंगीत पेटी असो वा रस्त्यावर स्वस्तात मिळालेला रुमाल असो वा मण्याची माळ असो.

माझे आईवडील एकमेकांशी राजकीय व सामाजिक प्रश्नासंबंधी चर्चा करीत त्या वेळी मी जवळ बसून खेळत असे; पण माझे कान तिकडे असल्याने आपोआपच माझ्यावर ज्ञानाचे सस्कार होत. कित्येकदा वडील मला भारतीय पुराणातल्या कथा सांगत आणि वेळ मिळाला की, माझ्याशी खेळत. त्यांची कचेरीदेखील आमच्या घरातच होती; पण एकदा ते कचेरीत शिरले की, मग त्यांच्या कामात अजिबात व्यत्यय आणायचा नाही हे लवकरच मला कळू लागल.

दुपारच्या वेळी आई मुबईकडची वर्तमानपत्रं वाची. मी शाळेत जात नव्हते तेव्हा ती महत्त्वाच्या जागतिक घडामोडी समजावून सागे. रोज सकाळी मराठी वर्तमानपत्र देखील घरात येत असे व माझे वडील त्यात त्यांच्याविषयी आलेली टीकाटिप्पणी तिला फोड करून सागत. ही टीका चुकीची व अन्याय्य आहे असे तिला वाटले की, ती फार अस्वस्थ होऊन जाई; पण वडील ते सर्व हसण्यावारी नेत.

### शेवटचा वज्राघात !

दुर्दैवाने, पुढे पुढे माझ्या भावाच्या वागणुकीमुळे आईचा मनस्ताप वाढत गेला आणि तिची तब्येत खालावू लागली. तिची बहीण मुबईत होती. तिच्याकडे तिने काही दिवस विश्रांतीसाठी जावे असे आमचे ठरले. त्याच वेळी बुटातील खिळा लागून वडिलांच्या पायाला दुखापत झाली होती. त्यामुळं आई त्याना सोडून जाण्यास राजी नव्हती; पण 'आपण होमिओपॅथीच्या एका स्त्रीवैद्याकडून उपचार करून घेत आहोत, काळजीचे कारण नाही' असं सांगून वडिलानी तिनं मला बरोबर घेऊन मुबईला जावे असा आग्रह धरला. त्याप्रमाणे आम्ही मुंबईला गेलो. दहा दिवसांनी परतलो. पाहतो तो काय, वडिलाचं दुखण गंभीर झालं होतं. पायाला ठणका बसत होता आणि काठीच्या आधारानं ते लंगडत चालत होते. दुर्दैव असं की, त्याच वेळी त्या डॉक्टरणीने 'नातेवाइकाच्या लग्नानिमित्त आपण दहाबारा दिवस बाहेरगावी जात आहोत व त्या अवधीत ससून हॉस्पिटलमध्ये उपचार करून घ्यावेत असे कळवले. ससूनमधील डॉक्टरांनी त्याना तेथेच ठेवून घेतले. दुर्दैवाचा कळस म्हणजे त्या दहा दिवसांतच हॉस्पिटलच्या हयगयीमुळं त्यांच्या जीवनाची इतिश्री झाली !

माझ्या आईवर आणि माझ्यावर खरोखरी वज्राघात झाला ! एका क्षणात आम्ही उघड्या पडलो. माझ्या आईने कचेरी चालू ठेवण्याचा निष्फळ प्रयत्न केला; पण कर्जाचं ओझं वाढतच होतं, त्यामुळं शेवटी अर्थार्जन करण्यासाठी आम्हाला पुणं सोडून मुंबईला यावं लागलं. माझी मावशी अविवाहित होती व ती 'वोलकार्टब्रदर्स'मध्ये त्यांच्या 'हाउसजर्नल'ची सपादक म्हणून नोकरी करीत असे. तिनेच आम्हाला त्या त्या पडत्या काळात आधार दिला. माझी आई कारकुनी कामदेखील करी. मी व आई घरोघरी जाऊन वडिलांची पुस्तके खपवण्यासाठी प्रचार करत हिंडत असू.

याच दरम्यान, मराठी वृत्तपत्रात व मासिकात वडिलाविषयीचे लेख येऊ लागले. आमचा कारकून ते आम्हाला वाचून दाखवी. त्यांच्या स्मृतीला वाहिलेले काही विशेषाकही निघाले; पण त्यातही बहुधा चुकीची व विपर्यस्त माहिती दिलेली असे. मात्र या सर्वांवरून वडिलाचे खरे मित्र किती होते ते लक्षात आले. असे फार थोडे. बहुतेक सर्व मित्रत्वाची खोळ पांघरलेले प्रच्छन्न शत्रूच होते ! आता केतकराचे निधन होऊन त्यांच्यामागे परदेशी पत्नी व अजाण मुलगी याच्याशिवाय दुसरे कोणी राहिले नाही, ही सधी साधून त्या सर्वांनी आपले रूप दाखवायला सुरुवात केली.

अनेक वर्षांनी एका नियतकालिकात कोणी तरी लिहिले- श्री. केतकर वारले आणि त्याची मुले आपल्या आईला सोडून निघून गेली.' हे लिहिण्याच धाडस झालं याच कारण म्हणजे आम्ही ब्राह्मणाच्या पोटी जन्मलेली पण केतकरदापत्याने दत्तक घेतलेली मुले होतो ! (ही वस्तुस्थिती मला माझ्या ९ व्या वर्षी समजली.) पण सत्यस्थिति अशी आहे की, मी आणि माझी आई आम्ही कधीच एकमेकींना अंतर दिलं नाही. २२ नोव्हेंबर १९७९ रोजी तिचा मृत्यू झाल्यानेच केवळ या लौकिक जगाच्या दृष्टीने आमची ताटातूट झाली ! ☐

## मध्यावधी निवडणुका

# अंतर्गत बंडाळ्यांमुळे खिळखिळी झालेली इंदिरा काँग्रेस आणि X फाजील महत्त्वाकांक्षेने पछाडले गेलेले काही विरोधी वृद्ध नेते

अभय गोखले

पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी लोकसभेच्या निवडणुका (मध्यावधी) बहुधा एप्रिल महिन्यात घेण्याची शक्यता नाकारता येत नाही. पंतप्रधान वारंवार आपला मध्यावधी निवडणुका घेण्याचा विचार नाही असे सांगत आहेत. त्यामुळे तर मध्यावधी निवडणुका एप्रिलच्या सुमारास घेतल्या जातील ही शंका बळावली आहे. यंदा पीकपाणी चांगलं आलंय. शिवाय पोटनिवडणुकांचा निकाल पहाता जास्त वेळ घालवला तर विरोधी पक्ष एक होतील (त्यांना वेळ मिळेल) व कांग्रेस (इं.) ला परिस्थिती प्रतिकूल बनेल या भीतीपोटी निवडणुका (लोकसभेच्या) लवकरात लवकर घेण्याचा पंतप्रधानांचा प्रयत्न राहील. केंद्र सरकारने कर्मचाऱ्यांना वेतन वाढवून दिलं. त्याचा वार्षिक पाचशे कोटी रुपयांचा बोजा शिरावर आहेच. त्यामुळे तीन–चार महिन्यांत महागाईही वाढेल. त्याच्या आत निवडणुका घेणे इंदिरा कांग्रेस पक्षाला क्रमप्राप्त झाले आहे. कोणत्याही परिस्थितीत येत्या दोन महिन्यांत जीवनावश्यक वस्तूंच्या किंमती खाली आणण्याचा आटोकाट प्रयत्न होईल. कलकत्त्याच्या कांग्रेसच्या अधिवेशनात राज्याराज्यांतील नेत्याना मध्यावधी निवडणुकांची स्पष्ट कल्पना देण्यात आली असून आपापसातील भांडणे मिटवून खेडोपाडी दौरे आखण्याच्या सक्त सूचना देण्यात आल्या आहेत. लोकाचे वाढती महागाई, भ्रष्टाचार, ढासळती कायदा व सुव्यवस्था यावरून लक्ष उडावे म्हणून पाकिस्तान अमेरिकेकडून घेत असलेल्या शस्त्रास्त्राचा बागुलबोवा निर्माण करण्यात येत असून पाकिस्तानकडून आक्रमणाची शक्यता असल्याची खोटीच आवई उठवण्यात येत आहे. त्यासंबंधीची पत्रके इंदिरा कांग्रेस खासदारांकडून नेहमीप्रमाणे काढली जात आहेत.

नुकत्याच पार पडलेल्या पोटनिवणुकांचे निकाल पाहता इंदिरा कांग्रेस व विरोधीपक्ष, दोघानीही हुरळून जाण्याचे कारण नाही. सोनेपत (लोकसभा) व उत्तरप्रदेशातील दोन; हरयाणातील एक, राजस्थानमधील एक व पश्चिम बंगालमधील दोन, बिहारमधील एक अशा विधानसभेच्या जागा जिंकून इंदिरा कांग्रेसने समाधानकारक कामगिरी केली असली तरी उत्तरप्रदेशातील तीन विधानसभेच्या जागांबरोबरच बुलंदशहर, बेट्टीहा या लोकसभेच्या दोन जागा कांग्रेस (इं)ला गमवाव्या लागल्या, त्यासुद्धा विरोधकात एकजूट नसताना हे महत्त्वाचे. त्यामुळे समाधानकारक कामगिरी केल्याचा निर्भेळ आनंद कोणालाच लुटता आला नाही. सोनेपत येथे जर लोकदल–भाजप व जनता यांच्यात समझोता झाला असता तर जनताचे देवीलाल हे पन्नास हजारावर मताधिक्य मिळवून निवडून आले असते. समझोता न झाल्यानेच इंदिरा कांग्रेसचा उमेदवार थोडयाशा मताधिक्याने निवडून आला. बुलंदशहर व बेट्टीहा येथील अनुक्रमे जनता व सी. पी. आयचे विजयी उमेदवारही, त्या ठिकाणी विरोधीपक्षांचा एकच उमेदवार असता तर त्याहीपेक्षा बऱ्याच मताधिक्याने विजयी झाले असते. लोकदल–भाजप आघाडीचा या पोटनिवडणुकीत फारसा प्रभाव पडला नाही. बुलंदशहर या जाटांच्या मतदारसंघात चरणसिंग आपल्या उमेदवारास निवडून आणू शकले नाहीत, अगदी भाजपचा पाठिंबा असूनही. इंदिरा कांग्रेस व लोकदलाचा उमेदवार मुस्लिम होता त्यामुळे जनताचा हिंदु उमेदवार निवडून आला हे स्पष्टीकरण पटण्यासारखे नाही. या मतदारसंघात जनताचा विजयी उमेदवार व लोकदलाचा उमेदवार या दोघाची मते एकत्र केली तर ती इंदिरा कांग्रेस उमेदवारापेक्षा बरीच जास्त होतात. मात्र जनताचे उमेदवार माजी मुख्यमंत्री बनारसीदास याचा विजय (चरणसिंगाच्या जाट बालेकिल्ल्यात), इंदिरा कांग्रेस व भाजप–लोकदल आघाडीला चक्रावून टाकणारा होता. जनताला तर या विजयाचा सुखद धक्काच बसला असेल ! या जनता उमेदवाराच्या विजयाचा दूरगामी परिणाम म्हणून लोकसभेच्या मध्यावधी निवडणुकात जनता पक्षाला लोकशाही युती (भाजप–लोकदल) बरोबर उत्तरप्रदेशात सन्माननीय तडजोड जागावाटपाच्या बाबतीत करता येईल. सोनेपत येथेही जनता उमेदवाराचे लोकदल–भाजप आघाडीच्या उमेदवाराहून जास्त मते (जवळजवळ दुप्पट मते) मिळवल्याने लोकसभेच्या मध्यावधी निवडणुकांत हरयाणात जनतापक्ष, लोकशाही आघाडीशी निवणूकसमझोता झाल्यास जास्त जागा मागेल. मात्र उत्तरप्रदेश, बिहार, राजस्थान येथील विधानसभेच्या पोटनिवडणुकात जनता पक्षाच्या बहुतेक सर्व उमेदवारांच्या अनामत रक्कमा जप्त झाल्या. सर्व विधानसभा पोटनिवडणुकात जनता पक्षाला फक्त पाच टक्के मते मिळाली, ही कामगिरी त्या पक्षाला भूषणावह मुळीच नाही! विधानसभांच्या पोटनिवणुकांतील लोकशाही आघाडीची कामगिरी बरी

असली तरी लोकसभेच्या तिन्ही जागावर आघाडीचा उमेदवार तिसऱ्या स्थानकावर फेकला गेला. पश्चिम बंगालच्या दोन विधान-सभा पोटनिवडणुका जिंकून इंदिरा काँग्रेसने तेथे भरीव कामगिरी केली असेच म्हणावे लागेल. वाढती महागाई, ढासळती सुव्यवस्था या गोष्टीमुळे बंगालमधील डाव्या आघाडीचे सरकार दिवसेंदिवस अप्रिय होत चाललंय. त्यातच डाव्या–आघाडीतील घटकपक्ष आर. एस. पी. फॉरवर्ड ब्लॉक इत्यादी मार्क्सवादी कम्युनिस्टाच्या कारभारावर संतुष्ट नाहीत. सतत काही तरी कुरबुरी चालू असतात. या दोन पोटनिवडणुकात मार्क्सवाद्याच्या सहकारी पक्षानी अप्रत्यक्षपणे इंदिरा काँग्रेसला मदत केली असण्याची शक्यता नाकारता येत नाही. मुख्यमंत्री ज्योती बसू यानी केंद्राबाबत जे सौम्य धोरण अवलंबिले आहे ते इतर सहपक्षाना मान्य नाही. त्यातच मार्क्सवादी पक्षात तरुण तुर्कांचा एक गट निर्माण झाला असून तो सतत आपल्याच सरकारला आडून जाब विचारत असतो.

## रामारावांची आडमुठी भूमिका

पतप्रधान इंदिरा गांधी यांनी एप्रिलमध्ये मध्यावधी निवडणुका (लोकसभेच्या) घेतल्यास काय निकाल लागेल ते आताच स्पष्टपणे सांगता येणार नाही; परंतु चंद्रशेखर, चरणसिंग, मोरारजी देसाई, वाजपेयी याची वक्तव्ये पाहता विरोधक एकत्र येतील हे ठामपणे सांगता येणार नाही. शिवाय ते जरी एकत्र आले तरी जागा–वाटपाचा प्रश्न सोपा नाही. त्यातून पुन्हा आयत्या वेळेस बंडखोरी होणारच नाही हे कशावरून ? ज्या आंध्रप्रदेशाच्या मुख्यमंत्र्यावर विरोधी पक्ष दक्षिणेत भिस्त ठेवून आहेत त्या एन. टी. रामारावने मध्यंतरी घोषणा केली आहे की, त्याचा तेलगुदेशम पक्ष आंध्रमधील लोकसभेच्या सर्वच्या सर्व (४२ जागा) जागा एकटयाच्या बळावर लढवेल. याबाबतीत एन. टी. रामाराव कोणत्याही विरोधी पक्षाशी जागावाटपाबाबत तडजोड करण्यास तयार नाहीत आणि मध्यावधी निवडणुका जाहीर व्हायच्या आधीच रामारावाने अशी आडमुठी भूमिका घेतल्यावर नंतर काय होणार ? आंध्रमध्ये विरोधी पक्षाचा फारसा जोर नसला तरी मध्यतरी आंध्रमध्ये विधानसभेच्या ज्या पोटनिवडणुका झाल्या त्याचे निकाल बघता रामारावाना इंदिरा काँग्रेसशी एकटयाने टक्कर देणे त्याना वाटते तेवढे सोपे नाही. अशा परिस्थितीत जागा-वाटपाच्या बाबतीत रामारावाने भाजप व दोन्ही कम्युनिस्टांशी आंध्रमध्ये तडजोड करावयास हवी. अन्यथा इंदिरा काँग्रेसचाच फायदा होईल ! आंध्रमध्ये विरोधी पक्षांना (तेलगुदेशम) ला चांगली कामगिरी करण्यास बराच वाव आहे. दक्षिणेतील हे सर्वात मोठे राज्य असल्याने विरोधीपक्षांना या राज्यात मोठया अपेक्षा धरता येतील. कारण रामाराव विरोधीपक्ष–आघाडीत आहे.

कर्नाटकाचा काही भरवसा देता येत नाही. तेथील जनता सरकार पाडण्याचा उद्योग युद्धपातळीवर इंदिरा काँग्रेसमधून करण्यात येत आहे. त्यामागे लोकसभेच्या मध्यावधी निवडणुकात कर्नाटक आपल्या बाजूने असावा हाच मोठा हेतू आहे आंध्रप्रमाणे कर्नाटक हाही पूर्वी काँग्रेस (इ)चा बालेकिल्ला होता. मात्र लोकसभेच्या मध्यावधी निवडणुका झाल्यास इंदिरा काँग्रेसच कर्नाटकात जास्त जागा जिंकू शकेल असे सध्या तरी दिसते. विधानसभा पोटनिवडणूक महानगरपालिका, नगरपालिका निवडणुकांच्या निकालावरून, इंदिरा काँग्रेसने जनता सरकार पाडण्याच्या ज्या भ्रष्ट कारवाया चालवल्या आहेत, त्याचा फारसा प्रतिकूल परिणाम तेथील जनतेवर झालेला नाही हे दिसून येते. त्यातच जनता पक्षाचा सहकारी पक्ष, भाजप, जनता सरकारच्या कारभाराबद्दल नाराज आहे. केवळ इंदिरा काँग्रेसला सत्तेवर येण्याची संधी मिळू नये म्हणून भाजपने अल्पमतात असलेल्या हेगडे सरकारला पाठिंबा दिला आहे. गेले वर्षभर सत्तेवर असूनसुद्धा जनता पक्षाला आपली पक्षसंघटना नीट बळकट करता आलेली नाही. नगरपालिका निवडणुकांत काही ठिकाणी जनता पक्षाने काँग्रेस (इंदिरा) बरोबर गुप्त समझोता करून भाजपच्या उमेदवाराचा पाडाव केला ही बाब गंभीर आहे. अशा परिस्थितीत मध्यावधी निवडणुका झाल्यास कर्नाटकात जनता व भाजप यांचा समझोता होण्याची शक्यता कठीण आहे व तसे झाले तर इंदिरा काँग्रेस पक्ष कर्नाटकात जास्त जागा मिळवून हेगडे मंत्रिमंडळाचा पाडाव करू शकेल. चंद्रशेखर, स्वामी, सुरेंद्र मोहन यांच्या भाजपविरोधी वक्तव्याने हेगडे संकटात आले असून, त्याना जरी जनता–भाजपचा समझोता हवा असला तरी हे झारीतील शुक्राचार्य त्यांच्या वाटेत आडवे येतील. विरोधी पक्षाना एकत्र येण्याची संधी मिळू नये म्हणून इंदिरा गांधी एप्रिलमध्ये लोकसभेच्या निवडणुका घेण्याची शक्यता असली तरी विरोधी पक्षच आपापसात भांडून त्याचे काम सोपे करतील. चंद्रशेखर वगैरे जनता–नेते बहुगुणा, चंद्रजित यादव, सैय्यद मीर कासिम, जगजीवनराम या कागदी घोडयाना नाचवत रहातील व भाजप–लोकदल आघाडीबरोबर समझोता करण्याचा वास्तववादी दृष्टिकोन स्वीकारणार नाहीत. तामिळनाडूच्या मुख्यमंत्र्यानी विरोधी पक्षाकडे पाठ फिरवल्याने तेथे काही यश मिळण्याची आशा त्याना धरता येणार नाही. मुळातच जनता पक्ष सोडल्यास बाकीचे उजवे विरोधी पक्ष तामिळनाडूमध्ये नाममात्र आहेत. जनता पक्षाचाही फारसा प्रभाव नाही. कम्युनिस्टानीही मागे यश मिळवले होते ते अण्णा द्रमुकशी जागा–वाटपाबाबत समझोता झाल्यानेच. मात्र इंदिरा काँग्रेसचा अण्णा द्रमुकशी गुप्त समझोता झालाय. त्याप्रमाणे तामिळनाडूमधील लोकसभेच्या बहुसंख्य जागा इंदिरा काँग्रेस लढवणार असून त्यांना अण्णा द्रमुक पाठिंबा देईल. त्या बदल्यात विधानसभेत अण्णा द्रमुकचा वरचष्मा राहील व ते बिगरइंदिरा काँग्रेस सरकार असूनही इतर विरोधी सरकारांप्रमाणे त्यांना हैरास करता येणार नाही.

केरळमध्ये इंदिरा काँग्रेस व मित्रपक्ष यांच्यातील मतभेद विकोपाला गेल्याने ते जरी सत्तेवर असले तरी लोकसभेच्या मध्यावधी निवडणुका झाल्यास मार्क्सवादी व त्याचे मित्रपक्ष जास्त जागा मिळवण्याची शक्यता आहे. जनता, भाजप, लोकदल या पक्षांचा केरळात फारसा प्रभाव नाही. जनता पक्षाचा पूर्वी केरळात थोडासा प्रभाव होता; पण इंदिरा काँग्रेसला पाठिंबा देण्याच्या प्रश्नावरून जनतात दोन तट पडल्याने तो पक्ष विकलांग झालाय. काँग्रेस(स) मध्येही त्याच प्रश्नावरून दोन तट पडल्याने व अँटनी ग्रुप सोडून गेल्याने त्या पक्षाचा केरळातील जोर कमी झाला आहे. एन. टी. आरने आंध्रात लोकसभेच्या सर्व जागा लढवण्याची जशी आडमुठी भूमिका घेतली आहे तशीच भूमिका केरळात कम्युनिस्टाना घेता

येणार नाही; पण ते आपल्या आघाडीत भाजपला समाविष्ट करून घेणार नाहीत. शिवाय जनता, कांग्रेस (स) याच्याशीही ते सन्मान्य तडजोड करणार नाहीत. अर्थात केरळात अखिल भारतीय पक्षापेक्षा प्रादेशिक पक्षांना जास्त महत्त्व असल्याने त्यांचाच प्रभाव निवडणुकावर पडेल.

## उत्तरप्रदेशातील चढउतार

लोकसभेच्या सर्वांत जास्त जागा उत्तरप्रदेशांत आहेत. ( ८५ जागा) जनतालाटेत या सर्व जागा जनता पक्षाने मताधिक्याने जिंकल्या होत्या. नतर १९८० मध्ये जनता पक्ष फुटल्यानतर चरणसिंगांच्या जनता (सेक्युलर)ने २९ जागा (लोकसभेच्या) एकटया उत्तरप्रदेशातील जिंकल्या. त्यातील बहुतेक पश्चिम उत्तरप्रदेशातील होत्या. अर्थात त्याअगोदर चरणसिंग हे भारताचे काळजीवाहू पतप्रधान असल्याने त्याचा फायदा जनता (सेक्युलरला) मिळाला, ही शक्यता नाकारता येत नाही. मात्र चरणसिंगाच्या धरसोडवृत्तीने पूर्वीचा जोर आता राहिला नाही. बुलंदशहरमधील चरणसिंगाच्या उमेदवाराचा पराभव हा डोळयांत अजन घालणारा आहे ! जनता पक्षाच्या काळात त्यातील लोकदल व जनसंघ याच घटक पक्षाचे बहुतेक आमदार उत्तरप्रदेश विधानसभेत होते. मात्र त्यानंतर लोकदल जनतातून बाहेर पडल्यावर जनतात उरलेला जनसंघ स्वत च्या बळावर एकही लोकसभा जागा उत्तरप्रदेशात जिंकू शकला नाही. विधानसभेतही धड डझनभर सदस्य निवडून आणू शकला नाही. पूर्वी १९६७ व ७३ मध्ये जनसंघाने बरेच आमदार स्वत.च्या बळावर निवडून आणले होते; पण त्यानंतर जनसंघाचे बरेच मतदार कांग्रेस (इंदिरा) व लोकदलाने मिळवलेले दिसतात. जनता पक्षाचा पाडाव झाल्यानंतर तर जनसघाचा (आताच्या भाजपचा) उत्तरप्रदेशातील प्रभाव आश्चर्यकारकरीत्या कमी झाला आहे. भाजपच्या या अधोगतीनेच उत्तरप्रदेशातील पोटनिवडणुकात त्यांचा पराभव झाला द लोकदलाला त्याच्या पाठिंब्याचा फारसा उपयोग झाला नाही. लोकसभेच्या मध्यावधी निवडणुका झाल्यास उत्तरप्रदेशात इंदिरा कांग्रेसचाच वरचष्मा राहील. लोकदल व भाजप आघाडी म्हणावा तितका पाठिंबा न मिळवू शकल्याने, केंद्रात सत्तेवर कोण येईल हे ठरवणाऱ्या उत्तरप्रदेशात इंदिरा कांग्रेसला फारशी भीती बाळगण्याचे कारण नाही. जनताचा उत्तरप्रदेशात फारसा जोर नाही त्यानी राष्ट्रीय लोकशाही आघाडीशी समझोता केला नाही तरी विरोधी पक्षाच्या कामगिरीवर फारसा प्रतिकूल परिणाम होणार नाही. उलट जनता उमेदवारांच्या मोठया प्रमाणात अनामत रकमा जप्त होतील. बहुगुणा, चंद्रजित यादव या कागदी वाघाना गवत खावे लागेल ! उजव्या कम्युनिस्टांचा काही भागात प्रभाव आहे; पण त्यांच्या उपस्थितीने विरोधी पक्षांपेक्षा इंदिरा कांग्रेसचाच जास्त तोटा होईल.

उत्तरप्रदेशाखालोखाल लोकसभेच्या जास्त जागा (५४ जागा) असणारे राज्य म्हणजे बिहार. जनता पक्षाने १९७७ मध्ये लोकसभेच्या सर्व जागा बिहारमध्ये जिंकल्या होत्या. मागचा अनुभव पहाता जरी विरोधी पक्ष स्वतंत्रपणे लढले तरी जनता, भाजप,उजवे कम्युनिस्ट, लोकदल, कांग्रेस (स) यांना बिहारात समान जागा मिळतात व इंदिरा कांग्रेस पक्ष काठावर सत्तेवर येतो. मात्र आपापसातील मतभेद विसरून विरोधी पक्ष एकत्र आले तर बिहारमधील लोकसभेच्या जास्तीत जास्त जागा जिंकण्याची सधी त्याना आहे. बिहारच्या जनतेने नेहमीच विरोधी पक्षाना हात दिलेला आहे. कर्पुरी ठाकुर, एस. एन. सिन्हा, रामसुदरदास, कैलासपती मिश्र या विरोधी नेत्यांनी एकत्र येण्याची गरज आहे. कम्युनिस्टाशी जागावाटपाबाबत तडजोड करता येईल.

मध्यप्रदेशात कांग्रेस व भाजप याच्यात सरळ सामना होईल. जनता, लोकदल, कम्युनिस्ट हे मध्यप्रदेशात नावापुरते आहेत. सागर, जबलपूर येथील लोकसभा पोटनिवडणुका जिंकून भाजपने मोठया आशा निर्माण केल्या होत्या; परतु नतरच्या पोटनिवडणुकांत नगरपालिकाच्या निवडणुकांतील भाजपची निराशाजनक कामगिरी पहाता सागर व जबलपूरमधील भाजपचे विजय हे त्याच्या वाढलेल्या सामर्थ्यामुळे नसून इंदिरा कांग्रेसमधील अंतर्गत लाथाळघामुळे मिळाले होते हे सिद्ध झाले. सध्याची परिस्थिती पहाता इंदिरा कांग्रेसलाच मध्यप्रदेशात लोकसभेच्या जास्तीत जास्त जागा मिळण्याची शक्यता आहे. मध्यप्रदेशात भाजपशिवाय इतर कोणताही विरोधी पक्ष प्रभावी नसल्याने विरोधी पक्षाच्या आघाडीची आवश्यकता नाही व त्यामुळेच भाजपला इंदिरा कांग्रेसशी एकाकी लढत द्यावी लागणार आहे

## राजस्थान–पंजाब–काश्मिर

राजस्थानमध्ये इंदिरा कांग्रेसचाच वरचष्मा दिसतो. भाजपच्या भैरूसिंग शेखावताची मुख्यमत्री म्हणून कामगिरी जनता राज्यात चागली झाली होती. तरीसुद्धा भाजप एकटयाच्या जोरावर इंदिरा कांग्रेसला टक्कर देऊ शकणार नाही. लोकदल, जनता, कम्युनिस्ट यांचा काही भागात जोर आहे. जरी विरोधी पक्षाची आघाडी झाली तरी राजस्थानमध्ये त्याना फारशी आशा नाही. कारण तेथील इंदिरा कांग्रेस सरकारची कामगिरी अगदीच वाईट नाही. शिवाय लोकदल भाजपयुती सोडता इतर विरोधी पक्षांची आघाडी होणे कठीण आहे. हरयाणामध्ये जनता व राष्ट्रीय लोकशाही-युती यांच्यात समझोता न झाल्यास इंदिरा कांग्रेसचे काम सोनेपतप्रमाणे सोपे होईल. जाटाची मते चरणसिंग व देवीलाल यांच्यात विभागली गेली तर जनता, भाजप, लोकदल याचा फार मोठा तोटा होईल. सोनेपतमधील पराभवानंतर निदान देवीलाल याचे तरी डोळे उघडले असून ते आता पूर्वीच्या जनता पक्षासारखा पक्ष स्थापन करून त्याचे अध्यक्षपद चरणसिंगांना द्यावे असे म्हणत आहेत. चरणसिंग-देवीलाल ऐक्य झाल्यास मग इंदिरा कांग्रेसला सामना सोपा जाणार नाही. भाजप–लोकदल-युतीचा हरियाणात फारसा उपयोग एकमेकाना होणार नाही. भाजपचे पारंपारिक मतदार–मध्यमवर्ग, छोटे व्यापारी हे चरणसिंगांच्या विरुद्ध असून ते आघाडीच्या लोकदल उमेदवाराला कितपत प्रामाणिकपणे पाठिंबा देतील हा एक प्रश्नच आहे. मात्र भजनलालच्या भ्रष्ट कारभाराला हरयाणातील सामान्य जनता वैतागलेली असल्याने त्यांना पर्याय समोर असला तर ते कांग्रेस (इं.) ला धडा शिकवण्याची शक्यता नाकारता येत नाही

मध्यप्रदेशप्रमाणे हिमाचलप्रदेशातही कांग्रेस (इं) व भाजप असा

सरळ सामना होईल. विरोधी पक्षाचे ऐक्य झाले तर ठीकच पण नाही झाले तरी निवडणुक-निकालावर फारसा परिमाण होणार नाही लोकदल, जनता, कम्युनिस्ट हिमाचलप्रदेशात नाममात्र आहेत. माजी मुख्यमंत्री ( जनाताचे ) शांताकुमार हे आता विरोधी पक्षनेत्याचे काम चोख बजावत आहेत. हिमाचलमध्ये बहुधा इंदिरा काँग्रेस व भाजपला समान चान्सेस आहेत. पंजाबमध्ये अकाली आंदोलनाबाबत सामंजस्याची भूमिका न दाखवल्याने तेथे इंदिरा काँग्रेस पक्ष बदनाम झाला आहे. तेथे हिंसाचाराने इतका कहर माजवला आहे की, लोकसभेच्या मध्यावधी निवडणुका झाल्यास त्या पंजाबमध्ये घेण्यात येतील की नाही याबद्दल शकाच आहे. जर निवडणुका घेण्यात आल्या तर त्याचा जास्त फायदा अकाली दलाला मिळेल हे उघडच आहे; परंतु जर इंदिरा गांधी जम्मूप्रमाणे पंजाबमध्ये हिंदूंची एकगठ्ठा मते मिळवू शकल्या तर सामना तुल्यबळ होईल. त्यासाठी अकाली व भाजप अशी विचित्र युती झाली तर नवल वाटावयास नको.

जी. एम. शहा, परमानंद, डी. डी. ठाकूर या शेख अब्दुल्लाच्या माजी सहकाऱ्याना हाताशी धरून जम्मूकाश्मीरमध्ये फरुख अब्दुल्लाचे सरकार पाडण्याचा प्रयत्न इंदिरा काँग्रेसवाले करत आहेत. फरुख अब्दुल्लाचे सरकार उलथविण्यासाठी हिंसाचारी आंदोलनाचा इंदिरा काँग्रेसने अवलंब केला आहे. शेख अब्दुल्लाच्या राज्यातही देशविरोधी शक्ती जम्मुकाश्मिरात कार्यरत होत्या; पण तेव्हा शेखसाहेब केन्द्राशी जमवून घेत असल्याने त्याविरुद्ध आरडाओरडा करण्यात आला नाही; परंतु फरुक अब्दुल्लांनी केन्द्रविरोधी पवित्रा घेताच जम्मुकाश्मिरातील राष्ट्रविरोधी तत्त्वांविरुद्ध एकदम आकाश पाताळ एक करण्यात आल्यामुळे ते राजकारण कोणालाही समजण्यासारखे आहे. लोकसभेच्या मध्यावधी निवडणुकात फरुकच्या नॅशनल कॉन्फरन्सने भाजपशी युती केली तर जम्मूविभागात या युतीचा फायदा होईल व इंदिरा काँग्रेसचा पाडाव करता येईल. अर्थात नॅशनल कॉन्फरन्स व भाजपचे संबंध साप-मुंगुसाप्रमाणे असल्याने अशी युती होण्याची शक्यता कमीच.

आसाममध्ये मागे निवडुकात हिंसाचार उफाळून आल्याने काही लोकसभा मतदारसंघात मतदान घेण्यात आले नाही. अजूनही तेथे परिस्थिती म्हणावी तितकी निवळलेली नाही. मात्र निवडणुका घेण्यात आल्याच आणि गणसग्राम परिषद व विद्यार्थी संघ यानी यात भाग घेतला तर निवडणूक इंदिरा काँग्रेसला सोपी जाणार नाही. मागे निवडणुकांचा जो फार्स करण्यात आला त्यामध्ये इंदिरा काँग्रेस पक्ष व कम्युनिस्ट बदनाम झाले आहेत. तेव्हा मध्यावधी निडणुकांत गणसंग्राम परिषद व विद्यार्थी संघ यांनी जनता, भाजप यांचा पाठिंबा मिळवल्यास ते इंदिरा काँग्रेसला पाणी पाजू शकतील. अर्थात आसाममध्ये निवडणुका झाल्या तरच हा प्रश्न उपस्थित होईल. एकदा काँग्रेसला व एकदा विरोधकाना (जनसंघ) निवडून आणण्याची दिल्लीकरांची परंपरा चालूच राहिली तर दिल्लीमध्ये भाजपला चांगली संधी आहे. १९६७ मध्ये जनसंघ, १९७१ मध्ये काँग्रेस, १९७७ मध्ये जनता पक्ष व १९८० साली अटलबिहारींचा नवी दिल्ली मतदार संघ वगळता इतरत्र सर्व ठिकाणी काँग्रेस उमेदवार निवडून आणणारे दिल्लीकर यंदा पुन्हा विरोधकाना निवडून आणणे शक्य आहे, मात्र महानगरपालिका व प्राधिकरण या निवडणुकातील भाजपची गोची पहाता, आपण एकट्याने इंदिरा काँग्रेसला हटवू शकू या भ्रमात त्यानी न राहिलेले बरे. त्यानी लोकदलाबरोबरच जनताचीही मदत घेणे आवश्यक आहे. जनताचा दिल्लीत प्रभाव नसला तरी ते वेगळे लढल्यास भाजपचे उमेदवार पाडण्याइतक प्रभाव दाखवू शकतील.

## महाराष्ट्र आणि गुजराथ

महाराष्ट्रात शरद पवारांच्या काँग्रेस (स) चा बराच जोर आहे. इंदिरा काँग्रेसला हरवायचे असेल तर भाजपसकट सर्वांचा पाठिंबा आवश्यक आहे हे वास्तववादी भान त्यांना आहे. त्यामुळे मध्यावधी निवडणुकात इंदिरा काँग्रेसला त्यांच्या नेतृत्वाखालील विरोधकांच्या आघाडीने जोरदार धक्का दिला तर आश्चर्य वाटावयास नको. शरद पवार काँग्रेस संस्कृतीतच वाढले असल्याने ते इंदिरा काँग्रेसवाल्याना त्यांच्याच भाषेत उत्तर देऊ शकतात. गेले कित्येक महिने ते राज्यात सर्वत्र दौरे काढून समाजाच्या सर्व थ रातून चांगला पाठिंबा मिळवत आहेत. जनता पक्षाचे मंत्रिमंडळ महाराष्ट्रात असताना ते आघाडीचे मुख्यमंत्री होते. तेव्हा शरद पवारांची कामगिरी समाधानकारक होती. जनता पक्षाचे, घटक पक्षांचे कडबोळे एकत्र ठेवण्यात त्यानी चांगलेच यश मिळवले होते. युनायटेड फ्रंटमधील नेत्यामध्ये भाजपशी समझोता करण्यास ते लगेच तयार झाले याचे कारण महाराष्ट्रात इंदिरा काँग्रेसला हरवायचे असेल तर भाजपचा शहरी मतदार आपल्या पाठीमागे असायलाच पाहिजे, हे त्याना पुरेपूर माहीत आहे. शरद पवारांचा खेड्यांतील मतदारांवर चांगला प्रभाव आहे. त्याला भाजपच्या हुकमी शहरी मतदारांची जोड मिळाली तर काँग्रेसला निवडणूक कठीण जाईल. त्याचबरोबर जनता, शेकाप यानाही शरद पवार आपल्या आघाडीत सामील करून घेतील. भाजप आघाडीत असल्याने कम्युनिस्टानी नाक मुरडल्यास शरद पवार त्याची पर्वा करणार नाहीत. कारण कम्युनिस्टांची महाराष्ट्रातील ताकद त्याना माहीत आहे. सुदैवाने चंद्रशेखर, स्वामी, बहुगुणा, चंद्रजित यादव, सुरेंद्र मोहन याच्याप्रमाणे शरद पवार मूर्खांच्या नंदनवनात वावरत नाहीत. पूर्वी कधी नव्हती इतकी लाथाळी सध्या महाराष्ट्रात इंदिरा काँग्रेस पक्षात चालू आहेत. त्याचा फायदा शरद पवारांनी घेतला नाही तरच नवल !

गुजराथमध्ये सध्या तरी वातावरण काँग्रेस(इं) च्या विरुद्ध दिसत नाही. मध्यमवर्गीय सोळंकी (मुख्यमंत्री) व जीनाभाई दारजी याच्यातील भांडणे विकोपाला गेली असली तरी भांडणे कोणाच्यात नाहीत? इंदुभाई पटेल याची गुजराथ जनतापक्षाध्यक्षपदी निवड होताना एक वेळ पक्ष फुटण्याची वेळ आली होती व ह्या प्रश्नावरून अजूनही जनता पक्षात कुरबुरी चालू आहेत. भाजपची परिस्थिती चागली आहे; पण ती अजून खेड्यापाड्यांत पोचलेला नाही. गुजराथमध्ये इंदिरा काँग्रेसशी जोरदार टक्कर देण्यासाठी जनता व भाजप यानी एकत्र यायला हवे, अन्यथा ते स्वतंत्र लढल्यास इंदिरा काँग्रेसचे काम अगदी सोपे होईल व पोरबंदर लोकसभा पोटनिवडणुकीप्रमाणे त्याना अपयश पदरी घ्यावे लागेल. सामान्य कार्यकर्त्यांना हे पटते; परंतु पक्षातील बड्या धेंडाच्या गळी हे कोण उतरवणार ? गुजराथेत

विरोधी पक्षाना कधीच मोठे विजय संपादन करता आलेले नाहीत. जनता मोर्चाचे बाबुभाई पटेल मंत्रिमंडळ हे अगदी अल्पमताधिक्याने गुजराथेत सत्तेवर होते. १९७७ ची जनता लाट उत्तरप्रदेश, बिहार-प्रमाणे गुजराथला ह्यादरवू शकली नाही. सद्य परिस्थितीत तरी इंदिरा कॉंग्रेसचाच गुजराथेत वरचष्मा दिसतो.

पश्चिम बंगालमध्ये नुकत्याच विधानसभेच्या दोन पोटनिवडणुका जरी इंदिरा कॉंग्रेसने जिंकल्या असल्या तरी त्यावरून त्याचे सामर्थ्य तेथे वाढल्याचा निष्कर्ष काढणे चुकीचे ठरेल. पश्चिम बंगालमध्ये कॉंग्रेस (इ) सत्तेवर नसूनही तेथे प्रचंड बंडाळी त्या पक्षात माजली आहे. आधीच घनीखान चौधरी विरुद्ध प्रणव मुखर्जी यांच्या पाठीराख्यांत हाणामारी चालू होती. त्यात भर म्हणून प्रियरजनदास मुन्शी याना पक्षात प्रवेश दिल्याने तिसरा गट आता या साठमारीत उतरला आहे. परवा फरुक अब्दुल्लाच्या विरुद्ध कलकत्त्यात उग्र निदर्शने करून या गटाने आपले उपद्रवमूल्य सिद्ध केलय. शेवटी त्याना आपला फाजील उत्साह आवरता घेण्याची ताकीद दिल्लीकडून मिळाली. सत्ताधारी डाव्या आघाडीत कुरबुरी चालल्यात; परंतु ती फुटणार नाही. कारण प्रत्येकाला आपली स्वतंत्रपणे ताकद काय आहे हे पूर्णपणे माहीत आहे. अर्थातच लोकसभेच्या मध्यावधी निवडणुकांत बंगालमध्ये इंदिरा कॉंग्रेसपक्ष जरूर थोडी प्रगती करू शकेल; पण नेत्रदीपक वगैरे काही करता येणार नाही व मार्क्सवादी आघाडीचेच वर्चस्व राहील. ओरिसामध्ये जनताच्या बिजू पटनाइकांचा पूर्वीसारखा जोर राहिलेला नाही. सतत पक्षबदल केल्याने जनता त्याच्यावर रुष्ट असणे स्वाभाविकच आहे. भाजप, लोकदल, कॉंग्रेस (स) कम्युनिस्ट यांचा ओरिसात विशेष प्रभाव नसल्याने जनता पक्षाला इंदिरा कॉंग्रेसशी तेथे एकाकी लढत द्यावी लागणार व त्यात इंदिरा कॉंग्रेस बाजी मारणार हे उघडच आहे.

## १९७७–पार्श्वभूमिच वेगळी

वरील सर्व गोष्टींचा विचार करता लोकसभेच्या मध्यावधी निवडणुका झाल्यास केंद्रात इंदिरा कॉंग्रेसला सत्तेवरून हटवणे विरोधी पक्षांना शक्य होईल असे वाटत नाही. १९७७ च्या निवडणुका व आता होणाऱ्या निवडणुका यांची तुलनाच होऊ शकत नाही. त्या वेळेस निवडणुकाना आणीबाणीतील अत्याचाराची पार्श्वभूमी होती. जयप्रकाशजीसारखा लोकप्रिय नेता हिमालयाप्रमाणे विरोधी पक्षाच्या पाठिमागे उभा होता. आणीबाणीतील सक्तीच्या नसबंदीच्या बाबतीतील तथाकथित गैरप्रकारांमध्ये सामान्य जनता इंदिरा कॉंग्रेसविरुद्ध बिथरली होती. मुस्लिमावरील तथाकथित (तुर्कमानगेट–प्रकरण) अत्याचारामुळे कधी नव्हे तो सर्व मुस्लिम समाज एकसंघपणे विरोधीपक्षांच्या बाजूने उतरला होता. विरोधकांच्या दृष्टीने तर १९७७ ची निवडणूक त्यांच्या जीवनमरणाचा प्रश्न बनली होती. या निवडणुकीच्या निकालावर त्यांचे भवितव्य ठरणार होते. तेव्हा परिस्थितीच्या रेट्यामुळेच ते एकत्र आले व जनतेला तेच हवे होते. इंदिरा गांधींना धडा शिकविण्याकरता त्यांना पर्याय हवा होता. तो पर्याय कोणी निर्माण केला आहे, याच्याशीही त्याना स्वारस्य नव्हते. जनता पक्षाला निवडून आणण्यापेक्षा त्याना कॉंग्रेसला व इंदिरा गांधींना हरवायचे होते. या परिस्थितीच्या दबावामुळेच १९७७ साली निवडणुकांत तिकिटवाल्यांच्या बाबतीत जनता घटकपक्षात फारशा कुरबुरी झाल्या नाहोत. नंतर मग काही दिवसांतच घटकपक्षाच्या नेत्यानी आपले दात दाखवण्यास सुरुवात केली व त्यांच्या भांडणाला तमाशाचे स्वरूप आले. हा तमाशा जनता सहन करणे शक्यच नव्हते. केंद्रातील जनता सरकारमधील लाथाळ्यानी पूर्वीच्या संविद मंत्रिमंडळाची आठवण झाली. निदान केंद्रात तरी सरकार स्थिर असणे जनता केव्हाही महत्त्वाचे मानणार. जनता पक्षाचे मंत्रिमंडळ त्याच्याच नेत्यानी खाली खेचल्यावर मग १९८० मध्ये त्यानाच परत निवडून देण्याइतकी भारतीय जनता मूर्ख नव्हती. १९७७ मध्ये, इंदिरा गांधीना हरवून, लोकशाहीची पायमल्ली भारतात करता येणे शक्य नाही, हा धडा जनतेने त्याना शिकवल्यानंतर, जनता पक्षाचे कार्य संपले होते. आता इंदिरा गांधी आणीबाणीसदृश्य परिस्थिती पुन्हा कधीही भारतात जाहीर करणे (तसे धाडस करणे) शक्य नव्हते व भारतीय जनतेने १९७७ मध्ये जनता पक्षाला निवडून देऊन, इंदिरा गांधीना जणू इशाराच दिला की, त्या मन मानेल तसा कारभार करू शकणार नाहीत. लोकांच्या दृष्टीने जनतापक्ष इंदिरा गांधीना हरवण्याचे साधन बनला व लोकांनी त्याला तेवढेच महत्त्व दिले. लोकानी संयुक्त विधायक दलाच्या मंत्रिमंडळाचा तमाशा पूर्वी पाहिला असल्याने जनतापक्षाकडून फारशा अपेक्षा त्यानी ठेवल्या नव्हत्या.

## परस्परविरोधी विरोधक

तेव्हा जरी विरोधी पक्ष एकत्रितपणे निवडणूक लढले तरी ते केंद्रात सत्तेवर येण्याची शक्यता फारशी बाळगता येणार नाही. फार तर ते १९८० पेक्षा आपले सामर्थ्य बरेच वाढवू शकतील; परंतु सध्या विरोधी पक्षनेते जी परस्परविरोधी वक्तव्ये करत आहेत त्यावरून ते एकत्रित येतील ही आशा बाळगणे व्यर्थ आहे. युनायटेड फ्रंटमध्ये जनता पक्ष सोडता बाकी सगळे कागदी वाघ आहेत. राष्ट्रीय लोकशाहीयुतीच्या तथाकथित लोकप्रियतेचा बुडबुडा नुकत्याच झालेल्या पोटनिवडणुकात फुटला आहे. जनता, कम्युनिस्ट व इतर अखिल भारतीय फुटकळ पक्ष भाजपला त्याच्या आघाडीत घ्यावयास तयार नाहीत. भाजपला कम्युनिस्ट व मुस्लिम लीगशी कोणत्याही प्रकारचे संबंध नको आहेत. जनतासारखे पक्ष भाजपला त्याची रा. स्व. संघाबाबतची भूमिका स्पष्ट करण्यास सांगत आहेत, तर भाजपला असली कोणतीही अट मान्य नाही. चंद्रशेखरांना कधीकधी भाजप–लोकदलयुती ही कॉंग्रेस (इं) पेक्षाही भयानक वाटते; पण कर्नाटकातील जनता मंत्रिमंडळाला भाजपचा पाठिंबा हवा असतो. ज्या ठिकाणी आपली स्थिती मजबूत आहे तेथे इतर विरोधी पक्षाशी कोणत्याही प्रकारची तडजोड न करणारे ( उदाहरणार्थ बंगाल ) मार्क्सवादी कम्युनिस्ट किंवा रशियाकडून आदेश घेणारे सीपीआयवाले चंद्रशेखराना चालतात; पण राष्ट्रवादी भाजपवाले त्यांना चालत नाहीत. खरे तर दोन–तीन राज्यांतच प्रभाव असणाऱ्या कम्युनिस्टांपेक्षा बहुतेक सर्व राज्यात प्रभाव असणाऱ्या भाजपला जनता पक्षाने जवळ करावयास पाहिजे; पण शरद पवारांसारखी दूरदृष्टी चंद्रशेखर यांच्याजवळ नाही. पक्षाध्यक्षपदावरून कोणी आपल्याला हुसकून लावेल की काय याच

भीतीने त्यांना ग्रासले आहे. मोरारजींबद्दल काय बोलावे ? राजकारणातून निवृत्त होण्याचे हे खरे वय त्यांचे; पण आपल्या बेताल वक्तव्यांनी ते जनता पक्ष व विरोधी पक्षांना अडचणीत आणत आहेत. भारताचे पंतप्रधान होण्याची ईर्षा पुरी झाल्यावर ते गप्प बसतील असे वाटले होते; पण तसे झाले असते तर ते मोरारजी कसले ?

चरणसिंगांचा आणखी वेगळाच किस्सा आहे. चंद्रशेखर, जगजीवनराम, मोरारजी यांच्यापैकी त्यांचे कोणाशीच कधी पटले नाही. संजय गांधी, यशवंतराव चव्हाण यांच्या मदतीने त्यांनी जनता मंत्रिमंडळ कोसळल्यावर पंतप्रधानपदाची माळ आपल्या गळयात घालून घेतली; परंतु तरीही त्यांचे पुरे समाधान झालेले दिसत नाही. जॉर्ज फर्नांडिस, मधू लिमये, देवीलाल, पटनाईक, राजनारायण, बनारसीदास, कर्पुरी ठाकूर, कुंभाराम आर्य, सत्पाल मलीक यांची पक्षातून लागोपाठ हकालपट्टी केल्यावर ते इंदिरा गांधींप्रमाणे पक्षाचे सर्वेसर्वा झाले आणि ज्या आर. एस. एस.चे निमित्त पुढे करून त्यांनी जनता पक्ष फोडला ते चरणसिंग, भाजपशी नुसती युती करून गप्प बसले नाहीत, तर लोकदल व भाजप यांचा एकच पक्ष स्थापन करण्याबाबत ते सतत आग्रह धरीत आहेत.

जगजीवनराम यांना जनमानसात काहीच किंमत नसल्याने ते इंदिरा गांधींच्या दारात खेटे घालत आहेत; पण ते निरुपयोगी असल्याने इंदिरा गांधी त्यांच्याकडे लक्ष देत नाहीत. विरोधी पक्षांच्या परिषदांतील जगजीवनराम यांचा सहभाग निव्वळ दिखाऊपणाचा आहे. विरोधी पक्षांनाही त्यांना किंमत द्यावीशी वाटत नाही. जगजीवनराम यांच्याकरिता पूर्वी ठरल्याप्रमाणे, मोरारजींनी पंतप्रधानपदाची खुर्ची खाली केली असती, तर जनता सरकार कोसळले नसते, हे भाष्य करून भाजपच्या वाजपेयींनी काय मिळवले ? आता जुन्या उखाळयापाखाळया काढून काय उपयोग आहे ? उलट विरोधी पक्षातील आपापसातील कटुताच यामुळे वाढीस लागेल आणि जनता पक्षातील जनसंघाच्या भरभक्कम पाठिंब्यामुळेच मोरारजी, समाजवादी, चरणसिंग, जगजीवनराम यांना झोडपू शकत होते ना ? जनसंघाने मोरारजींचा पाठिंबा काढून घेतला असता, तर ते एक दिवसही पंतप्रधानपदी राहू शकले नसते. मोरारजींचा हट्टी, दुराग्रही स्वभाव, केवळ जनसंघगट त्यांच्या पाठीशी असल्यानेच, त्यांचे विरोधक नाइलाजाने सहन करत होते ही वस्तुस्थिती नव्हे काय ? तेव्हा आता त्यांना दोष देण्यात काय अर्थ आहे ?

जर विरोधी पक्ष एक होत नसले तर त्याला चंद्रशेखर, मोरारजी, चरणसिंग, जगजीवनराम, बहुगुणा यांची हट्टी व फाजील महत्त्वाकांक्षी भूमिकाच जबाबदार आहे. सामान्य कार्यकर्त्यांना ऐक्य हवे आहे. त्याकरिता या धेंडांना बाजूला सारण्याइतके धैर्य सामान्य कार्यकर्त्यांशी नाही, हीच विरोधकांची शोकान्तिका आहे. इंदिरा गांधींना खरी भीती विरोधकांपासून नव्हे तर अंतर्गत बंडखोरांपासून आहे व त्याचा फायदा विरोधक उठवू शकत नाहीत, हेच दुर्दैव म्हणायला हवे ! जोपर्यंत विरोधक खरेखुरे एकत्र येऊन जनतेमध्ये आपल्याबद्दल विश्वास निर्माण करू शकत नाहीत तोपर्यंत इंदिरा गांधींना विरोधकांची भीती वाटण्याचे कारणच उरत नाही.

□




# कुसुमाग्रजांची आनंदमयी

'छंदोमयी' हा कवी कुसुमाग्रज ह्यांचा नुकताच प्रसिद्ध झालेला काव्यसंग्रह आहे. कधी तरी वाचायला मिळणाऱ्या जुन्या कवींची ही या काळातील कविता आहे. अर्थात कवी कधीच जुना होत नाही, त्याची कविता जुनी होत नाही; पण एका कालाचा तो प्रतिनिधी बनलेला असतो, बनतो. नंतर तो त्या कालातील परंपरेत बसतो. 'छंदोमयी'तील कुसुमाग्रजांची कविता 'छांदसी' स्वतःच्या जाणीवांचे छंद जपणारी आहे. 'मातित असशी मातित मिळशी आत्म्याला हे लागु असे' असे जीवनाचे तत्त्वज्ञान सांगणारा हा कवी याही ठिकाणी मातीशी नाते सांगू लागतो. त्याला जाणवलेल्या सत्यात त्याची वेदना एकरूप होते. माती. बरोबर आकाश येते आणि या दोघांच्या अंतरात त्याच्या जखमांचं देणं फिटता फिटत नाही. हीच माती पुन्हा मातीतच रुजत जाणाऱ्या कवीभोवती विरते, पाश सरते, नाते पुन्हा सांधायला लागते ! मातीत मिळण्याची आणि मातीतून पुन्हा उभे राहण्याची कवीची जिज्ञासा आहे.

असा कुसुमाग्रजांची 'छंदोमयी'तील कविता वाचताना तिचे जुने छंद मात्र स्मरण देतातच ! उदात्ततेचा तिला स्पर्श आहे. आणि एका ध्येयवादाचेही तिला वेड आहेच. हा ध्येयवाद कुसुमाग्रजांच्या सामाजिक जाणिवेत आहे, प्रेमकवितेतही आहे आणि व्यक्तिगत अनुभवांच्या आविष्कारातही आहे. त्याला तेजाचे आकर्षण आहे. सूर्य त्याचा मित्र वा सांगाती बनतो. रात्रीच्या गर्भातला उषःकाल अजून होत असतो, मनात ती आशा असते म्हणूनच तो म्हणतो—

रात्र मला त्या तळयात टाकुन
नग्नपणाने निघून गेली
त्यातुन वरती
तटावरी आणुन तयाने
पुन्हा दिले मज दिगंत माझे
माझी धरती.

'छंदोमयी' कवितेचे छंद कोणते आहेत? तर निसर्गाचा सर्व साक्षात्कार, सौंदर्य, उदात्तता माझ्याचसाठी आहे, असे वाटून कवी त्याच्याशी एकरूप बनतो. जे जे त्याच्याकडून घेता येईल ते ते तो भरभरून घेऊ लागतो. दिवा दिसताच तो प्रकाश मागू लागतो. पक्षी दिसताच आकाश मागतो; पण शेवटी हे छंद दिवाणे ते दिवाणेच ! ही कविता कुसुमाग्रजांची आहे याचे भान सतत

ही कविता वाचकांना देत असते. याचे कारण या संपूर्ण कवितेला दोन मर्यादा आणि दोन क्षितिजे आहेत. ती व्यक्तिगत जीवनातील अनुभव ते सामाजिक जीवनातील अनुभव अशा कक्षेत रेंगाळताना दिसते. आता सामाजिक जाणीव ही व्यक्तिगत असते; पण ती सर्वसमावेशक बनते. व्यक्तिगत जीवनातील अनुभवात येणारी दोन सूत्रे म्हणजे प्रेमभावना आणि निसर्गाचा कविमनावर होणारा परिणाम. पैकी प्रेमभावनेत प्रेयसीच्या रूपाचे वर्णन, मनाचे वर्णन, स्वत च्या मनोवस्थेचे वर्णन इथपासून ते प्रेमाचे तत्त्वज्ञान सांगण्यापर्यंतची मजल ही कविता गाठते. त्यातही पुन्हा कुसुमाग्रजाच्या कवितेत स्वभावत. आढळणारी उदात्तता आहेच. 'पृथ्वीचे प्रेमगीत'मध्ये आढळणारी त्यागी प्रेमभावना, उच्च उदात्त प्रेम, 'स्वप्नाच्या समाप्ती'तील ध्येयवाद 'छंदोमयी'तील प्रेमकवितेतही आहे. म्हणूनच 'जोगीण'मध्ये ती आपल्यातल्या त्याच्यात जोगीण बनून जगत राहणे पसंत करते. अधिकार तिला नको आहेत. ऐन तारुण्याच्या उमेदीतले हे शब्द असले तरी व्यथाच्या शूलांची जाणीव त्याला आहे. जळत्या जखमांवर गुलाबपाणी शिपावे लागते याचे भान त्याला आहे. हे प्रेम म्हणजे जखमांची देवाणघेवाण आहे याची बोच त्याला आहे; पण हे सर्व असूनही यातून 'जागणाऱ्या मंतर पहाटेचा' आशावाद यात आहे. म्हणून तो तिच्यासाठी *'लाख रवीचे गर्भ सुखाने साहत आहे.'* स्पर्शसुखात हे प्रेम रमत नाही. कारण त्या कठोर वास्तवाचे भान कवीला आहे. प्रेमांधपणा या कवितेत नाही; पण उदात्त ध्येयवाद आहे. प्रेमानुभवात येणाऱ्या स्वप्नमयतेलाही इथे पाया आहे तो वास्तव जाणिवेचा !

—कधी रेताडीचे रस्ते  
कधी मोहरली बाग  
कधी प्रासादास आग  
कर्पुराच्या.  
बर्फवाट शिशिराची  
आता पुढलिया देशी  
तुझ्या मिठीची असोशी  
अजूनही.

यामुळे कवी सुखावतो. दूरस्थपणातही त्याला आनंद होतो. कधी 'प्रेम' ह्या भावनेचे तत्त्वज्ञान कवी सागतो, तेव्हा ही भावना व्यापक व सूक्ष्मही होते. अशा वेळी कविता ही कविता न राहता केवळ विधानात्मक बनते, रुक्षपणा येतो.

'छंदोमयी' कविता ही बहुताशी सामाजिकतेला जपणारी आहे. व्यक्तिगतता त्यात आहे; पण ती विकसित होत जाताना दिसते. सत्ताबाजी, अन्याय, जातिभेद, दारिद्र्य, परस्परातील मतभेद ह्या आणि अशा विषयाभोवती ती केंद्रित होऊ लागते. अर्थात कुसुमाग्रजाच्या कवितेत ही सामाजिकता नवीन नाही.

*आशयातला* किंचितसा आणि काहीसा बदल वगळला तर आशयही तोच आणि त्याच प्रकारे व्यक्त होताना दिसतो. शब्दातला तो तडफदारपणा आणि गतिमानता 'छंदोमयी'तल्या सामाजिक कवितेतही आहे. तसे पाहिले तर या सामाजिक कवितेतल्या आशयात तसे वैविध्य नसते. वैविध्य असते ते आविष्कारात ! कुसुमाग्रजांच्या एकूणच सामाजिक कवितेची एक वेगळी छाप, वेगळी प्रतिमा मराठी मनात आहे. अर्थात हे वेगळेपण समाजनिरीक्षणात आहे ! 'तात्पर्य' एकच कवीच्या लक्षात येते ते म्हणजे 'संज्ञा स्थिर असल्या तरी प्रवृत्ती प्रवाही आहेत.' 'मूल्य' ही कविता या दृष्टीने विशेष महत्त्वाची आहे. आज समाजात व विचारातही पोशाखीपणा आलेला आहे समाजातले भीषण वास्तव कवीच्या मनात दाटते. आज समा*जातल्या गर्दीने निसर्गाकडे पाहण्याची 'नजर'* हरवली आहे. समाजाच्या जगण्याच्या पद्धतीकडे पाहून कवी महापुरुषाला 'प्रार्थना' करतो 'चार्वाका'चे 'मी' भोवतीचे तत्त्वज्ञान त्याला मर्यादित वाटते आणि स्वत: भोवती गुरफटलेल्या 'मी' पेक्षा त्याला 'आम्ही' त 'मी' रूपांतरित होणे महत्त्वाचे वाटते. नव्या जाणिवाचा लवाजमा घेऊन कवी शोधाला बाहेर पडतो तेव्हा त्याला दिसते; समाज कुठे तरी स्वत:*ला* हरवायला लागलेला आहे पण या हरवण्यालाही 'मर्यादा' असावी असे वाटते.

बाई फोडतच राहिली  
बाई फुटतच राहिली

हे भीषण वास्तव आहे. त्यामुळे 'म्हातारा म्हणतोय' ह्या कवितेतला म्हातारा हा संपूर्ण समाजाचा प्रतिनिधी आहे. तो म्हणतो *'मवाल्याच्या ओझ्याखाली। लाडकी लेक फुटली पायजे.'*

## अनुभवातील वेगळेपणा

'छंदोमयी'तल्या व्यक्तीगत जाणीवेच्या कविता अधिक अर्थपूर्ण व भावस्पर्शी आहेत सवेदनाक्षम 'मी'ला आलेला अनुभव वेगळेपणा सिद्ध करतात. काव्यविषयक भूमिका स्पष्ट करतात. कवी कोण असतो ? कवी जेव्हा कवी असतो तेव्हा तो या जगाचा नसतो. स्वत.तली व्यापकता, विशालता, अद्भुतता, व्यावहारिकतेची गळून पडलेली पाने याची जाणीव होऊन तो म्हणतो—

कवित्व विकृतीचे गोठवण  
नानाविध वेदनाचे कारण  
तरी मातीचे हेच उधाण  
आकाशी उसळते !

कवी स्वत.ला निसर्गात हरवायला लागतो. तो प्रकाशपूजक होतो. दिवाण्या छंदाने तो भारावून जातो. निसर्गात स्वत:चे जगणे दिसायला लागते. आपल्यापेक्षा निसर्गातल्या जिवाला खूप काही कळलेले असते. एक 'प्रवास पक्षी' जीवनाचे तत्त्वज्ञान सागून जातो जीवनातल्या गूढतेचे वेड लागून कवी त्यात रमून जातो. एखाद्या 'अस्तानतर' नभाच्या सत्त्वात, पक्ष्याच्या किलबिलाटात, झाडाच्या सावल्यात, सर्वत्र मानवी मन आहे; सुख-दुःखे आहेत याची जाणीव होते. कधी काही हरवल्याची तर कधी काही सापडल्याची जाणीव होते. सूर्य आणि पृथ्वी याच्यातील एका अज्ञात संकेतातून आकारलेला मानायला लागतो. सृष्ट शक्तीच्या अंतहीन भाडारात तो अनेक गोष्टीचा शोध घेतो, तर कधी जीवनात येणारी विषण्णता सर्वभर व्यापून राहते. स्वत चेच जगणे अनोखे बनते. 'नदीतले जल' ही कविता कवीच्या भावावस्थेचे वर्णन करणारी आहे 'उसासतो मद गंधित मोहर देठादेठातुनी' ही संवेदना महत्त्वाची आहे. कवी जीवनातील प्रश्न 'आकाशा'ला विचारतो. मात्र मनातली संवेदनक्षमता, हळुवारता अनेक प्रकारच्या वादळातून जपायचा प्रयत्न करतो. म्हणूनच कवीचे विश्व हे 'आनंदलोक' असते, जिथे चंद्र मावणार नसतो. अथांग प्रेमाचा दर्या वादळत नसतो. सप्तरंगांच्या मैफिलीत मग्न होताना कवीचे मरणही

मोरपिसारा लेऊन नाचू लागते. मात्र कधी मरणाच्या जाणीवेने तो 'अगतिक' होतो. देहाचे आपण किती देणे आहोत असा न संपणारा प्रश्न त्याला पडतो. मरणाच्या वेशीवर उनाडताना निसर्गाने बांधलेल्या मेण्यात मरणाला बसवून त्याला पुन्हा पृथ्वीवर आणले जाते.

'छंदोमयी'तील कविता कुसुमाग्रजाच्या अनुभवातील वेगळेपणा व्यक्त करते. तिचा मूड तोच जुना आहे. सामाजिकतेत तोच सामाजिक आशय आहे. मात्र कवी जेव्हा स्वत:त गुरफटतो, स्वानुभव सांगायला लागतो तेव्हा मात्र ही कविता वेगळा आशय सांगून जाते. 'छंदोमयी'चा विशेष म्हणजे रचनेतील वैविध्य ! विविध छंदांत ती व्यक्त होते. 'दोन कणिका' ही कविता रचनेचा वेगळा प्रकार दाखवते. 'गालीबगीता'तील कविता वेगळा आशय सांगते. 'भेटीलागी' 'अव्यक्तदीनी', 'अश्वमेध' अभंगरचनेची आठवण करून देणाऱ्या कविता आहेत. 'काही स्फुटे : काही यमके' ही कविता त्या दृष्टीने महत्त्वाची आहे. कवितेचे कवितापण हे तिच्या कविता असण्यात आहे. ती कोणत्या छंदाची आहे, कोणता आशय सांगणारी आहे, कोणत्या रचनाप्रकारातील आहे ह्यापेक्षा त्या अनुभवाशी कवी किती एकनिष्ठ आहे, एकरूप झाला आहे याला जास्त महत्त्व आहे. कुसुमाग्रजाची 'छंदोमयी' वाचकांना 'आनंदमयी' करणारी आहे निश्चितच !

रेणू दांडेकर

छंदोमयी
कुसुमाग्रज
पॉप्युलर प्रकाशन
१५ रु
¤

# प्रवासवर्णनातून व्यक्तिदर्शन

'बर्फ आणि वाळू' म्हणजे हिमवर्षाव होणारं लडाख, रेताड राजस्थान आणि गजबजलेल्या कलकत्त्याचं प्रवासवर्णन. हिंदुस्थानच्या तीन टोकांचा हा प्रवास करताना तेथील निसर्ग, लोकांचे वेष, वागण्याची पद्धती, चालीरिती ह्या बाबतीत भाव्यांचं सूक्ष्म निरीक्षण वाचकाला गुतवून ठेवत.

सुरुवात उत्तरदिग्विजयान म्हणजे लडाखच्या प्रवासानं झाली आहे. ह्या प्रवासात पु. भा. भाव्यांबरोबर इतर चार प्रसिद्ध लेखक–कवि भाव्यांच्या सोबतीला आहेत. ह्या सर्वांच्या गप्पा–टप्पा, सवयी यानीही वाचकाला गंमत वाटतेच. मुंबई ते दिल्ली हा भाव्यांचा पहिला विमानप्रवास. विमानात खिडकीच्या जवळ बसायची लहान मुलासारखी उत्सुकता. त्यांनी हवाई–सुंदरीला विचारलेले हजार प्रश्न. ह्या प्रश्नानी त्रस्त झालेली ती हवाई-सुंदरी. ह्या सर्व गोष्टींमुळे लिखाणाला एक जवळीक आलेली आहे. दिल्लीहून श्रीनगर आणि नंतर लडाख अशी ही पंचकडी लडाखला पोहचते. लडाखी थंडीचा असह्य कडाका...तो हिमवर्षाव... आपल्या डोळ्यांपुढे न बघताच लडाख उभे करतात. लडाखहून श्रीनगरला आल्यावर इतर चौघं परततात आणि भावे एकटे राहतात.

भाव्यांसारखा रसिक आणि श्रीनगरचं निसर्ग-सौंदर्य ! पण इथेही काश्मिरचा बहारदार निसर्ग वर्णित करताना दाल-लेकतील गचाळपणा, काश्मिरी लोकांची बक्षिसासाठी घासाघीस, शालीमार... निशात ह्या बागांचा सारखेपणा ते आपल्याला जाणवून देतात. इथे पु. ल. देशपांडे यानी काश्मिरीदुकानदाराचा उतरवलेला नक्षा... त्यांचा राग हे वाचताना वाचकानाही गंमत वाटते.

चितोडला जायला जेव्हा ते इंदौर स्थानकावर पोचतात, तेव्हा राजस्थानी लोकांच्या कपड्यांची पहिली झलक त्यांना दिसते. त्यांचं वर्णन 'कुसुंबी, लाल पिवळे व गुलाबी रंग स्थानकावर उधळलेले दिसत होते' असं ते करतात. चितोडच्या प्रवासवर्णनात वाचकाला जाणवतं की, भाव्यांचा इतिहासाचाही अभ्यास खूप आहे. पण हा इतिहास कोठेही रुक्ष वाटत नाही. 'पद्मिनीप्रसाद' बघताना भाव्यांना वाटलेल्या खेदात वाचकही मनानं सामील होतो, आणि इथेही अर्थात लेखकाचे श्रेय खूप आहे. टांगेवाल्यानं त्यांना बनविण्याचा केलेला प्रयत्न. गाईडची फसवेगिरी ह्या वर्णनानं वाचकाला गंमत वाटत रहाते.

उदयपूरचं वर्णन करताना 'उदयपूर अनेक टेकड्यांनी वेढलेले आहे व अनेक तलावांनी नटलेले आहे' असं भावे लिहितात. उदयपूरच्या सुंदर राजवाड्यातून फिरताना भाव्यांना एक खंत वाटते, उदयपूरच्या काही राजवाड्यांची पंचतारांकित हॉटेलसमध्ये झालेली रूपांतरं पाहताना भावे दुखावतात. 'बाप्पा रावळ, राणा प्रतापसिंह यांच्या वंशजानी इथे खानावळी काढल्या आहेत.' असं ते लिहितात आणि मग इतिहासाची ही उतरण वाचकालाही अंतर्मुख करते. ह्या सर्व वर्णनातून पु. भा. भाव्यांतील अत्यंत प्रतिभाशाली लेखक आपल्याला जाणवत रहातो. पोपट उडतानाचं वर्णन ते 'हिरवी पानं निळ्या आकाशात फेकली जावीत' असं करतात.

ह्या पुस्तकात लहान मुलाची उत्सुकता असलेले भावे आढळतात, तसंच रागावलेले भावे पण आपल्याला भेटतात. नाथद्वाराला देवदर्शनाला ते जातात तेव्हा 'देव झोपला आहे नंतर या !' असं त्याना सांगण्यात येतं अशा वेळेस 'माणसानी देवाना स्वत:च्या पातळीवर आणलं, ही माणसं देवाच्या पातळीवर जात नाहीत' असा राग ते व्यक्त करतात.


कलकत्त्याचं वर्णन ते 'मुंबईसारखे हे गाव समुद्रानं आवळलेलं आणि आकाशाच्या दिशेनं डोकं खुपसणार नाही' असं करतात. तेथील बेशिस्त...सततचे दंगेधोपे ह्यानी भावे अस्वस्थ झालेले जाणवतात. बंगाली लोकांची स्वभाववैशिष्ट्ये मोठ्या खुमासदारपणे त्यानी मांडलेली आहेत.

पु. भा. भावे ह्यांच्या इतर कथा–कादंबऱ्यामधून त्यांची मतं, विचार आपण एखाद वेळेस वाचू शकतो; परंतु स्वत: पु. भा. भावे व्यक्ती म्हणून त्यांचे राग-लोभ, आवडी-निवडी ह्या प्रवास-वर्णनातून आपल्याला जाणवतात.

आकर्षक मुखपृष्ठ असलेलं हे प्रवासवर्णन वाचकांनी जरूर वाचावं असंच आहे.

सौ. सुप्रिया सरवटे

बर्फ आणि वाळू
पु. भा. भावे
साहित्य प्रसार केंद्र
नागपूर
३२ रु.



# आपली मुलं

## कशासाठी ? मुलांसाठी !

शोभा भागवत

माणूसच्या ९ जुलै ८३ अंकापासून शोभा भागवतांची 'आपली मुलं' ही लेखमाला सुरू झाली.
दिवाळी अंक सोडला तर दर पंधरा दिवसांनी याप्रमाणे या लेखमालेत दहा लेख आतापर्यंत प्रसिद्ध झाले.
लेखमालेच्या सुरुवातीला म्हटलं होतं की, बालमानसशास्त्र आणि पालक–शिक्षणात सांगितले जाणारे प्रयोग घराघरातून पोचावेत यासाठी हे लेख आहेत. यातील अभ्यासाची पद्धत अनुभवातून शिकत जाण्याची आहे.
या लेखमालेच्या मुख्य सूत्राच्या अनुषंगाने—
'आपण मुलांशी बोलायला शिकू या', 'आनंदाचे अनुभव', 'आपलं मूल आहे तरी कसं', 'आपण पालक म्हणून कसे आहोत', 'कुठे मिळेल पालकत्वाचं शिक्षण', 'मुलं आपल्याला घडवतात', 'ही आपलीच मुलं', 'काही वेगळी मुलं', 'समाज पालकत्व मागत असतो' आणि 'अभ्यास मुलांचा–आपला' असे दहा लेख प्रसिद्ध झाले.
या अंकात शेवटचा समारोपाचा लेख दिला आहे.
ही लेखमाला संपत आहे; पण म्हणून हा विषय संपला आहे असं नाही.
बालमानसशास्त्र आणि पालकशिक्षणातले प्रयोग सतत चालूच राहाणार आहेत.
त्यातील महत्त्वाच्या प्रयोगांची दखल आपण अधूनमधून 'माणूस' मधून घेणार आहोत.

'**आ**पली मुलं' ह्या लेखमालेतला हा शेवटचा लेख. हा लेख लिहिताना याचंच सगळ्यात वाईट वाटतं आहे.

लहानपणी दरवर्षी सुट्टीत आम्ही आजोळी जायचो. तिथून निघताना दरवेळी आईपण रडायची आणि आजीपण रडायची. त्यांना माहीत असायचं आपण पुन्हा भेटणार आहोत, तरी तो वियोग दरवेळी चटका लावायचाच. तेव्हा ३५ वर्षांची असलेली आई आता ६५ वर्षांची आहे आणि तेव्हा ५५ वर्षांची असलेली आजी आता ८५ वर्षांची आहे तरी या क्रमात बदल नाही !

हे कशाचं वाईट वाटणं असतं ? एकमेकांना भेटून नेहमीपेक्षा काही नव्या गोष्टी बोलून जो उत्साह आलेला असतो, चार दिवस हसत गेलेले असतात ते सगळं आता थांबणार याचं वाईट वाटतं की हे माणूस आता पुन्हा दिसेल का नाही या शंकेचं वाईट वाटत असतं ?

ह्या लेखनाच्या निमित्तानं एक छानसं वातावरण घरी–दारी होतं. लेख जन्माला घालण्यापूर्वी आम्ही दोघं त्याबद्दल बरंच बोलत होतो. लेख झाल्यावर नव्या बाळाकडे पहावं तशा उत्सुकतेनं तो वाचत होतो.

मुलांनाही सध्या आपली आई आपल्याबद्दल काही तरी लिहीत असते याची गंमत वाटायची. काहीही लिहीत असलं की ती विचारायची ''माणूस'चा लेख लिहिते आहेस ?' लेख घेऊन माणूसचा अंक आला की ती त्यातली चित्रं पहायची. चित्रातले काही प्रसंग त्यांच्या स्वतःच्या अनुभवातले होते ना ? मग मुलं म्हणायची, मी असा कुठे दिसतो ? मग चित्रकार चित्रं कशी काढतो याबद्दल गप्पा व्हायच्या. 'आम्हाला वाचून दाखव ना नवीन लेख'– हीपण मागणी मी मोठ्या कौतुकानं पुरी करायची.

आणि तुम्हाला गंमत सांगते. या लेखांनंतर एकदा मुलाला कशावरून तरी मी रागावले तर म्हणाला, 'लेखात लिहितेस रागावू नका आणि रागावतेस नाही का ग ? थांब आता सांगतो सगळ्यांना !'

मुलाच्या मनातली शंका काही वाचकांच्याही मनात असते. ते विचारतात तुम्ही सगळं असं वागता का हो ? आम्ही एकदा येणार आहोत बघायला. मी म्हणते जरूर या. हे सगळं १०० टक्के मला जमत नाही. मीदेखील माणूसच आहे. माझ्याही हातून चुका होतातच. कधी आपण असे वागलो याचा त्रासही होतो, वाईटही वाटतं; पण यातून काही शिकण्याची एक पायरी पुढेही जाता येतं. ती चूक आहे हे पटतं. हळूहळू बदल होतो. हे कायमच चालू राहतं. स्वतःच्या चुकांकडे जर इतक्या उदारपणे पहायचं तर मुलांच्या चुकांकडे किती उदारपणे पहायला हवं तेही कळत जातं.

पण आपल्या मनात एक स्वतःबद्दल आणि मुलांबद्दल एक अहंकार जागा असतो. माझं मूल म्हणजे त्यानं असं असं वागलंच पाहिजे, नाही म्हणजे काय ? आणि मी म्हणजे अशी तशी आई (किंवा वडील) आहे का ? मला सगळं नीट केलंच पाहिजे !

कित्येकदा आपल्या भूमिकांना नि कर्तव्यांना माफी मिळते; पण मुलानं आपण ठरवलेलं सगळं केलंच पाहिजे, हा आग्रह कायम राहतो. स्वतःला जे जमत नाही त्याची विविध कारणं आपण शोधतो, इतकंच नव्हे तर स्वतःला पटवून देतो.

लेख वाचल्यावर माझी एक मैत्रीण म्हणाली, 'हो ! तू काय नोकरी करतेस ! तू असतेस कुठं मुलांजवळ ? आम्ही दिवसभर तेच ते करत असतो. म्हणून वैतागच येतो. तुला काय होतं असं वागावं न् तसं वागावं म्हणायला ? '

हीच माझी मैत्रीण एरवी मात्र बाईनं घरातच असावं म्हणजे मुलांचं सगळं 'नीट' होतं असं हिरीरीनं सांगत असते.

'नीट' होण्याच्या आपल्या कल्पना कोणत्या ? मुलांना विविध पदार्थ करून घालणं ? त्यांचे कपडे नीट ठेवणं ? त्यांनी हाक मारली की आपण हजर असणं ?

### स्पर्धेची, चुकण्याची भीती ?

आपल्या दिनक्रमाचा सगळा मक्ता काय मुलाला दिलाय का आपण ? हे खरं आहे की, मुलांच्या गरजाप्रमाणे आपण आपला वेळ देतो, श्रम देतो. पण त्यापलीकडे मला माझं म्हणून काम असतंच· मग ती नोकरी असेल, घरकाम असेल, वाचन असेल किंवा इतर काही असेल. माझ्या स्वतंत्र वेळाची गरज मला कळली, त्यावर इतरानी कुणी हक्क सांगू नये असं पटलं तर मुलाचंही स्वातंत्र्य मला समजू शकतं. मग मी तुला वाहून घेते आणि तू मला वाहून घे म्हणजे माझं सगळं ऐक, मला हवे ते कर अशी अपेक्षा रहात नाही.

माझं मूल म्हणजे एक स्वतंत्र व्यक्तिमत्त्व आहे. ते सगळं मी सागेन तसं कसं वागेल ?

चांगलं काय ते आपल्यालाही माहीत असतंच की, पण तसं वागतो का आपण सगळं ? अनुभवातूनच आपण शहाणपण शिकतो. ते सुद्धा शिकायचं असलं तर, नाही-तर तेच ते अनुभव पुन्हा पुन्हा येऊन त्याच त्या चुका आपण करतच राहतो.

कित्येकदा आपल्याकडे खिलाडू वृत्ती नसते. मूल एखादं स्पर्धेतलं चित्र रंगवत असतं. आपल्याला वाटतं ते त्यानं अगदी छान रंगवावं. आपणच त्याला सूचना देतो. कधी सूचना देण काही आपल्याला जमत नाही; पण त्यानं रंग वाईट लावलाय, रंग फरफटवला एवढंच कळतं. आपण त्याला रागावतो; पण काय कर हे सांगणंही बरो-बर नसतं. कारण मग ते आपल्यावरच अवलंबून रहायला शिकत. अशी ही तारे-वरची कसरत असते. त्यापेक्षा ते चित्र रंगवण्याच्या सुंदर अनुभवातून मुलाला शांतपणे जाऊ देणं महत्त्वाचं असतं. स्पर्धा गौण आहे. ही स्पर्धा जिंकली नाही तर आपल फार काही बिघडणार नसतं; पण स्पर्धेचं स्तोम माजवून चित्र रंगवण्यातला आनदही आपण मुलाला मिळू देत नाही आणि आत्मविश्वासही मिळू देत नाही.

'आपलं चुकेल का काय ?' ही भीती त्याच्या मनात आपण पेरून ठेवतो नि हे पीक जन्मभर उगवतच राहतं. आपलं काही चुकणार तर नाही ही भीती मोठेपणीसुद्धा केवढी खोलवर रुजलेली असते ! कोणतीही नवी गोष्ट करायची तरी आपण घाबरतो. आमची आई इतकी वर्षं लाडू करतेय. सुंदर करते पण दर वेळी तुपात रवा घालताना 'जय देवा गजानना' म्हणते. शेवटी लाडू तीच करणार किंवा बिघडवणार असते; पण सकट घालायचं गजाननाला. त्यान तरी कधी कुठे लाडू केलेले असतात ?

चुकण्याची, हरण्याची, अपयशाची, लोक काय म्हणतील याची भीती इतकी घट्ट धरून बसतो आपण की त्यानंच अर्धा आनंद नाहीसा होत असतो. मुलांना आपण हा विश्वास देऊ शकू का की चुकलं तरी चालेल तू करून बघ. का चुकलं ? असा प्रश्न विचारायला शीक. त्याचं उत्तर शोधायला शीक.

उत्तरं शोधण्याची आपल्याला तरी कुठं सवय असते ? माझी मुलगी इतिहासाचा अभ्यास करत नाही, तर मी इतिहासाचं पुस्तक वाचून पहाते का ? समजून घेते का? तिला जे आवडत त्यातून समजावून देते का ? काय केलं म्हणजे तिला हे कळेल ह्याचं उत्तर मला शोधता येतं का ? तिनं इति-हासाचा अभ्यास केला पाहिजे, एवढंच मी तिला पुन्हा पुन्हा आरडून, ओरडन, मारून, रागवून, बाईचा धाक घालून सांगत राहते. त्या पुन्हा पुन्हा केलेल्या चुकीचा काहीही उपयोग होत नसतो, हे मला कळतं पण वळत नाही. मुलांचा अभ्यास आनंदान घेणं हे मला जमत नाही.

पेपरातल्या प्रश्नांना पाठ्यपुस्तकातली उत्तरं देणं एवढंच आपण शिकतो. त्यालाच शिक्षण मानतो. प्रश्न विचारणं आणि स्वतःची स्वतंत्र उत्तर शोधणं आपल्याला जमत नाही.

घरातल्याच चार माणसांशी कसा सवाद साधायचा याचीही मोकळीक मुलांना नसते. भावंडं भांडायला लागली की आईन मध्ये पडायच, मुलाचा प्रश्न आईनं वडलांकडे मांडायचा. अस का ? त्याला कळू दे की प्रत्येकाचा स्वभाव त्याच्याशी कसं वागायचं काय बोलायचं ते त्याला ठरवू दे आणि वडलांनाही कायम आई कशाला हवी वकिली करायला ? त्यानाही कळायलाच हवं मुलांशी कसं वागायचं ते. ते रागावतात. ते संतापतात हा काही शहाणपणा नव्हे याचा अर्थ ते पालक व्हायला लायक नव्हते. त्यांना नको ते प्रमोशन मिळालंय नि त्या जागी काम करता येत नाहीयू. असंच काही घरात आईचं होत असेल.

### जे अनुभवलं ते !

सर्वांनी एकत्र येणं जितकं आवश्यक तितकंच दोघादोघांनी एकत्र येणं काही गप्पा मारणंही महत्त्वाचं असतं. गेल्या मे महिन्यात माझा नऊ वर्षाचा मुलगा आणि मी पहाटे फिरायला जायचो. तेव्हा इतर कुणी बरोबर नसायचं त्यामुळं इतक्या वेगळ्या पातळीवर आमच्या गप्पा चाला-यच्या. मलाही शांतपणा असायचा, त्यालाही. बोलता बोलता तो म्हणाला 'मला कधी कधी वाटतं तुला माझ्यापेक्षा आभा जास्त आवडते' मी म्हटलं 'मी कधी कधी आभाची बाजू जास्त घेते हे मला जाणवतं पण तुला मी कारण सांगते ते पटतं का बघ. तू लहान होतास तेव्हा ते पाच वर्षांचा होईपर्यंत मी घरात होते. आभा मात्र दोन वर्षांची असतानाच मी नोकरी करायला लागले मला सारखं वाटतं तिच्यावर अन्याय झालाय्. तुझे खूप लाड झालेत !'

'पण त्यात माझा काय दोष ?'

'खरच. तुझा काही दोष नाही त्यामुळं त्याची शिक्षा तुला नाही मिळता कामा.'

'तू तिचे थोडे लाड कर पण माझीपण बाजू घे !'

'ही मी काळजी घेईन आणि तू पण समजून घे मी तिची बाजू का घेते ते.'

'पण तू तिची बाजू घेतेस याची तिला खात्री असते मग ती खोटं पण सांगते खूपदा.'

'हं ! असं नाही होता कामा आणि लहानपणी तिच्यावर अन्याय आणि मोठे-पणी तुझ्यावर अन्याय असं नको व्हायला, नाही का ?'

'हो ना !'

मुलानं अगदी जोरात हो ना म्हटलं.

असं दोघादोघानी स्वतंत्र बोलण्यात त्या वेळी इतर ताण नसतात हा फार मोठा फायदा होतो. यातून आपण जास्त जवळ येतो·

हे सगळं जे मुलांबद्दल मी लिहिते त्या-बद्दल मला त्यांची खरं तर क्षमा मागायला हवी. त्यांच्या खूप खाजगी गोष्टींची मी जाहीर वाच्यता केली; पण अशासाठी केली

की त्यातला अनुभवाचा वाटा सर्वांपर्यंत पोचावा.

मी जे मनापासून अनुभवलं, मुलांच्या लहानपणातला आनंद घेतला ते तुम्हाला सांगावंसं वाटलं. एरवीच्या बालविकासाच्या अमूर्त संकल्पना पुस्तकात आपण वाचतो, शिकतो, ऐकतो त्या मनात रुजत नाहीत असं वाटलं. जिवंत अनुभव सांगितले की ते सर्वांना भिडेल असं वाटलं.

माझी मुलं हुषार, सर्वगुणसंपन्न आहेत असा माझा मुळीच दावा नाही. सर्वच लहान मुलं हुषार असतात. संवेदनाक्षम असतात. त्यांचे हे गुण टिकावेत ही काळजी आपण कशी घ्यायची, हा मुख्य मुद्दा.

हे सगळं लिहिताना हे लहान मुलांबद्दल फार तर १० वर्षाच्या मुलापर्यंत लिहिलंय हे तुम्हालाही जाणवलं असेल. कारण माझा अनुभव तेवढाच आहे आणि जो माझा अनुभव नाही त्याबद्दल लिहिण्याचं तज्ज्ञपण मी कुठून आणू ? ते मला आणायचं नाही.

ह्या लेखनात अनेकदा उद्वेगानं मी शिक्षणाबद्दल लिहिलं, टी. व्ही.बद्दल लिहिलं, चित्रपटांबद्दल लिहिलं. मुलांशी वाईट वागणाऱ्या, पालकत्व नसणाऱ्या माणसांबद्दल लिहिलं ते खोटं नाही.

पण मला हेही पटतं की, नुसतं उद्वेगानं बोलून काही फारसं होत नाही. ह्या सगळ्यातून मार्ग काढणं हे आपल्याला जमायलाच हवं.

आजच्या जाहिराती मुलांवर कोणते संदेश आदळतायत ? मुलींकडे पाहून जिभल्या चाटा, दाराशी साबण विकायला आलेल्या सुंदर मुलीला प्रेयसी करण्याची स्वप्नं पहा, दारू प्या, डिस्को नाचा, मुलींच्या गालावरची मुरमं जाईपर्यंत तिला लग्नाला हो म्हणू नको, अमुक शॅम्पू वापरा, तमुक साड्या नेसा, अंग उघडं टाकून नाचा, मंजूळ बोला, कृत्रिम हावभाव करा, भुवया कोरा, लिपस्टिक लावा !

पुरुषार्थाचे, स्त्रीत्वाचे हेच आदर्श आहेत अशी मुलांची समजूत व्हायला नको असेल तर मी काय करायला हवं ? यामागचा अर्थ, त्यातला दिखाऊपणा, त्यातला खोटेपणा, अवास्तवपणा याबद्दल बोलायला हवं आणि चांगलं काय असतं, हेही दाखवायला हवं. चांगले चित्रपट असतात. नाटकं असतात. माणसं असतात. पुस्तकं असतात. चित्रं असतात. त्यातलं सौंदर्य, उदात्तपण मुलांपर्यंत पोचवायला हवं तेच ह्या आदळणाऱ्या लाटा दूर ठेवील.

मुलांना चांगल्या—वाइटाचा विवेक शिकवणं, त्याबद्दल विचार करायचं सामर्थ्य देणं, आत्मविश्वास देणं, निर्णयक्षमता देणं हे आपलं काम आहे आणि 'देणं' तरी कसं म्हणू ? ते त्यांना घेता यावं अशी परिस्थिती निर्माण करणं हे आपलं खरं काम आहे.

मी जशी लिहीत गेले ना तशा मलासुद्धा काही गोष्टी अधिक स्पष्टपणे कळल्या. त्याची बांधिलकी वाढली. मुलांना असं वागवायला हवं, हे मीच लिहिलंय. तेव्हा आता तसं मला वागलं पाहिजे याची जाण वाढली. हा अहंकार नव्हे. हे 'मूल' ह्या विषयातलंच थोडं जास्त कळणं आहे.

अनेक वाचकांची पत्रं येतायत, फोन येतायत. काही पालक आपापले प्रश्न घेऊन भेटायला येतायत आणि ह्या सर्वांशी बोलताना मला खूप बरं वाटतंय, मुलांबद्दल विचार करणाऱ्यांच्या वर्गात भर पडतेय हे समाधान मिळतंय. एक डॉक्टर म्हणाले, हे लेख मला पंधरा वर्षापूर्वी वाचायला मिळाले असते तर मी माझ्या मुलाशी वेगळा वागलो असतो. तरुण आया म्हणतात आम्ही लेख वाचतो आणि मिस्टरांना वाचायला लावतो. मोठ्या आया म्हणतात आमची मुलं आम्हाला विचारतात तू अशी वागलीस का ग आम्ही लहान असताना ? एक आई म्हणाली, माझी लहान मुलं 'माणूस' आला की अंक पहातात आणि दोन पाठमोऱ्या मुलांचं ते चित्र दिसलं की, मला म्हणतात 'आई, मुलांवरचा लेख आलाय ग. वाच !' कुणी मानसशास्त्र जाणणारे म्हणतात 'तुम्ही थिअरी इतक्या सहजपणे अनुभवातून मांडलीत !'


हा तुमचा—आमचा सहवास आता संपणार याचं वाईट वाटतंय !

पण आपण हे ठरवून टाकू या की, हा विषय मागे पडू द्यायचा नाही. याबद्दल लिहिलं पाहिजे, बोललं पाहिजे, वाचलं पाहिजे, पाहिलं पाहिजे, सर्वांपर्यंत पोचवलं पाहिजे. तुम्हाला जे जे जमेल ते तुम्ही करायचं. मलाही आणखी लिहायचंय. तुमची माझी पुन्हा लेखनातून भेट होईलच तेव्हा माझी मुलं आणखी मोठी झालेली असतील आणि तुमचीही आणि तेव्हा आपणही पालक म्हणून मोठे झालेले असू नाही का ?

आपल्या संवादाची संधी ज्यांनी आपआपल्याला दिली त्या 'माणूस'च्या मेघा राजहंस आणि श्री. माजगावकरांना धन्यवाद देऊन ही लेखमाला संपवते. 'अच्छा !' □

---

# कुंपण आणि आकाश



**मंगला गोडबोले**

अलीकडेच काही निमित्तानं सुशिक्षित मध्यमवर्गीय गृहिणींची एक लेखी स्पर्धा घेण्याचा योग आला होता. मराठीमधल्या स्त्रियांच्या एका नामवंत प्रकाशनाच्या सोहळ्यासाठी सुमारे अडीचशे—तीनशे स्त्रिया जमल्या होत्या आणि त्या प्रकाशनाची त्यांना कितपत ओळख आहे हे जाणून घेण्याच्या दृष्टीने त्याविषयी अगदी प्राथमिक स्वरूपाचे (ऑब्जेक्टिव्ह) वस्तुनिष्ठ प्रश्न विचारण्यात आलेले होते. अवघा पंधरा—वीस मिनिटांचा मामला ! स्पर्धेचा जीव लहान होता, बक्षिसंही मामुली होती. खरं म्हणजे तो एक बौद्धिक खेळच होता; पण पहिल्यांदा स्पर्धा म्हटल्यावरच अर्ध्याअधिक बायका गारद झाल्या. 'स्पर्धा ? नको बाई.' 'शी ! उगाच काय भलत्या वयात भलतं ?' 'तुम्हाला मास्तरकीची हौस असेल पण आम्हाला नाही विद्यार्थी व्हायचं' असे शेरे भर सभेत ऐकू येऊ लागले. त्यांना शांत केल्यावर काहीशा नाइलाजानं, कुरकुरत बायकांनी प्रश्नपत्रिका तर हाती घेतल्या; पण कित्येकींनी त्या परत केल्या नाहीत, केल्या त्यांनी धड भरल्या

नाहीत, भरल्या त्यानी विसगत (चुकीची नव्हेत) उत्तर दिली आणि अखेरीस निकाल सागताना तर एक दोघीनी जिवाचा धडा करून व्यासपीठापर्यंत येऊन जाहीर विनंती केली, 'आमची नाव घेऊन आमच्या उत्तर-पत्रिकांसबंधी काही सागू नका!' कोणाही व्यक्तीची टिंगल-टवाळी करावी, उपहास करावा, चारचौघात अधिक्षेप करावा असा तर आमचाही हेतू नव्हताच; पण या सर्व काळात एक गोष्ट मात्र सतत ठळकपणे जाणवत राहिली, स्पर्धा या प्रकारानं या सर्व स्त्रियाच पार पानिपत केलेल होतं! एरवी त्यापैकी कित्येक प्रश्नाची उत्तरं सहज गप्पागोष्टीत, खेळीमेळीत, स्पर्धा म्हणून न विचारता एरवी विचारली असती तर येण्यासारखी होती.

स्पर्धेचं इतकं दडपण, ताण, दबाव येण्याचं कारण काय? इतकच की लग्न झाल्यापासून आयुष्याच्या स्पर्धात्मक अगाला आपल्यापैकी बहुसख्य गृहिणी अतिशय पारख्या झालेल्या असतात. शाळा-कॉलेजमधल्या क्रमिक अभ्यासावरच्या परीक्षा सपल्या की एकच अतिम परीक्षा बहुतेकीनी दिलेली असते ती म्हणजे वधूपरीक्षा ऊर्फ वधूच्या मुखड्याची परीक्षा. एरवी ती वधूपित्याच्या सपत्तीची, प्रतीष्ठेची, वधूमायेच्या अगाखाद्यावरच्या दागिन्याची परीक्षा असते हे तर उघड गुपित असतं. या सर्वांमुळं एकदाची ही परीक्षा पार केली की मुलीच्या आयुष्यातल्या परीक्षा संपल्याच! म्हणजे धडपड करून तयारी करणं, जिकणं, हरण, त्यातल सुख किंवा दुःख भोगणं या अर्थानं स्पर्धा किंवा परीक्षा संपल्या. तशा बायका एकमेकीशी नाना बाबतीत स्पर्धा करतात; पण त्या पुष्कळदा माणसाच्या कुवतीपलीकडे असलेल्या देवदत्त बाबीमध्येच. उदाहरणार्थ, एखादीला मुलगा असणं-नसण, मुलं गोरी- देखणी- हुशार इत्यादी असणं-नसण, मुलीला चागलं स्थळ मिळणं-न मिळणं वगैरे. या बाबतीमध्ये सख्ख्या नात्यांपासून तो शेजाऱ्यापाजाऱ्यांपर्यंत, ओळखीच्या माणसापर्यंत कुठेही बायका स्पर्धा करतात. कळत-नकळत इरेला पेटतात आणि त्यातून पुष्कळ वेळा दुःख किंवा हताशपण पदरी पाडून घेतात. संसारी बायकाच्या स्पर्धेचा आणखी एक सहजगत्या दिसणारा प्रकार म्हणजे एखाद्या व्यक्तीवर आपल्या सर्व महत्त्वाकाक्षा केंद्रित करण. ही व्यक्ती बहुधा नवरा किंवा मुलं याच्यापैकी असते; कारण कमीअधिक प्रमाणात त्याच्यावर आपलं स्वामित्व आहे असं बाईला वाटत असतं. आपल्या सगळ्या अपुऱ्या इच्छा-आकाक्षा, स्वप्नं, ध्येय इत्यादीची पूर्ती नवऱ्याकडून किंवा मुलाकडून व्हावी म्हणून किती तरी बायका जिवाचं रान करतात आणि याबाबतीतही पुष्कळदा पराभूत होतात. क्वचित कधी नवऱ्यानं किंवा मुलान आपलं स्वप्न पुर केल असा तिला दिलासा मिळाला तरी बघता बघता त्या स्वप्नावर तोच नवरा किंवा मुलगा तिच्यापेक्षा जास्त हक्क सागू लागतो! आणि रूढ शब्दक्रमान सागायचं तर ती जिंकूनही हरते! नवऱ्याच्या ऑफीसच्या राजकारणामध्ये, बदलीइतका हस्तक्षेप करणारी जमात अशाच स्त्रियाची असते आणि प्रसगोपात ती उपहासाचा, कथाकादंबऱ्याचा विषयही बनते.

मला मात्र हा सगळाच प्रकार करुणाजनक वाटतो. माणसाच्या आयुष्यातलं निरोगी स्पर्धेच स्थान आता नव्यानं सागायला नको. स्पर्धेनं एकीकडे दैनंदिन जीवनातली मरगळ जाते, चैतन्य येतं, तर दुसरीकडे आपल्यातल्याच सुप्त शक्ती अधिक जाग्या होतात, टोकदार होतात. नेहमीच्याच कामाला स्पर्धेच्या वातावरणाने अधिक वेग आणि शिस्त येते. इतर स्पर्धकाच्या तुलनेत आपलं स्थान अजमावण्याची संधी मिळते. स्वतःविषयीचे गैरसमज लोपतात, आत्मविश्वास वाढतो. स्पर्धा जिंकता आली तर ती कितीही छोटी असली तरी तेवढ्यापुरता तरी जग जिकल्याचा आनंद मिळून जातो आणि कष्ट करूनही पराभव झाला तर तो खिळाडूपणे घेण्याचं मनाला वळण लागतं. थोडक्यात, स्पर्धा नुसतं तात्पुरतं यशापयशच नव्हे तर एक सबध जीवनदृष्टीच माणसाला देत असतात.

## स्पर्धा फक्त कुटुंबात

पण बहुसख्य स्त्रियांच्या बाबतीत लग्नानंतर हा मार्ग बंद. एक तर प्रत्येक स्पर्धेचा एकेक संदर्भविषय असतो. मग तो खेळ असेल, एखादी कला असेल किंवा कारागिरी असेल; पण ससार हाच एकमेव सदर्भविषय बायकानी बनवून टाकला की, स्पर्धेला फारसा वावच राहात नाही. कौतुक, शाबासकी, बक्षीस या गोष्टी म्हणजे पोरकटपणा, लहानाला मोठ्याने उदारपणे देण्याच्या चिजा असा आपल्याकडे सनातन भ्रम आहेच आणि लग्नाचा होम बळी घेणार तो मुलीच्या पोरपणाचाच. त्यामुळं प्रौढ वयात एखाद्या गृहिणीनं हिरीरीनं एखाद्या स्पर्धेची तयारी करायची म्हटली तरी तत्काळ 'कशाला शिंग मोडून वासरात शिरत्येस?' हा अहेर तिला मिळणारच, अशी आपल्याकडली परिस्थिती आहे. पासष्ट-सत्तर सालापर्यंत जोवर महिलामंडळ या संस्थेची चलती होती तोवर पाककृतीपासून स्मरणशक्तीपर्यंत नाना प्रकारच्या स्पर्धा त्या पातळीवर तरी गृहिणींसाठी खुल्या होत्या; पण दिवसेंदिवस वेगवेगळ्या वयांच्या भिन्न स्तरांमधल्या भिन्न कुवतीच्या स्त्रियाची 'कळपमंडळं' बायकानाच मोहवीनाशी झाली आहेत. शहरी जीवनाची धकाधक, जीवघेणा संघर्ष, बदलत्या कुटुबातली गृहिणीची बदलती भूमिका, अर्थार्जनाची निर्माण झालेली निकड इत्यादीमुळे महिलमडळाची संख्या व जोम उणावतच चाललेला आहे आणि त्या प्रमाणात तरुण मुलामुलींच्या किंवा प्रौढ पुरुषांच्या गटानीही महिलाना स्वीकारलेलं नाहीये.

परिणामी बरोबरीच्या वयाच्या, समानधर्मी, बरोबरीच्या कुवतीच्या स्त्रियामध्ये आपण कुठे बसतो हे आजच्या स्त्रीला कळण्याचं कोठलंही साधन उरत नाही. अंगभूत शक्ती वाढविण्याच आव्हान तिच्यापुढं नाही. मागं पडल्याची खत नाही, पुढं गेल तर दाद नाही असा विचित्र तिढा आहे. असामान्य कुवतीच्या, विशिष्ट जीवनध्येयाला वाहून घेणाऱ्या, कर्तबगार व्यावसायिक स्त्रियाना हे अर्थातच लागू नाही; पण त्या इतक्या अल्पसख्य आहेत की, त्यांच्यामुळं बहुसंख्य गृहिणीच्या सुस्त, स्पर्धारहित जीवनाला धक्का लागण्याची सुतराम शक्यता नाही.

याचे तोटे एरवी, सहजासहजी जाणवत नाहीत; पण स्पर्धा म्हटली की, बायका एकदमच हातपाय गाळतात तेव्हा ते लक्षात येतं. स्पर्धेच्या निमित्तानं अंगभूत शक्ती गोळा होण्याऐवजी त्यांच्या असलेल्या शक्तीही जातात. कमालीचा न्यूनगंड असतो, भीती

असते, जिंकणं–हरणं जीवनमरणासारखं अवास्तव महत्त्वाचं वाटायला लागतं. (पालक म्हणून आपल्या मुलांच्याही मनात त्या हेच भरवतात.) हरण्याच्या भीतीनं स्पर्धेत भाग घेऊच नये ही एक साधी सरळ प्रतिक्रिया तरी दिसते किंवा 'आपण उगाच भाग घेतला झालं, आपण थोडेच जिंकणार आहोत?' अशी सपशेल शरणागती तरी दिसते. त्यात समोर एखादी यंत्रणा असली, एखादा गणवेषधारी माणूस दिसला म्हणजे तर बघायला नको. साध्या रेडिओ, टी. व्ही. च्या लायसन्सच्या रांगेत आठ–दहा सुगृहिणी जर उभ्या असल्या तर त्या दहा वेळा एकमेकींना विचारून किंवा एकमेकींच्या कागदामध्ये डोकवून एखादा फॉर्म भरतील; पण स्वत: वाचून समजून घेऊन, शांतपणे, एकटीनं ते काम करणार नाहीत. कारण आत्मविश्वासापेक्षा घोळक्याच्या सुरक्षिततेवरच त्यांचा विश्वास जास्त! काही वेळा समाजात अपूर्ण राहिलेली ही स्पर्धेची भूक त्या कुटुंबातच पूर्ण करू बघतात म्हणजे पुन्हा त्याच नात्यांचा श्रेणी, तेच मानपान, तीच जन्मानं मिळालेली वडीलकी आणि तेच सासरमाहेरचे गुंते!

संसाराची अशी आठ–दहा वर्षं गेली की, बायका स्वत:च स्वत:ला सगळ्या स्पर्धांमधून रद्दबातल करतात. वरवर आपल्याला त्या वेगवेगळ्या क्लासांना जाताना, परीक्षांना हौसेनं बसताना वगैरे दिसतातही; पण 'आपलं काय, संसार सांभाळून कसंबसं करायचं' अशी खूणगाठ बांधून त्यांनी स्वत:ला स्पर्धक मानलेलंच नसतं. पेशाच्या, वयाच्या, मध्यंतरी गेलेल्या वेळाच्या अनेक सवलती त्यांनी स्वत:च स्वत:साठी निर्माण केलेल्या असतात. स्पर्धेत पुरुष दिसले तर त्या स्त्रीदाक्षिण्याची अपेक्षा त्यांच्याकडून करतात आणि पुरुषही एरवी कधीही न दाखवलेलं दाक्षिण्य अशा वेळी तत्परतेनं दाखवतात. बायकांशी कसली स्पर्धा करायची? त्या तर लिंबूटिंबूच!

निमित्त त्या स्पर्धेचं. त्यावरून इतके संमिश्र विचार माझ्या मनात आले. निघताना कोणी तरी विचारलं,

'आमचं एक सोडा, तुम्हाला काय मिळालं या स्पर्धेतून?'

'बायकांसाठी अशा स्पर्धा वारंवार घेतल्या गेल्या पाहिजेत अशी प्रेरणा' मी तत्काळ उत्तर दिलं. खरोखर; आयुष्याच्या स्पर्धात्मक अंगाला बहुसंख्य बायका वंचित राहाणं हे आपल्या समाजाला परवडणार नाहीये. □




रंगभूमी

# शांतेचं कार्टं

वि. भा. देशपांडे

'शातेचं कार्टं चालू आहे' हे श्रीनिवास भणगेचे नाटक. नाव लक्ष वेधून घेणारे आहे. अर्थात हे नाटक पूर्वी एकदा येऊन गेलेले आहे. तेव्हा त्याचे नाव होते 'घालीन लोटांगण'. त्याही वेळी ते व्यावसायिक मंडळीना घेऊन केले होते; पण प्रयोग फार मोठी उंची गाठू शकला नाही आता मात्र या प्रयोगाचे रूप चागलेच पालटले आहे.

कजाग बाई, भित्रट नवरा आणि चोरून प्रेम करणारा मुलगा अशा कुटुंबाची ही कथा. घरातल्या कजाग, कांगावखोर बाईला ताळयावर आणण्यासाठी एका पत्राने कुभांड रचले जाते. त्या पत्राने घरातले वातावरण कसे बदलते यातले नाट्य लेखकाने पकडण्याचा प्रयत्न केला आहे. मूळ विषयाचा जीव खूपच लहान आहे. त्याचा विस्तार पसरटपणाकडे, पुनरुक्तीकडे जाणारा आहे.

विनोदी अंगाने आणि ढंगाने जाणारी नाटके ही प्रत्यक्ष वाचनापेक्षा प्रयोगाने अधिक खुलतात. याही नाटकाच्या बाबतीत तसेच घडले. लक्ष्मीकात बेर्डे, सुधीर जोशी आणि नयनतारा ही त्रयी संपूर्ण प्रयोगाचा तोल सांभाळते. प्रयोग गतिमान राहील याची काळजी घेते. लक्ष्मीकात आणि सुधीर हे दोघेही सध्या जोशात आहेत. त्यांना विनोदी व्यक्तिरेखेची नस सहजपणाने गवसते आणि तितक्याच स्वभाविकपणे ते त्याची अभिव्यक्ती करू शकतात. चरित्र–व्यक्तिरेखा करण्यात सुधीर जोशी निष्णात आहे. तो आपल्या देहाकाराचा, मुद्रेवरच्या वरकरणी दिसणाऱ्या भाबडेपणाच्या गोष्टीचा वापर यथायोग्यपणे करतो. लक्ष्मीकांत बेर्डे हा सध्याच्या रंगभूमीवरील विनोदी व्यक्तिरेखा करणाऱ्या कलाकारांमध्ये आघाडीवर आहे. 'टुरटूर', 'उचलबागडी' ह्या नाटकातील त्याचा अभिनय त्याला साक्षी आहे. त्याला रंगमंचीय हालचालीतली चपळाई जशी आहे, तशीच शब्द–संवाद–फेकीतील वेळेची अचूकता आहे. विनोदी कलाकाराला ही सावधानता कमालीची असावी लागते तशी ती त्याच्याकडे आहे. फक्त अशा कलाकारांबद्दल नेहमी एकच धोका असतो; तो म्हणजे प्रयोगाची रंगत वाढावी या नावाखाली पदरची शब्द–वाक्ये वापरण्याची सवय जडते. लेखकाचे शब्द बाजूला पडतात आणि तो कलावत वरचढ होण्याची शक्यता असते. लक्ष्मीकांत ही काळजी घेईल इतपत सुजाण आहे. सुधीर जोशी आणि लक्ष्मीकांत बेर्डे याच्या अभिनयदर्शनासाठी हे 'शातेचं कार्टं' पाहायला हरकत नाही. त्या दोघांना नयनतारा आणि रूही यानी यथायोग्य साथ दिली आहे.

या नाटकाचा दिग्दर्शक आहे प्रकाश बुद्धिसागर. हा खरे तर प्रायोगिक नाटकवाला माणूस; पण अलीकडे व्यावसायिक रंगभूमीवर अभिनय–दिग्दर्शन करू लागला. हा एक गुणी कलावंत आहे. खूप धडपडणारा, मेहनत करणारा आहे. त्याला व्यावसायिक रंगभूमीवर दिग्दर्शक म्हणून निश्चितच मान्यता मिळेल असे त्याच्या प्रयत्नांवरून दिसते. कारण हाताशी असलेले कलावंत नेमके कसे वापरावेत हे तंत्र त्याला या नाटकात अवगत झाले आहे. योग्य कलावंत आणि दिग्दर्शक मिळाला तर एखादे नाटक कसे उत्फुल्ल होते ते या नाटकाने सिद्ध केले. नाटकाचे नेपथ्य आदी पूरक, प्रयोगतंत्रे व्यवस्थित होती. शेवटी मात्र जाणवले असे की, आहे त्यापेक्षाही नाटकाची संहिता आणखी संपादित करायला हवी होती. त्यामुळे एकूणच प्रयोगाला बंदिस्तपण येईल. ¤

## पद्मभूषण

२६ जानेवारीची वृत्तपत्रे हाती आली आणि एक सुखद धक्का बसला, तो म्हणजे विजय तेंडुलकराना भारत सरकारने पद्मभूषण हा सन्मान बहाल केला! सुखद धक्का अशा अर्थाने की, तेंडुलकराचे नाव सरकारच्या यादीत इतक्या आस्थेने, प्रेमाने आहे की नाही याची खात्री नव्हती. कारण तेंडुलकर तसे वादग्रस्त नाटककार आणि गूढ व्यक्तिमत्त्व असलेले लेखक आहेत. ते केवळ नाटककारच नाहीत तर ते कथाकार, एकांकिकाकार, ललितलेखक, पत्रकार आणि अलीकडच्या काळात चित्रपटकथालेखक म्हणून लौकिक असलेली चतुरस्र व्यक्ती आहेत. त्यांचा हा लेखनप्रवास अखंडपणाने गेली पचवीस–तीस वर्षे चाललेला आहे. या प्रवासातली अनेक अपयशे त्यानी अनुभवली आणि पचवलीही. आपल्या दिशेने जात ते लेखन करीत आहेत. अगदी शून्यातून, नकारातून हा प्रवास आरंभित झाला आणि एका सन्मानाच्या वाटेवर भारतीय स्तरावर येऊन पोहोचला. गेल्या सात–आठ वर्षांत तेंडुलकराची प्रतिमा नाटककार म्हणून केवळ महाराष्ट्रातच नव्हे तर सर्व प्रांतामध्ये तितक्याच प्रमाणात मोठी होत गेली, याचा अनुभव मी स्वत: घेतला आहे. कर्नाटक, दिल्ली, कलकत्ता आदि ठिकाणी रंगभूमि-अभ्यासासाठी जाण्याचा योग आला तेव्हा मराठी रंगभूमीची चर्चा अपरिहार्यपणे झालीच; पण जेव्हा १९६० नंतरच्या आधुनिक रंगभूमीची चर्चा घडायची तेव्हा सर्वात प्रथम तेंडुलकरांच्या नाटकांचा उल्लेख कुतूहलाने, आदराने होत गेला. मराठी नाटककार अन्य प्रातात इतका आवर्जून वाचला–पाहिला–चर्चिला जातो हे आनंददायी आहे, असा भाग्ययोग तेंडुलकरांप्रमाणे पु. ल. देशपांडे आणि आता अलीकडे वसत कानेटकर, जयवंत दळवी ह्या नावाना आहे.

अशा वादग्रस्त, वादळग्रस्त नाटककाराला, बहुरूपी लेखकाला पद्मभूषण मिळाल्याबद्दल निश्चितच आनद वाटला. मन:पूर्वक अभिनंदन!

¤ महाराष्ट्रातील एक महत्त्वपूर्ण संगीत-बारीवाल्या आणि लावणीवर प्रचंड हुकमत ठेवून गाणाऱ्या राधाबाई बुधगावकर यांचे नुकतेच निधन झाले. त्या ८५ वर्षांच्या होत्या. गेली पन्नास वर्षे त्यांची संगीत बारी मराठी लावणी–रसिकाला परिचित होती. तमाशा–लावणी–क्षेत्रातली एक जबरदस्त ताकदीची कलावती म्हणून त्यांचा लौकिक होता.

¤ बाळ कोल्हटकर यांच्या 'उघडले स्वर्गाचे दार' या नाटकाचा २०० वा प्रयोग समारंभपूर्वक पुण्यात २९ जाने. ला पेश झाला. या समारंभाला प्रमुख पाहुणे होते श्री. एस्. एम. जोशी. त्याव्यतिरिक्त श्रीमती ज्योत्स्नाबाई भोळेही उपस्थित होत्या. ❑

# शौर्य आणि सौंदर्याचा ध्यास...सोहराब

माणसानं पन्नाशीचा उबरठा ओलांडला की, त्याच्या उमेदीला खीळ बसते, हा एक सर्वसामान्य समज; पण नियमाला अपवाद असतातच. चित्रपटसृष्टीच्या बाबतीत बोलायच झालं तर व्ही. शांताराम, सोहराब मोदी, अशोककुमार वगैरे मंडळी या अपवादातच मोडणारी. वाढत्या वयाच्या खुणा याच्या शरीरावर उमटल्या म्हणून म्हणायचं म्हातारे झालेत. या पार्श्वभूमीवरच सोहराब मोदी गेले, म्हटल्यावर सगळ्यांना धक्का बसणं अगदी साहजिक होतं. प्रेमळ पित्याच्या भूमिकेतून साऱ्या चित्रपटसृष्टीवर प्रेमाची पखरण घालणाऱ्या नासीर हुसेन याच्या निधनाची बातमी कानाआड करतोय न करतोय तोच सोहराब मोदी याच्या निधनाची बातमी कानावर येऊन धडकली. सोहराब मोदी यांचं निधन—ही गोष्ट म्हटलं तर अपेक्षित होती, म्हटलं तर अनपेक्षित होती. अपेक्षित म्हणायचं. एवढ्यासाठीच की, त्यांचं वय थोडथोडकं नव्हे तर ८६ वर्षांचं ! त्यात पुन्हा कर्करोगासारख्या असाध्य रोगानं शरीर पोखरायला सुरुवात केलेली. आणि अनपेक्षित अशासाठी की, या सत्य परिस्थितीमुळं मृत्यूची सावली त्यांच्यावर पडली आहे, याची कल्पना असली तरी त्यांचा मृत्यू इतक्या नजिकच्या भविष्य काळात आहे, याची मात्र कोणालाच कल्पना नव्हती. एवढंच नाही तर अगदी कालपरवापर्यंत हा माणूस ताठ उभा होता. पंचविशीतल्या तरुणाला लाजवेल अशा उत्साहानं नव्या चित्रपटाची दणदणीत घोषणा करत होता. त्यांच्या या घोषणेचा आवाज विरण्याच्या आतच मृत्यूनं दावा साधला!

सोहराब मोदीची चित्रपटसृष्टीतली ओळख करून दिली जाते ती 'चित्रपटसृष्टीचा सिंह' म्हणून. आणि चित्रपटांविषयीच्या निस्सीम प्रेमाचं मूळही त्याच्या घराण्यातच सापडतं. ग्वाल्हेरला असलेल्या एका चित्रपटगृहाच्या मालकीमुळं मोदी कुटुंब चित्रपटाशी परिचित होतेच. पुढं रुस्तुम मोदी या सोहराब मोदीच्या मोठ्या भावानं फिरत्या सिनेमाचा व्यवसाय सुरू केला. त्याचा हा व्यवसाय चांगलाच यशस्वी ठरला; पण त्यानंतर त्यांनी पुण्याला अपोलो चित्रपटगृह भागीदारीत बांधल्यानंतर दोन्हीच्या जबाबदाऱ्या एकट्यानंच सांभाळणं जड जाऊ लागलं, आणि फिरत्या सिनेमाची जबाबदारी सोहराब मोदी याच्याकडे आली. त्यानंतर रुस्तुम मोदीनी एक नाटक कंपनी काढली; पण ते आजारी पडल्यानं ही नाटककंपनीही सोहराब मोदींच्याच ताब्यात आली, पण नाटक कंपनीच्या जबाबदारीमुळे सोहराब मोदीना आपली इच्छा प्रत्यक्षात आणण्याच्या दृष्टीनं एक दिशा मिळाली. कारण मोठ्या मात्राचे उद्योग सोहराब मोदी सांभाळत असले तरी त्यांचा खरा ओढा अभिनयाकडेच जास्त होता. आणि नाटक कंपनी हातात येताच सोहराब मोदीनी धडाधड नाटकं बसवायला सुरुवात केली. सुरुवातीच्या काळात फक्त हिंदीतून नाटकं सादर करता करता मराठी आणि उर्दू भाषातली नाटकं सादर करून त्यांनी या नाटककंपनीचा व्याप बराच वाढवला. लहानपणी सोहराब मोदीचं आणि इतिहासाचं चांगलंच वाकडं होतं; पण योगायोग असा की, सोहराब मोदी पुढं प्रसिद्धीस आले ते ऐतिहासिक चित्रपटाचे निर्माते दिग्दर्शक, अभिनेते म्हणूनच इतिहासाची आणि सोहराब मोदीची 'दिलजमाई' घडवून आणण्याचं अवघड काम केलं होतं. शेक्सपियरनं शेक्सपियरच्या साहित्यकृतींनी त्यांच्यावर एवढी भुरळ घातली होती की, त्यांच्या नाटककंपनीतर्फे सादर होणारी नाटकं म्हणजे मुख्यत्वेकरून शेक्सपियरच्या नाटकांचे अनुवाद असायचे आणि प्रमुख भूमिका अर्थातच सोहराब मोदीची असायची.

जवळजवळ दहा वर्षं हा सारा फापटपसारा सांभाळल्यानंतर १९३५ च्या सुमारास या नाटककंपनीचं रूपांतर त्यांनी चित्रपटसंस्थेत केलं. आणि 'स्टेज फिल्म कंपनी' या नावाखाली ही संस्था आधी केलेल्या नाटकांवरूनच चित्रपट तयार करू लागली. पण 'आत्मतरंग' हा स्वतंत्र चित्रपटनिर्मितीचा प्रयत्न मात्र अंगाशी आला. हळूहळू ही चित्रपटसंस्था बंद पडली; पण सोहराब मोदी मात्र संपले नाहीत. त्यानी पुन्हा नव्या उमेदीनं एप्रिल १९३७ मध्ये 'मिनर्व्हा मुव्हीटोन' या नावानं चित्रपटसंस्थेची पुन्हा सुरुवात केली आणि 'मिनर्व्हा मुव्हीटोन'नं मात्र सोहराब मोदीना चांगलाच हात दिला !

### दिपवणारी भव्यता

'पुकार', 'पृथ्वीवल्लभ', 'जेलर' 'शीशमहल', 'खून का खून' अशा सोहराब मोदीच्या अनेक भूमिका गाजल्या. जहांगिरची न्यायप्रियता आणि नूरजहानवरील प्रेम यामुळं निर्माण झालेलं नाट्य हा विषय घेऊन 'पुकार' निर्माण झाला होता. या चित्रपटाच्या यशात सोहराब मोदींच्या सग्रामसिंगच्या भूमिकेचा तर मोठा वाटा होताच; पण त्याबरोबर भेदक नजरेचा चंद्रमोहन आणि आरसपानी सौंदर्याची नसीम यानाही विसरून चालणार नाही. सोहराब मोदीच्याच 'खून का खून' या पहिल्या चित्रपटातही नसीम होतीच; पण तिचा हा पहिलाच चित्रपट असल्यानं तिच्या अभिनयाचा कस लागायचा होता. तसंच ती अतिशय लाजरी होती. तेव्हा तिचा हा लाजरेपणा, भित्रेपणा जावा आणि तिच्यात आत्मविश्वास निर्माण व्हावा, यासाठी सोहराब मोदींनी नसीमची आई शमशाद हिला हॅम्लेटच्या आईची भूमिका करायला सांगितली. म्हणजे नसीम आणि शमशाद दोघीही चित्रपटात नव्या, रंगमंचाशी खूप जवळचं नातं असणारे सोहराब मोदी चित्रपटाच्या पडद्याला नवीनच होते. असा साराच नवोदिताचा मामला होता; पण तरीही चित्रपटावर त्याचा काही परिणाम झाला नाही. उलट हा चित्रपट चांगलाच यशस्वी ठरला आणि या चित्रपटानं सोहराब मोदी यांच्या यशस्वी कारकीर्दीचा पायाही चांगला घालून

दिला. पुढंही त्याच्या आयुष्यात अनेक चढ-उतार आले; पण यशानं ते कधी हुरळून गेले नाहीत की, अपयशान खचून गेले नाहीत. यशाच्या पुण्याईवर अपयशातून मार्ग काढत काढत सतत वाटचाल चालू राहिली आणि चित्रपटसृष्टीच्या इतिहासात त्यानी अक्षरश: एक कालखंड निर्माण केला.

सोहराब मोदीचे चित्रपट हे खऱ्या अर्थानं ऐतिहासिक चित्रपट होते. खऱ्या अर्थानं म्हणायचं कारण एवढच की ते इतिहासाशी प्रामाणिक होते. इतर तथाकथित ऐतिहासिक चित्रपटाप्रमाणे ऐतिहासिक मूल्य तोंडी लावण्यापुरती आणि इतर फापटपसारा किंवा प्रेमकहाण्याचा धुमाकूळ मोठ्या प्रमाणावर अशी अवस्था नव्हती. या चित्रपटामध्ये डोळे दिपवणारी भव्यता होती; पण निव्वळ दिखाऊपणाचा हव्यास किंवा नुसताच पोशाखी कारभार नव्हता. त्यात पल्लेदार संवादांची आतषबाजी होती; पण केवळ शब्दबंबाळ नव्हते. सोहराब मोदीच्या चित्रपटातील या गुणवैशिष्ट्याची झलक मध्यतरी दूरदर्शनवर दाखवलेल्या चित्रपटामुळे बघायला मिळाली; पण ही झलकच चित्रपटगृहातील मोठ्या पडद्यावर या चित्रपटाची मजा कशी और असेल ही खंत मनात अजूनच वाढवून गेली.

## शौर्य आणि सौंदर्य

'सिकंदर'मध्ये पोरसाची भूमिका करणारे सोहराब मोदी आणि अलेक्झांडरची भूमिका करणारे पृथ्वीराज कपूर या दोघामुळे अभिनयाची एक अप्रतिम जुगलबंदीच बघायला मिळाली. आतरराष्ट्रीय स्तरावर चर्चिल्या गेलेल्या 'सिकदर'ची तुलना डी. डब्ल्यू. ग्रिफीथच्या 'बर्थ ऑफ नेशन'शीही केली गेली होती. पहिला रगीत चित्रपट म्हणून मान मिळवणारा 'झाँसी की रानी' हे सोहराब मोदीच अतिशय महत्त्वाकांक्षी प्रॉडक्शन. या चित्रपटाची पडद्यामागची कहाणी अशी होती की, तोपर्यंत सोहराब मोदीनी बऱ्याचशा ऐतिहासिक राजाना चित्ररूप दिलं होत; पण राण्या मात्र उपेक्षितच राहिल्या होत्या. त्यामुळे एखाद्या राणीवर चित्रपट काढावा-अस सारख त्याना वाटू लागलं होतं आणि या विचा रासरशी चितोडची राणी पद्मिनी हा शौर्य आणि सौंदर्य यांचा मिलाफ असणारा विषय डोक्यात घोळू लागला; पण त्या काळातले हिंदु-मुस्लिम ताणलेले सबंध लक्षात घेता ही कल्पना बारगळली. तेव्हा सोहराब मोदीची पत्नी मेहताब यांनी 'झाशीच्या राणी'वर चित्रपट काढायची केलेली सूचना त्यांना एकदम पटली. हा चित्रपट जास्तीत जास्त यथार्थवादी व्हावा म्हणून वेषभूषा, नेत्रदीपक सेटस् यावर पाण्यासारखा पैसा खर्च केला. चित्रीकरणासाठी खास परदेशी तंत्रज्ञ आणि उपकरणं मागवून घेतली. हा चित्रपट पहिल्यादा रंगीत काढण्याची कल्पना नव्हती; पण एकंदरीतच आकर्षक वेशभूषा, भव्य, देखणे सेटस् याना कृष्णधवल रंगामध्ये योग्य तो न्याय मिळणार नाही, म्हणून हा चित्रपट रंगीत घ्यायचं ठरलं आणि एखादी गोष्ट डोक्यात आल्यानंतर ती करायचीच, हा त्यांचा खाक्या असल्यानं कसल्याही अडचणीचा बाऊ न करता 'झाँसीकी रानी'ची निर्मिती त्यानी भव्य प्रमाणावर केली. खुद्द सोहराब मोदीनीच याच वर्णन करताना एके ठिकाणी म्हटलय की, 'मोदीबधूनी एखादी गोष्ट करायची म्हटल्यावर देवही त्यांच्या पाठीशी उभा राहतो.' अर्थात असं असल तरी एकंदरीतच 'झाँसी की रानी'न सोहराब मोदी याच्या सहनशक्तीचा अत पाहिला. ज्या चित्रपटाच्या निर्मितीसाठी सोहराब मोदीनी जीवाच रान केल होत. तो चित्रपट ठप्प होतो का काय अशी परिस्थिती निर्माण झाली आणि निराशेनं घेरलेल्या सोहराब मोदीच्या अनेक रात्रीच्या रात्री झोपेविना गेल्या; पण त्यातूनच मार्ग काढत काढत 'झाँसी की रानी' पूर्ण झाला आणि हाच चित्रपट त्याचा अतिशय आवडता चित्रपट होता!

नायिकाप्रधान अशा या चित्रपटात सोहराब मोदीनी 'राजगुरू'ची भूमिका केली होती. चित्रपटाच्या यथार्थवादी पार्श्वभूमीवर आपल्याही भूमिकेत थोडीफारसुद्धा उणीव राहू नये म्हणून आणि विगवर विश्वास नसलेल्या सोहराब मोदींनी या चित्रपटासाठी डोक्याचा तुळतुळीत गोटाच करून टाकला! 'झाँसी की रानी' चित्रपटातील राजगुरूची ही भूमिका त्यांच्या आधीच्या भूमिकांशी तुलना करता छोटीशी होती. अर्थात भूमिका छोटीशी; पण महत्त्वाची होती. कथेत तिला महत्त्वाचं स्थान होतं. त्यामुळं या भूमिकेनं त्यांना एवढं भारून टाकलं होतं की, चित्रपट संपला तरी सोहराब मोदी या व्यक्तिरेखेच सावट घेऊनच वावरत होते. 'झाँसी की रानी'त एवढी छोटीशी भूमिका का? असा प्रश्न सोहराब मोदीना विचारला गेला असता 'हा 'झाँसी का राजा' अथवा 'झाँसी का राजगुरु' असा चित्रपट नसून तो 'झाँसी की रानी' चित्रपट आहे म्हणून!' असं खणखणीत उत्तर देऊन सोहराब मोदीनी प्रश्नकर्त्यांची तोंडं बंद करून टाकली!

## गुरुदक्षिणा अपूर्ण

बहुतेक चित्रपटामध्ये निर्माता-दिग्दर्शक-अभिनेता अशी तिहेरी भूमिका बजावणाऱ्या सोहराब मोदींना 'यहुदी' या एस. बी. वाच्छानिर्मित चित्रपटात बिमल रॉय याच्या दिग्दर्शनाखाली काम करावं लागलं. सुरुवाती-सुरुवातीला दुसऱ्या कुणाकडून दिग्दर्शनाच्या सूचना घेण्याची सवय नसल्यामुळं सोहराब मोदी आणि सोहराब मोदी हे स्वत: एक कसलेले दिग्दर्शक आहेत, याची मनात कुठे तरी जागती जाणीव असल्यानं बिमलदा, दोघही जरा अवघडलेल्या स्थितीत असायचे; पण हळूहळू सहवासानं हे अवघडलेपण कमी होत गेलं आणि शेवटी तर दिग्दर्शक आणि अभिनेता याच्या तारा जुळल्या की, त्याचा परिणाम किती चांगला होतो, हेच 'यहुदी'न दाखवून दिलं.

'सिकदर'मधला पोरस, 'पृथ्वीवल्लभ'-मधील पृथ्वीवल्लभ, 'यहुदी'मधला उझा, 'झाँसी की रानी'मधला राजगुरु, 'खून का खून'मधला हॅम्लेट, 'पुकार'मधला संग्रामसिंह- अशा अनेक ऐतिहासिक भूमिकातून आपला ठसा उमटवणाऱ्या सोहराब मोदीनी 'जेलर', 'मेरा घर मेरे बच्चे' वगैरे चित्रपटात ऐतिहासिक चित्रपटांच्या नायकाचा अंगरखा काही काळ उतरवून ठेवला होता आणि त्यातही ते यशस्वी झाले! 'जेलर'मधील कलाकाराच्या अभिनयाबरोबरच या चित्रपटासाठी मदनमोहन यानी बाधलेल्या सगीतानंही सर्वांवरच जादू घातली होती. 'जेलर' प्रमाणेच 'मिर्झा गालिब' या सोहराब मोदीनिर्मित

आणि दिग्दर्शित चित्रपटानं आणि गुलाम मोहम्मद याच्या संगीतानं सगळ्यांना मोहवून टाकलं होतं. कवी गालिब आणि मोती बेगम यांच्या प्रेमकहाणीवरचा हा चित्रपट मूळ कथेइतकाच हळुवार होता आणि या चित्रपटानंच सोहराब मोदी यांना राष्ट्रपतीच्या सुवर्णपदकाचा मान मिळवून दिला! असा मान मिळवणारे सोहराब मोदी हे पहिले निर्माते! पुढे १९०९ मध्ये ते 'दादासाहेब फाळके' पारितोषिकाचेही मानकरी ठरले!

अलीकडेच त्यानी 'गुरुदक्षिणा' या चित्रपटाची घोषणा केली होती. हरीन मेहता यांच्या 'शुभदिन आयो' या गुजराती कहाणीवर आधारित या चित्रपटात तानसेन आणि त्याचा मुलगा बिलासखान यांच्या प्रमुख व्यक्तिरेखा होत्या. या प्रमुख व्यक्तिरेखासाठी कोणाला करारबद्ध करायचं हे निश्चित झालेलं नसलं तरी नायिका म्हणून पद्मिनी कोल्हापुरेला निश्चित करण्यात आलं होतं आणि चित्रपटाचा मुहूर्तही तिच्यावरच करण्यात आला होता. संगीत हाच त्या चित्रपटाचा आत्मा आहे. अशा या 'गुरुदक्षिणा' चित्रपटासाठी गेली कित्येक वर्षं चित्रपटसृष्टीपासून फारकत घेतलेले नौशादही पुन्हा संगीतकार म्हणून सूत्र उचलणार होते; पण...सगळंच राहून गेलं!

—शुभदा रानडे

# सिंह झोपी गेला!

सोहराब मोदी गेले...नव्हे, नव्हे या सिनेजगलातील तो राजबिंडा सिंह झोपी गेला, कायमचा! तसा गेल्या काही वर्षांत हा सिंह म्हातारा झाल्याचे दिसत होते. तो थकला होता. त्याच्या डरकाळ्या तर केव्हाच बंद झाल्या होत्या. अधून-मधून तसा थोडाफार तो गुरगुरत होता. अलीकडेच 'रझिया सुलतान' मधील त्याचं दर्शन तो आता मृत्यूच्या दिशेने वाटचाल करीत असल्याचे सांगून गेले.

कमाल अमरोहीचे अकरा वर्षांचे स्वप्न 'रझिया सुलतान' च्या लहरी तिकिटखिडकीवर आपटून फुटले, भग पावले! सध्याचा जमाना या अशा भव्य-दिव्य इतिहासपटाचा नाही हेच गतवर्षी या तिकिट-खिडकीने दाखवून दिले. अमिताभी युगाचा ठोसा 'रझिया' ला मिळाला कदाचित याच काळाची सूचक नोंद घेऊन हा सिंह झोपी गेला असावा!

पण एक काळ असा होता की, याच प्रकारच्या इतिहासपटांनी रुपेरी पडदा व्यापला होता. काही माणसं जशी इतिहास घडविण्यासाठी जन्माला येतात तशी काही माणस तो इतिहास जागविण्यासाठी... 'रामायण' ला चित्ररूप देणारा चित्र वाल्मीकी विजय भट्ट, 'शिवाजी'चे सर्व पैलू दृश्यांकित करणारे चित्रपती व्ही. शांताराम व भालजी पेंढारकर तर मोगल राजवटीतील अनोख्या प्रेमकथानी वेडा झालेला के. असीफ याचा तो काळ! 'रुपेरी पडदा' या दिग्दर्शकांनी आपल्या प्रतिमेने त्या काळातच नेला होता. सोहराब मोदी हे याच काळातील विशाल व्यक्तिमत्त्व केवळ रुपेरी पडद्यावरच नव्हे तर पडद्याआडही लक्ष वेधून घेणारे!

मोदीचे अवघे व्यक्तिमत्त्वच त्या जंगलाच्या राजाशी नात सांगणारं, आपण त्याच्याच जातकुळीचे आहोत हे सिद्ध करणारं. ते धैर्य, तोच भव्य-दिव्यपणा, दरारा, जरब, मर्दुमकी आणि तसाच आब-रुबाब शाही सौंदर्य घेऊन मोदी या सिनेजंगलात जगले!

त्याचं धिप्पाड-आडदांड व्यक्तिमत्त्व आणि त्याला साजेसा तो जाडा-भरडा, घसघशीत आवाज. त्याची शब्दफेकीतील जरबही त्या अंधाऱ्या चित्रपटगृहात दरारा निर्माण करणारी. 'क्या हमारा खून, खून नही.' असं म्हणणारा तो 'यहूदी' कोण विसरेल?

अशा या विशाल व्यक्तिमत्त्वामुळेच त्यांच्या भूमिका, त्याचे इतिहासपट याना एक भव्यता, उदात्तपणा प्राप्त झाला होता. त्या काळात जेव्हा-केव्हा 'मिनर्व्हा मुव्हीटोन'चा सिंह डरकाळ्या फोडत असे तेव्हा प्रेक्षकाचे कान टवकारत. त्यांच्या सावधचित्त नजरा रुपेरी चौकटीत एकाग्र होत असत!

तसे मोदींना सिनेमापेक्षा रंगभूमीचेच वेड! ज्या काळात सिनेमा जन्माला आला त्या काळी म्हणजे २ नोव्हें १८९७ मध्ये मोदीचा जन्म झालेला लहानपणापासून हा सिनेमाच्या संगतीत वाढला. फिरता सिनेमा घेऊन हिंडला; पण किती झालं तरी तो मूकपटाचा जमाना. आपल्या आवाजाची किमया माहीत असलेल्या या कलावंताला सिनेमापेक्षा रंगभूमीनेच आकर्षित केले. हा पुण्यात आला आणि त्याने आर्य सुबोध नाटक मंडळीशी सधान साधलं आणि अकरा वर्षे रंगभूमीवर वावरला! १९३१ ला सिनेमा बोलू लागला तसे मोदींनी सिनेमाकडे मोर्चा वळविला; पण रंगभूमीच्याच दृष्टिकोनातून. त्याचा पहिला चित्रपट 'खून का खून' म्हणजे 'फोटोग्राफिक थिएटर'च होते.

'खून का खून' नंतर मोदीचे चित्रपट लागोपाठ पडले काही काळ ते थांबले आणि मग काही सामाजिक चित्रपट निर्माण केले. घटस्फोटाच्या प्रश्नावरील 'तलाक' विवाह समस्येतील गुतागुंत व्यक्त करणारा 'मिठा जहर' आणि स्त्रीमुक्तीबाबत वादग्रस्त विधान करणारा 'उलटी गंगा' अशा चित्रपटाची त्यांनी निर्मिती केली.

१९३९ मध्ये 'पुकार' निर्माण केला आणि मोदींना सूर गवसला. त्यानंतर 'पृथ्वी वल्लभ' 'शीश महल' 'एक दिन का सुलतान' 'झाशी की राणी', 'मिर्झा गालीब' अशा एकसेएक चित्रपटाची केवळ निर्मितीच नव्हे तर दिग्दर्शन ही केले

या सर्वच चित्रपटात त्याचे रंगभूमी विषयी प्रेम जसे दिसते तसेच उदात्त श्रेष्ठ मूल्यामधील संघर्ष चितारण्याचा त्याचा ध्यास दिसतो. चागलं-वाईट, बलवान-दुर्बल अशा परस्पर विरोधी प्रवृत्तीमधील संघर्षापेक्षा मोदीना उच्च मूल्यामधील संघर्षाचेच वेड-हाच संघर्ष त्याच्या सर्वच इतिहासपटाचा मूळ गाभा होता. मुख्य प्लॉट होता.

'सिकंदर'मध्ये पोरसचे आपल्या मातृभूमीविषयीचे प्रेम तर त्याच्याशी युद्ध करावयास आलेल्या अॅलेक्झांडरचा शत्रूविषयीचा आदरभाव; पण जगज्जेता बनण्याची मनीषा असा संघर्ष पाहायला मिळतो तर 'पुकार' मध्ये एकीकडे स्वतःच्या कुटुंबावरील प्रेम तर दुसरीकडे न्याय यांच्या कात्रीत सापड-

लेला जहागीर दिसतो. 'पृथ्वीवल्लभ' मध्ये एकीकडे मुक्त प्रेम तर दुसरीकडे आत्म-गौरव यांचा झगडा पाहायला मिळतो. केवळ उच्च मूल्याचा संघर्ष व त्यातील नाट्यच नव्हे तर त्यामुळे झालेल्या शोकातिका हाच मोदीचा आवडता विषय 'हॅम्लेट' 'किंग लियर' यानी भारावलेल्या मोदीनी 'शीशमहल' मध्येही अशाच शोकातिका चितारल्या.

तसे पन्नासएक चित्रपट निर्माण कर-णाऱ्या मोदीचे व्यक्तिमत्त्व लक्षात राहते ते त्याच्या इतिहास–पटांमुळेच. त्यातील काही भूमिकामुळे 'पुकार' मधील संग्रामसिंह 'झासी की रानी' मधील राजगुरू अशी काही मोजकी ऐतिहासिक व्यक्तीमत्त्वे त्यांनी रूपेरी पडद्यावर अजरामर केली. काही अशी ते या व्यक्तीमत्त्वाना पुन्हा जिवत करण्या-साठीच जगले. त्याचमुळे त्यानी आपले चित्रपट आधी विषय मग तिकीट-खिडकी-वराल व्यापारी हेतू या क्रमाने विचार करूनच निर्माण केले. 'झासी की रानी' दिमाखात तयार केला; पण अपयश मिळाले.

तेव्हापासून हा सिंहगर्जना फार कमी वेळा दृष्टीस पडत होता. मात्र डरकाळ्या निनादत होत्या. चद्रगुप्तावर, अशोकावर, पद्मीनीवर चित्रपट काढण्याचे घाटत होतं; पण ते राहूनच गेलं. त्या आधीच सिंह झोपी गेला अशी उच भव्य, स्वप्न ठेवून–

— सतीश

---

## मुंबापुरी : पृष्ठ ४ वरून

बद कव्हर करण्यासाठी आदल्या दिवशी रात्रीच आम्ही वाशीला पोहोचलो. दुसऱ्या दिवशी उरणला जाण्यासाठी वाहनाची गरज होती. पोलिसाच्या जीपमधून जाता आले तर पाहावे म्हणून रात्री साडेबाराला तुर्भे पोलीसठाण्यावर निघालो.

वाशीपासून तुर्भे सहा किलोमीटर अंतरा-वर. रस्त्यात मिट्ट काळोख. अर्ध्याच वाटेत समोरून धुराचे लोट येताना दिसले जवळ जाऊन पाहिले तर रस्त्याच्या बाजूला उभा केलेला एक ट्रक गावकऱ्यांनी पेटवून दिलेला!

मी पोलीसचौकीवर पोहोचलो तोवर ट्रकचा ड्रायव्हर परशुराम तक्रार नोंदवायला येऊन बसलेला होता. किडकिडीत शरीरयष्टी, दाढीचे खुट वाढलेले. बंदचा त्याला पत्ताही नव्हता. सध्याकाळी पुण्याहून परशुराम ट्रक घेऊन निघाला आणि वाटेत तुर्भेजवळ टायर पक्चर झाले. चाक बदलण्यासाठी तो खाली उतरला तोवर अचानक जवळच्या झुडपांतून ३०–४० लोक पुढे आले. ट्रकवर भरभर केरोसिन ओतून त्यांनी काडी लावली!

घाबरलेला परशुराम जीव घेऊन पोलीस-ठाण्यावर पळत आला. आता शेठ नोकरीतून काढील, मारसुद्धा देईल ह्या भीतीनं त्याचा जीव कासावीस झालेला.

किरकोळ प्रसंग वगळता उरण–परिसरा-तील बद शांतपणे पार पडला असे मी म्हटले तरी परशुरामला ते पटणे शक्य नाही. त्याला शेतकऱ्यांचे दुःख काय आहे ते ठाऊक नाही आणि सरकारचा दोष काय आहे ह्याचा पत्ता नाही!

चि. त्र्यंच्या कवितेचा एक चरण आहे त्यात थोडा बदल करून

'कुणाच्या पाठीवर कुणाचे ओझे ?'

□

### भर दिवसा

भर दिवसा चाळीत झालेला खून तुम्ही कधी पाहिला आहे का ? रस्त्यावर जमलेली प्रचंड गर्दी, पोलीस अधिकाऱ्यांची ये–जा, पत्रकारांची धावपळ आणि उगाच नसती लफडी नको म्हणून दारे खिडक्या बद करून भिंतीला कान लावून बसलेले शेजारी यामुळे वातावरणाला एक विचित्र अवकळा येते!

गेल्या बुधवारी दादरच्या रानडेरोड वरील एका चाळीत पद्माकर एडीकर ह्या सत्तर वर्षांच्या अर्धांगवायू झालेल्या वृद्धाचा आणि प्रेमाबाई नागावकर ह्या पंचेचाळीस वर्षे वयाच्या विधवेचा दुपारी दीडच्या सुमा-रास खून झाला. दोघांचेही गळे सुरीने चिरलेले! खोलीत रक्ताचा सडा आणि त्यात खुन्याच्या पायाचे ठसे. वृत्तपत्रांना ही बातमी सध्याकाळी सातपर्यंत समजली. त्यामुळे पत्रकाराची धावपळ अधिकच वाढली.

यातच पोलीस आणि सी. आय. डी. यांचे भांडण जुपले. सी. आय. डीना शहरात कोठेही गुन्हा घडला असेल तेथे जाण्याची मुभा असते. पोलिसाचे विभाग मात्र ठरलेले असतात. हे खून वृत्तपत्रांत गाजणार हे डोळ्यापुढे दिसत असता सी. आय. डी. चे लोक दादर पोलिसांकडे श्रेय कसे जाऊ देतील ? या सगळ्या कोलाहलात पत्र-कारांची मात्र प्रेताकडे पहाण्याची एक तटस्थ वृत्ती तयार होते.

घाईघाईने जमेल तेवढी माहिती कागदा-वर उतरवून मी ऑफिसला निघालो तेव्हा लक्षात आले की, एडीकराच्या पाठी कुणी भाऊ–बहीण आहे का हे विचारायचे राहिले.

एका शेजाऱ्याने जवळ खुर्चीत बसलेल्या माणसाकडे बोट दाखवून सांगितले 'हे एडीकराचे धाकटे बधू.' त्यांचा चेहेरा बावरलेला, असाहाय्य, भीतीने पाढरा पड-लेला, डोळ्यात पाणी. आता त्याचे नाव कसे विचारायचे ? प्रेतापेक्षाही त्यांच्या पाठी उरणाऱ्या नातेवाईकाना पाहाणे मला भयकर वाटते. त्याचे आयुष्य पुढे कसे जाईल ? अशी आठवण कधी पुसली जाते का ?

ऑफिसला येऊन खुनाची कॉपी टाइप करीपर्यंत दहा वाजले. आता वेदर रिपोर्ट द्यायची वेळ. Clear skies with no appreciable change in day's temperature.

पण ह्या मुबापुरीत वाटते तितके आभाळ निरभ्र नाही.

— विष्णु जयदेव

# आम्लाचा पाऊस : प्रदूषणाच्या साखळीतला शेवटचा दुवा

डॉ. अनुराधा सोवनी

प्रगतीच्या प्रत्येक नव्या टप्प्यात अधोगतीचीही बीजे लपून बसलेली असतात. वेळीच काळजी घेऊन ती उखडून टाकली नाहीत तर हां हा म्हणता ती फोफावतात.

गेल्या शतकात औद्योगिक क्रांती झाल्यापासून प्रगतीचा वेग झपाट्याने वाढला आहे. सर्व क्षेत्रात यांत्रिकीकरण होत आहे. त्याचबरोबर प्रदूषणाचा काळाकुट्ट राक्षस आपल्यापुढे उभा ठाकलेला आहे.

पर्यावरण स्वच्छ, आरोग्यदायी राहाण्याचे महत्त्व जसजसे उमगत गेले, तसतसे परिस्थितीचे गांभीर्य शास्त्रज्ञांना जाणवत गेले. सर्व युरोपभरचे पर्यावरणशास्त्रज्ञ आता चिंतेत आहेत. वेगवेगळया पातळयांवर सध्या कडाक्याचे वादविवाद, आरोप-प्रत्यारोप चाललेले आहेत. कुठे भांडणाला तोंड फुटेल सांगवत नाही. या सर्व गोष्टीमागचे कारण एकच आहे-युरोपभर होणारे प्रदूषण व त्यामुळे पडणारा आम्लाचा पाऊस !

'आम्लाचा पाऊस' हा काय प्रकार आहे? तो प्रदूषणाच्या साखळीतला शेवटचा दुवा आहे. तऱ्हेतऱ्हेचे कारखाने, रस्त्यावर गर्दीने धावणाऱ्या मोटारींनी सोडलेले धूर, आगगाडीत इंधन म्हणून जाळलेला कोळसा या सर्वांतून वेगवेगळे दूषित वायू हवेत मिसळतात. त्यापैकी सल्फर डाय-ऑक्साइड व नायट्रोजन ऑक्साइडस् यांचा हवेतील बाष्पाशी संयोग झाला की त्यांची आम्ले बनतात. ती जमिनीवर पडली की जमिनीचा कसच बदलतो. जमीन आम्लमय होते. त्यावर गवत वाढेनासे होते. जे गवत आधीच वाढलेले असेल ते पिवळे पडून सुकून जाते. मोठमोठ्या झाडांवरही दुष्परिणाम होतात. विशेषत: जुन्या, शंभर वर्षांपूर्वीच्या झाडांवर हे परिणाम फार चटकन जाणवतात. जंगलेच्या जंगले अशी नामशेष होऊ शकतात. पाण्यातही ही आम्ले मिसळतात. त्यामुळे नदी, नाले, तलाव यांचे पाणी दूषित होते. त्यातील जीवसृष्टी हळूहळू मृत्युमुखी पडते मासे, कासवे यांची वीण कमी होते. शिवाय जमिनीतील आम्लता वाढली की आम्लतेवर वाढणाऱ्या बुरशा तेथे फोफावतात. ही बुरशी झाडाच्या मुळांना खाऊन टाकते.

१९७२ साली स्टॉकहोम येथे आंतरराष्ट्रीय पर्यावरण परिषद भरली होती. (युनायटेड नेशन्स कॉन्फरन्स ऑफ एनव्हायरॉनमेन्ट) या परिषदेपुढे आलेले चित्र मोठे भयानक होते.

जर्मनीतील 'ब्लॅक फॉरेस्ट' हे जर्मनीचे वैभव आहे. कित्येक वर्षांपूर्वीची, उंचच्या उंच, सूचिपर्णी झाडे तेथे ताठ मानेने डौलात उभी आहेत; पण हे जंगल निश्चितपणे नामशेष होऊ लागले आहे. जंगलाचे पर्यावरण कितपत प्रदूषित आहे याचा अंदाज जंगलात किती मध तयार होतो यावरून लागतो. प्रदूषणामुळे मधाचे प्रमाण चटकन खाली येते. जर्मनीत ब्लॅक फॉरेस्ट हे मध मिळण्याचे मुख्य केंद्र. या परिषदेसमोर आलेल्या माहितीनुसार मधनिर्मितीत चिंताजनक घट झाली होती व वर्षानुवर्षे अधिकाधिक गंभीर प्रमाणात घट चालूच होती. शंभर वर्षांपूर्वीचे वृक्षराज भराभरा मरत होते. सूचिपर्णी वृक्षांची पाने आधी पिवळी पडत होती मग गळून जात होती. जुन्या झाडांची पाने आधी गळत होती. पाने गळायला सुरवात शेंड्यापासून होई व क्रमाक्रमाने खालची पाने गळत जाऊन झाडाला एखाद्या बगळ्याच्या घरट्याप्रमाणे काड्यामोड्यांचे स्वरूप येई !

जर्मनीतील बहुतेक जंगलांत हीच परिस्थिती होती. वेगवेगळ्या जंगलात सुमारे १० ते ७०% झाडांवर परिणाम दिसून येई; पण काही जंगलात १००% झाडांवर परिणाम होता. कित्येक ठिकाणी जंगलेच्या जंगले तोडून टाकावी लागली होती.

हे दुष्परिणाम फक्त जर्मनीत मर्यादित नव्हते झेकोस्लोवाकियामध्येही लाकूड हा एक महत्त्वाचा उद्योग आहे. त्यांच्याही १.३ जंगलावर परिणाम झाल्याने अतोनात नुकसान होत होते.

स्कॅंडिनेव्हियातील २० हजाराहून अधिक तलावांचे पाणी दूषित झाल्याने माशांची अंडी मरत होती. सामन, ट्राउट यासारखे औद्योगिक महत्त्वाचे मासे कमी होत चालले होते.

एकूण मध्ययुरोपातील कोट्यवधी एकरावरील जंगल निश्चितपणे नाहीसे होत चालले होते, तेही वाढत्या वेगाने !

### इंग्लंड-फ्रान्स-जर्मनी

परिषदेपुढे आलेले चित्र भयानक आहे व लवकरात लवकर त्याविरुद्ध उपाययोजना करायला हवी, याबाबत सर्वांचेच एकमत होते. प्रश्न आला तो दोषी कोण हे ठरवताना. पश्चिम जर्मनीतील तज्ज्ञांचे म्हणणे पडले की, आमचे ५०% नुकसान बाहेरील देशांमुळे होते. इंग्लंड, फ्रान्स व पूर्वजर्मनीकडून पश्चिमजर्मनीकडे वाहणारे वारे या तिन्ही देशात तयार झालेले दूषित वायू घेऊन येतात व आम्लाचा पाऊस पडून नुकसान होते पश्चिम जर्मनीचे. स्वीडन, स्कॅंडिनेव्हिया, नेदरलॅंडस वगैरे देशांनी पश्चिम जर्मनीला या आरोपात संपूर्ण पाठिंबा दिला व नुकसानभरपाई मिळावी असाही प्रस्ताव मांडला. नेदरलॅंडस्मधील तज्ज्ञांनी सुचवले की यापुढे दूषित वायूच्या उत्सर्जनावर नियंत्रण घालावे. सल्फर डायॉक्साईड दरवर्षी दरमाणशी पस्तीस किलोपर्यंतच हवेत सोडण्यास परवानगी असावी. ( सध्या इंग्लंडमध्ये हे प्रमाण दरवर्षी दरमाणशी अठ्ठ्याऐंशी किलो एवढे आहे. ) तसेच नायट्रोजन ऑक्साईडचे प्रमाण सध्या दरवर्षी दरमाणशी चाळीस किलो आहे ते वीसवर आणावे.

यानंतर वादावादीस सुरुवात झाली. जर हे वायू कमी प्रमाणात उत्सर्जित व्हायला हवे असतील तर दोन गोष्टी करता येतील– हे वायू कमी प्रमाणात निर्माण करणे, म्हणजे पर्यायाने उद्योगधंदे तेवढ्या प्रमाणात कमी करणे किंवा, निर्माण झालेले वायू वातावरणात जाणार नाहीत अशी सोय करणे. त्यासाठी गुंतागुंतीच्या व खर्चिक प्रक्रिया आवश्यक असतात. या दोन्ही पर्यायात देशातील कारखान्यांवर म्हणजे पर्यायाने देशावर मोठाच आर्थिक बोजा येतो. त्यामुळे इंग्लंड, फ्रान्स वगैरे प्रगत देश हा आरोपच मुळात कबूल करत नाही आहेत. त्यांचे म्हणणे प्रत्येक देशात आपापल्या उद्योगधंद्यामार्फत प्रदूषण चालूच आहे, तेव्हा प्रत्येक देशाने आपापले प्रश्न सोडवावे. उदा. पूर्व जर्मनीत १९८२ साली २७० कोटी टन एवढा भुरा कोळसा ( लिग्नाईट ) जाळला गेला. त्यातून निघालेले दूषित वायू पूर्व व पश्चिमजर्मनीत आम्लाचा पाऊस पडण्यास पुरेसे आहेत. त्यासाठी फ्रान्स वा इंग्लंडवर ठपका ठेवायची जरूर नाही.

इंग्लंडने नुकतेच जाहीर केलेले आहे की, इंग्लंडमधील दूषित वायु उत्सर्जनाचे प्रमाण किमान वीस टक्के कमी झाले आहे. याची कारणे बरीच संभवतात– उद्योगधंद्यात आलेली मंदी, नैसर्गिक वायूचा वापर, उत्तर समुद्रातील गंधकाचे प्रमाण कमी असणाऱ्या खनिज तेलाचा वापर, कोळशाचा मोठ्या प्रमाणात वापर इ. इ.

फ्रान्सचे म्हणणे असे– आम्लाच्या पावसामुळे जंगले, जीवसृष्टी मरत आहेत ही केवळ एक उपपत्ती आहे जोपर्यंत या दोहोंतील अन्योन्यसंबंध शभर टक्के सिद्ध होत नाही, तोपर्यंत कोणतेही खर्चिक उपाय योजण्यास फ्रान्सचा नकार राहील. समजा, उद्या असे सिद्ध झाले की ब्लॅक फॉरेस्ट मरत आहे ते या दूषित वायूमुळे नव्हेच, तर कुठल्या तरी रोगाने कीड पडल्याने झाडे मरत आहेत, तर या खर्चिक खटाटोपाने जे आर्थिक नुकसान तोपर्यंत ओढवले असेल, ते जर्मनी भरून देणार आहे का ?

बरोबर अशीच परिस्थिती, असेच आरोप प्रत्यारोप नि अशीच चालढकल दुसऱ्या एका भूखंडात चालू आहे. यात गुतलेले देश आहेत कॅनडा व उत्तर अमेरिका. ( यू. एस. ए. ) दर वर्षी अमेरिकेत २८ कोटी टन सल्फर डायॉक्साईड व चोवीस कोटी टन नायट्रस ऑक्साईड तयार होतात, तर कॅनडात हे आकडे अनुक्रमे पाच व दोन कोटी टन असे आहेत. तरीही आम्लाच्या पावसाचा मुख्य फटका बसतो तो नैऋत्य कॅनडाला, कारण त्या भूखंडातील वाऱ्यांची दिशाच तशी आहे.

याबाबत भारतातील परिस्थिती काय आहे ? सुदैवाने आपल्याकडे प्रदूषणाचा प्रश्न अजून एवढा सर्वव्यापी नाही. कारण उद्योगधंदे लोकसंख्येच्या मानाने फार मर्यादित आहेत. त्यामुळे शेकडो एकर प्रदूषित आहेत. असे चित्र सहसा आढळत नाही. मात्र जेथे मोठाली शहरे आहेत, खूप दाटीवाटीने बरेच कारखाने आहेत व तेवढ्याच दाटीवाटीने बरीच माणसे राहतात अशा जागी प्रदूषणाचा हा फटका जबर जाणवतो.

## चेंबूर–पुण्यात धोका

गेल्या एकदोन वर्षात आम्लाच्या पावसाची तीव्रता भारतात कितपत आहे याच्या चाचण्या सुरू झालेल्या आहेत. या मुख्यत्वे भाभा अॅटॉमिक रीसर्च सेंटर व जागतिक पर्यावरण संघटना याच्यामार्फत होत आहेत. १९७७, १९७८ व ११७९ साली भारतातील वेगवेगळ्या ठिकाणी मुख्यतः मुंबई व भोवतालच्या शहरात पाण्यात आम्लतेचे प्रमाण किती आहे हे तपासले गेले. पाण्यात काहीही आम्लता नसेल तर पाण्याचे पी-एच सात असते. आम्लता वाढत जाते तसतसे पी–एच कमी होत जाते. नैसर्गिक पावसात फारसे दूषित वायू मिसळलेले नसतात, त्यामुळे त्याचे पी–एच साधारण सहाच्या आसपास असते. त्यानंतर पी–एच एका युनिटने कमी होण्यास, म्हणजे पाच होण्यास आम्लता दसपट वाढावी लागते. वेगवेगळ्या तळ्याचे, पावसाचे पाणी तपासून पी–एच मोजले की तेथे पडणाऱ्या आम्लाच्या पावसाची कल्पना येते.

या तपासणीत असे आढळले की मुंबईभोवती विशेषत: ट्रॉम्बे, चेंबूर अशा औद्योगिक विभागात पडणाऱ्या पावसाचे पी–एच अनुक्रमे ४.४५ व ४.८५ म्हणजे पुष्कळच आम्लता असलेले होते. बंगलोर, दिल्ली, हैद्राबाद, नागपूर वगैरे शहरांत तीनही वर्षी पी–एच तेवढेच राहिले, तेव्हा हवेतील वायूचे प्रमाण विशेष वाढत नसावे. पुण्यात मात्र हे प्रमाण उत्तरोत्तर वाढत गेलेले आहे.

| शहर. | १९७७ | १९७८ | १९७९ |
|---|---|---|---|
| बगलोर | ६ ९ | ५ ४८ | ५.५७ |
| दिल्ली | ६.२५ | ५.२५ | ६ ०८ |
| हैदराबाद | ५ ९ | ५ ८४ | ६.५९ |
| नागपूर | ६ १७ | ५ ३२ | ५ ६३ |
| पुणे | ५.६५ | ५.५ | ४ ९३ |

भारतातील पावसात आम्लतेचे प्रमाण फारसे नाही याचे एक कारण असे आहे की, आपल्या देशातील वातावरणात धूळ खूप मोठ्या प्रमाणात तरंगत असते. त्यामुळे आम्लाचे उदासीनीकरण होऊन ती निष्क्रीय होतात. पावसाच्या पाण्याचे पी–एच किमान ४.६ व्हावे लागते, मगच जमिनीवरील पाण्याची आम्लता वाढते. त्यामुळे अजून तरी आपल्याकडे हा फारसा गंभीर प्रश्न नाही. भारतातील कोळशात गंधकाचे प्रमाण खूपच कमी आहे, त्याबाबतीतही आपण सुदैवी आहोत.

पण म्हणून आत्मसंतुष्ट राहून चालणार नाही. जसजसा प्रगतीचा वेग वाढेल तसतसे या प्रश्नाचे स्वरूपही बदलेल. आपली आधीच तुटपुंजी जंगले नाहीशी होतील. गवत मरून जाऊन जमिनीची धूप वाढेल, शेतजमिनीचा कस घटेल, अन्नधान्याच्या उत्पादनावर परिणाम होईल. मानवी आरोग्यावरही प्रत्यक्ष अप्रत्यक्ष परिणाम होईल आम्लयुक्त पाण्यात खनिजे विरघळतात, त्यामुळे पाणी वाहून नेणाऱ्या नळातील शिसे विरघळून विषारी परिणाम व्हायची शक्यता आहे. असाच परिणाम तांबे, अॅल्युमिनियम, झिंक वगैरे धातूवर होऊ शकेल. शहरातून रहाणाऱ्याच्या फुफ्फुसावर हवेतील दूषित वायूचा परिणाम होऊन चिकट, बरा न होणारा खोकला होऊ शकेल, शरीराची प्रतिकारशक्ती कमी होऊन इतर रोगांना ते चटकन बळी पडेल. लंडनमध्ये होणाऱ्या प्रचंड प्रदूषणामुळे १९५२ साली धूर व धुक्याचा काळा ढग तयार होऊन एखाद्या जा, जड कांबळ्याप्रमाणे तो साऱ्या शहराला कित्येक दिवस आच्छादून राहिला होता. त्या घुसमटणाऱ्या वातावरणामुळे मृत्यूचे प्रमाण अचानक सत्तर टक्क्यानी वाढले. एकूण ४००० माणसे मरण पावली !

अशीच वेळ चेंबूरसारख्या भागात यायला नको असेल तर आतापासून पावले उचलायला हवीत विद्युत । अण्विक शक्तीचा वापर कारखाने दूर दूर विखरून ठेवणे, कमी गंधकाचा कोळसा अथवा नैसर्गिक वायू वापरणे यासारखे उपाय सक्तीचे हवेत, तरच आपल्या प्रगतीशील देशाला काही तरी भवितव्य उरेल. □

# नाट्यपंढरी

## ¤ मखमलीचा पडदा

आज ज्याला आपण दर्शनी पडदा म्हणतो अंकाचा पडदा म्हणतो, तोच मखमलीचा पडदा! आज बहुतेक नाटयगृहातून, असा पडदा त्या त्या नाटयगृहाचाच असतो. त्यावरच सर्वजण आपली नाटके करतात. पूर्वी असा पडदा नसे. प्रत्येक नाटकमंडळीचा वेगवेगळा दर्शनी पडदा असे कुणाचा गगावतरणच्या सीनचा, तर कुणाचा राधाकृष्णाच्या चित्राचा; पण हे पडदेही अत्यंत कलात्मक असत. त्यावरून त्या कंपनीची शान ठरे.

ललितकलादर्श (१९०८) गंधर्व (१९१३) नि बलवंत (१९१८) या कंपन्यांचे पाळणे पाच पाच वर्षांच्या अतराने हललेले दिसतात. यात आजचे planned parenthood नव्हते हं! तो योगायोग होता. गंधर्व कंपनी स्थापन होण्यापूर्वी नारायणराव बालगंधर्व लोकप्रिय झाले होते. जोडीला टेंबे, बोडस होते. 'बलवंत' निघाली तेव्हा मा.दीनानाथ याच्याबरोबर चिंतामणराव कोल्हटकर नि कोल्हापुरे होते; पण 'स्वदेशहितचिंतक' सोडून ललितकलादर्श स्थापन करताना केशवराव भोसले– हा एक खांबी तंबूच होता. सात–आठ भागिदार होते; पण केशवरावांना ती 'अष्टग्रहीच' ठरली म्हणा ना! हळूहळू सगळे दूर झाले नि एकटे केशवराव उरले. मान्यवर नाटककारांची नवी नाटके मिळत नव्हती. सहकारी तोंडघशी पाडीत होते. अत्यत प्रतिकूल परिस्थितीत केशवराव निष्ठेने संस्था चालवीत होते अखेर १९१३ साली वीर वामनराव जोशी याचे 'राक्षसी महत्त्वाकांक्षा' हे नवे नाटक त्यांनी रंगभूमीवर आणले. सर्वस्व पणाला लावून नाटक उभे केले. काही काही कमी पडू दिले नाही आणि सुदैवाने या नाटकाने पैशाचा पाऊस पाडला कर्ज धुऊन गेले. पुढचा मार्ग मोकळा झाला.

या नाटकाचे सर्व सीन्स आनंदराव मेस्त्री (पेंटर) यांनी तयार केले होते. रसिकहो, याच खेळाच्या दिवशी भारी किंमतीचा, किरमिजी रंगाचा, मखमलीचा पडदा, केशवरावानी प्रथम मराठी रंगभूमीवर झळकविला. २० सप्टेंबर १९१३! बॉम्बे थिएटर, मुंबई.

या पडद्याची एक मोठी गमतीची गोष्ट पु. श्री. काळे यांनी नोंदून ठेवली आहे. हा पडदा ललितकलादर्शच्या रंगभूमीवर आल्यावर एकदा एक प्रोफेसर नाटक पहायला आले. तिसरी घंटा होताच, पडदा मधोमध विभागून उघडला जाऊ लागला. तोच ते प्रोफेसर, 'पडदा फाटला, पडदा फाटला' म्हणून ओरडू लागले; पण मग त्यानी त्या पडद्याचे इंगित समजावून घेतले. त्यांनी असा सरकता पडदा पाहिलाच नव्हता. तोपर्यंत गुडाळत वर जाणारे रोलरचेच पडदे होते.

## ¤ स्त्रीपार्टी

आता स्त्रीपार्ट इतिहासजमा झाला आहे. आजच्या पिढीला स्त्रीपार्ट म्हणजे काय, हेच माहीत नाही. आता स्त्रियाची कामे स्त्रियाच करतात; पण या वाक्प्रयोगातून नकळत सूचित होते की, यापूर्वी स्त्रियांची कामे– भूमिका पुरुष करीत होते खरे ना? नि ते खरेच आहे. रंगभूमीच्या अगदी सुरुवातीपासून तो सतसांवत्सरिक नाटयमहोत्सव होईतो–(१८४३ ते १९४३) मराठी रंगभूमीवर पुरुषच सर्व नाटकातून स्त्री भूमिका करीत होते. स्त्रिया मुळीच नव्हत्या असे नाही. होत्या– काही स्त्रिया रंगभूमीवर आल्या होत्या. कामेही चागली करीत होत्या; पण अधिराज्य होते, ते स्त्रीपार्टी नटांचेच! अहो, नाटयमहोत्सवातल्या 'शारदे'त बालगंधर्व–इंदिराकाकू नि मा. नरेश– शारदा होते.

मराठी रंगभूमीवर किती तरी देखणे, गुणी स्त्रीपार्टी होऊन गेले. कुणाचे वर्णन 'पर्लव्हाईट' तर कुणाचे 'स्वरुपसुंदर' असे केले जाई. भाऊराव कोल्हटकर, बाळाभाऊ जोग ही नावे फार जुनी झाली; पण बालगंधर्व, पोतनीस, मा. दीनानाथ, नानासाहेब चापेकर, बापुराव माने, मा. नरेश आदीचे गुणगान करणारी (आणि ते सत्यही आहे) कितीतरी रसिक मंडळी आहे. अनेकाच्या बाबतीत अनेक नवलकथा घडल्या आहेत.

नानासाहेब चापेकरांच्या बाबतीत घडलेली अशीच एक घटना, अगदी परवा परवा नानासुद्धा कधी गप्पांच्या रंगात आले की सांगत. बापूसाहेब पेंढारकराना नाविन्याचे अती वेड. आपल्या नाटकाना (ललितकलादर्श) साजेल असेच वास्तव नेपथ्य (सीनसिनरी) हवे ही त्यांची नित्याची धडपड. मुंबईच्या मुक्कामात आपल्या मित्राबरोबर त्यांनी 'हॅलोवे कोर्टनीज' या इंग्लिश नाटक मंडळीची काही नाटके पाहिली. त्याचे नेपथ्य अगदी नाटकाला हवे तसे असे. म्हणून आपल्या 'सत्तेचे गुलाम या नव्या नाटकासाठी, तसे फ्लॅटसीन्स करून घेतले. पु. श्री. काळे (व. पु चे वडील) याचे 'सत्तेचे गुलाम'चे बॉक्ससीन म्हणजे त्या वेळचे एक नवल होते, अपूर्वाई होती.

'हॅलोवे कोर्टनीज' या कंपनीच्या कलावंतांशी बापूसाहेब, काळे, चापेकर यांचा चागला परिचय झाला होता. त्याना आपले नवे नाटक पहायला बोलाविले. पहिला अक सपला नि ती पाच-सहा नटनटी आत आली. चहापान झाले नलिनीच्या (नायिका) भूमिकेत नखशिखांत श्रीमंती पोषाखात नाना होते. त्या ग्रुपमधल्या इंग्लिश नटीने (त्यांची हिरॉईन) नानासाहेब चापेकरांची खूप तारिफ केली. शालू, दागदागिने पुन्हा पुन्हा हात लावून पहात होती. हाऊ फाईन! म्हणून वस्तूचे ती कौतुक करीत होती. अखेरीला न राहवून, तिने नानाच्या कृत्रिम उरोजाची सुद्धा लाजत लाजत चौकशी केली. (How do you manage this?) हे आपण कसे करता? रंगपटातून बाहेर पडताना ती नानाकडे सारखी वळून वळून पहात होत होती. जाताना म्हणाली, 'Still I don't believe you are a man' माझा विश्वासच बसत नाही, तुम्ही पुरुष आहा म्हणून! त्यावर नाना इतकेच म्हणाले, 'Excuse me madam, but I can't keep it' याखेरीज, नाना दुसरे काय उत्तर देणार? लक्षात असू दे, नानासाहेब चापेकर हे त्या काळातले एकमेव ग्रॅज्युएट नट होते. नाटयव्यवसायातून निवृत्त झाल्यावर पुष्कळ वर्षे ते आकाशवाणीवर अधिकारी होते. हो, आणि नागपूरच्या नाटयसंमेलनाचे (१९६२) ते अध्यक्षही होते.

गो. रा. जोशी

या संघर्षातील माझे सर्वोच्च ध्येय ना गुलामी प्रथेला
अभय देणे आहे ना तिचे उच्चाटन करणे आहे ते आहे
देशाची अखंडता अबाधित ठेवणे. जर एकाही गुलामाला
मुक्त न करता मी देशाची अखंडता राखू शकलो तर ते मी
करेन. जर काही गुलामांची मुक्तता केल्याने आणि काहींना
तसेच ठेवून देश अखंड ठेवता आला, तर ते मी करेन
मी गुलामी प्रथेबाबत वा काळ्या वंशाच्या लोकांबाबत जे
करतो ते देशाची अखंडता कायम रहावी यासाठीच करतो
आणि त्याला विरोध करतो तो यासाठी की त्यामुळे देश
अखंड रहायला साहाय्य होणार असते – लिंकन

**देशाचे विच्छेदन हेच पाप मानणाऱ्या**
**सर्वात महान राजकीय नेत्याची**
**संपूर्ण ओळख करून देणारा ग्रंथ.**

अब्राहम लिंकन

# फाळणी टाळणारा महापुरुष

वि.ग.कानिटकर



**फाळणी एकदा झाली**
**पुनः होणार नाही ह्याची शाश्वती वाटावी**
**अशी परिस्थिती नाही.**
**प्रत्येकाने अभ्यासायला हवी अशी**
**लिंकनची राजकीय कहाणी.**

**भरपूर छायाचित्रांसह प्रकाशित होत असलेली**
**पहिली डिलक्स आवृत्ती.**
**मोठा क्राऊन आकार**
**पृष्ठे : सुमारे ४००**
**मूळ किंमत : रु. १५०/- किमान**
**सवलत मूल्य : रु. ९५/- फक्त (ट ख. स्वतंत्र)**
**पुस्तक १ जूनला प्रकाशित होईल.**
**आज पासून सर्वत्र नोंदणी सुरू.**

**राजहंस प्रकाशन** १०२५ सदाशिव पेठ, पुणे. ४११ ०३०